(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

<u>सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे</u>

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाला सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे सभागृहाची बैठक 5 मिनिटे तहकूब करावी.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री अनुपस्थित असल्यामुळे नियमाप्रमाणे सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी तहकूब करावी.

उप सभापती : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.01 वाजता 10 मिनिटासाठी तहकूब करण्यात आली.)

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

उप सभापती : सभागृहाची बैठक एका तासाकरिता स्थगित करण्यात येत आहे...

श्री.अजित पवार : सभागृहाची बैठक स्थगित का करण्यात येत आहे ?

उप सभापती : सभागृहाची बैठक सुरु झाली त्यावेळी कॅबिनेट मंत्री उपस्थित नव्हते म्हणून मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित केली. तद्नंतर माननीय विरोधी पक्ष नेते, संसदीय कार्य मंत्री आणि काही सन्माननीय सदस्य माझ्याकडे आले आणि त्यांनी मला असे सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांकडे अतिशय महत्वाची चर्चा चालू आहे. त्यामुळे विधानसभेची बैठक एक तासाकरिता स्थगित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे या सभागृहाची बैठक देखील एक तासाकरिता स्थगित करावी. त्यामुळे मी सभागृहाची बैठक एक तासाकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.12 वाजता 1 तासाकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

नागपूर शहरातील राजभवन या शासकीय इमारती वर अंजूमन हामी इस्लाम या संस्थेने अतिक्रमण करुन इमारतीची नासधुस केल्याबाबत

(१) * ४२००५ श्री.मितेश भांगडिया, श्री.विनोद तावडे, डॉ.रणजित पाटील, श्री.प्रवीण पोटे पाटील : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील राजभवन या शासकीय मालमत्तेत असलेल्या जागेवर अंजूमन हमी इस्लाम या संस्थेने अतिक्रमण केले असल्याचे दिनांक १८ मे, २०१३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १५ मे, २०१३ रोजी वा त्या सुमारास या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी इमारतीचे फाटक तोडून जेसीबी मशीनद्वारा इमारतीचे नुकसान केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकीय अधिकारी नसल्यामुळे या प्रकरणाची स्थानिक कर्मचाऱ्यांनी पोलीस स्टेशनला तक्रारदेखील केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सरकारी मालमत्तेची नासधुस करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली आहे काय, नोंदविलेल्या गुन्ह्याचे स्वरुप तसेच सुरक्षा रक्षकांवर कारवाई करण्यात येणार आहे काय,

(५) अद्यापी गुन्हा नोंदविला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राजभवन, नागपूरचे प्रभारी अधिकारी यांनी, दिनांक १६.०५.२०१३ रोजी सदर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीनुसार, राजभवनच्या मैदानाच्या दरवाजाचे कुलुप तोडून व अनधिकृतरित्या प्रवेश करुन अनेक झाडे तोडली, जाळली व बुलडोझर व जेसीबीद्वारे मैदानाचे सपाटीकरण करण्यात आले आहे. तसेच वॉचटॉवरच्या काचा फोडण्यात आल्या, वॉचटॉवरची पाण्याची पाईपलाईन तोडण्यात आली, तसेच सिव्हर पाईप तोडण्यात आले आहेत. मात्र राजभवनच्या मुख्य इमारतीला कोणतेही नुकसान झालेले नाही.

यासंदर्भात तक्रारीमध्ये अंजूमन हामी इस्लाम या संस्थेबद्दल संशय व्यक्त करण्यात आला आहे.

(३) दिनांक १६.०५.२०१३ रोजी राजभवन परिसराचे निरीक्षण करताना ही बाब प्रभारी अधिकारी यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी त्याच दिवशी नोंदविलेल्या तक्रारीनुसार सदर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१८९/२०१३ भा.दं.वि.कलम ४४७,४२७,३४ सह प्रिव्हेंशन टू पब्लिक प्रॉपर्टी ॲक्टच्या कलम ३ व ४ अनुसार अज्ञात व्यक्तींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून तपास सुरु आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४२००५.....

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, हा प्रश्न राज्यपालांच्या सुरक्षिततेशी निगडित आहे. अंजूमन हामी इस्लाम या संस्थेकडून राजभवनाची जागा बळकावण्याचा प्रयत्न मागील १८ वर्षापासून सुरु आहे. २००६ मध्ये अंजूमन हामी इस्लाम संस्थेने बनावट दस्तऐवज तयार करुन ७/१२ वर संस्थेचे नाव दाखल करुन घेतले आणि कंपाऊंड वॉलचे देखील बांधकाम करण्यात आले. त्याबाबत राज्यपालांतर्फे आक्षेप घेण्यात आल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला. परंतु फक्त ७/१२ वरुन संस्थेचे नाव कमी करण्यात आले. हे कृत्य करण्यामध्ये जे अधिकारी सामील होते त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली याची मला माहिती नाही. या प्रकरणात संस्थेविरुध्द कारवाई केली जाणार आहे का? जे अधिकारी या प्रकरणात गुंतले आहेत त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय?

सभापती महोदय, राजभवन परिसरात सतत तीन दिवस जेसीबी यंत्राद्वारे काम सुरु होते. परिसरातील १५० झाडे कापण्यात आली. वॉच टॉवरच्या काचा तोडण्यात आल्या. अज्ञात व्यक्तीविरुध्द पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. माझ्याकडे पोलीस उपआयुक्त व पोलीस आयुक्त यांनी राज्यपालांच्या सचिवांना लिहिलेल्या पत्राची प्रत उपलब्ध आहे. त्या पत्रांमध्ये काही व्यक्तींच्या नावांचा उल्लेख केलेला आहे. या व्यक्तींनी या कृत्यामध्ये सक्रिय सहभाग घेतलेला आहे. या ज्ञात व्यक्तींविरुध्द गुन्हा नोंदविला जाईल काय? मंडल अधिकारी यांनी घटनास्थळी पाहणी करुन चौकशी केली आहे. त्यानुसार अंजूमन हमी इस्लाम संस्थेला खेळासाठी मैदान म्हणून जागा वापरण्यास तात्पुरती परवानगी देण्यात आली होती. ही परवानगी रद्द करण्यात येईल काय?

नंतर डी.१....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 42005...

प्रा. फौजिया खान :सभापती महोदय, सन 1918,1935 आणि 1955 पासून राजभवनाची जागा दोन संस्थांना केवळ खेळाच्या मैदानासाठी वापर करण्याच्या शर्तीवर देण्यात आली होती. राजभवनाला जेव्हा या जागेची गरज असेल किंवा राज भवनाला लागेल तेव्हा ही जागा पुन्हा राजभवन ताब्यात घेईल, या शर्तीवर ही जागा दोन संस्थांना खेळाच्या मैदानासाठी देण्यात आली होती. राजभवनाला ही जागा केव्हाही आपल्या ताब्यात घेण्याचा अधिकार होता. या दोन संस्थांचा या जागेवर कोणत्याही प्रकारे मालकीचा अधिकार नव्हता. या जागेच्या मालकीचा हक्क केवळ राजभवनाकडेच आहे. सन 2006 मध्ये प्रॉपर्टीच्या पेपरवर राजभवनाचीच मालकी हक्क राहील अशा प्रकारची दुरुस्ती करण्यात आली होती. अनेक वर्षापासून अंजूमन हामी इस्लाम ही संस्था या जागेची मागणी करीत आहे.

सभापती महोदय, या जागेच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांनी अशा प्रकारची कोणतीही परवानगी या संस्थेला दिलेली नाही. उलट पोलीस आयुक्तांच्या सांगण्याप्रमाणे या जागेच्या चारही बाजूने ऊंच भिंत बांधली असून दोन छोटे लोखंडी गेट व एक मोठे गेट आहे. मुलांना मैदानात जाण्यासाठी पूर्वी एक छोटे गेट होते. दि. 16 मे, 2013 रोजी कुलूप तोडून जेसीबी व बुलडोझरने मैदानाचे सपाटीकरण करण्यात आले. मैदानातील झाडे तोडून ती जाळण्यात आली व वॉच टॉवरच्या काचाही फोडण्यात आल्या. या ठिकाणी अनेक प्रकारच्या कारवाया झालेल्या आहेत. जागेचा नकाशा बघितल्यानंतर असे जाणवले की, मैदानाच्या रोडच्या बाजूने मोठी भिंत असल्यामुळे आतमध्ये काय चालू आहे, ते दिसत नाही. या कारवाईच्या संदर्भात अंजूमन हामी इस्लाम या संस्थेवर संशय आहे. परंतु त्या संदर्भात कोणताही साक्षीदार पुढे न आल्यामुळे दि. 16 मे 2013 रोजी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अज्ञात व्यक्तीवर एफआयआर नोंदविलेला. दि. 16 मे रोजी झालेल्या अतिक्रमणाच्या अनुषंगाने तेथील दोन्ही गेट काढण्यात आले आहे. दि. 22 मे, 2013 ते 25 मे,2013 या कालावधीत मैदानाच्या चारही बाजूने अखंड भिंत बांधण्यात आली आहे. आता येथे पोलीस विभागाकडून पेट्रोलींगही वाढविण्यात आले आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या आदेशा प्रमाणे सध्या हे मैदान खेळासाठी बंद करण्यात आलेले आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. परंतु एका महत्वाच्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. ही कारवाई कोणी केली, कोणत्या संस्थेने केली, जेसीबीचा नंबरही माहिती असतांना अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा का नोंदवला गेला ? या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी का ताब्यात घेतले नाही ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा पोलीस तपासाचा भाग आहे. पोलीस तपासामध्ये पोलिसांना साक्षीदार मिळाला नसावा. पोलिसांनी एफआयआरमध्ये या संस्थेवर संशय व्यक्त केलेला आहे. परंतु पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे. पोलीस तपासामध्ये पोलिसांना अंजूमन हामी इस्लाम या संस्थेच्या विरोधात पुरावे सापडले तर त्यांच्या विरुध्दही गुन्हा दाखल होऊ शकतो.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात ज्या जेसीबीकडून कारवाई करण्यात आली, त्याचा नंबर दिलेला आहे. मला असे वाटते की, हे जेसीबी मशीन ताब्यात घेतल्यास संबंधित आरोपी मिळू शकतील. ज्याच्या मालकीचे हे जेसीबी मशीन होते त्याला अटक करा, जेसीबी कोण चालवित होता त्याला देखील अटक करा असे आदेश माननीय मंत्री महोदयांनी पोलिसांना दिले तर योग्य कारवाई होऊ शकेल.

प्रा.फौजिया खान : माननीय सभापती महोदयांनी जी सूचना केलेली आहे, ती गृह विभागाला देण्यात येईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, वॉच टॉवरच्या काचा फोडण्यात आलेल्या असून तेथील पाईप लाईन सुध्दा तोडण्यात आलेली आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, तेथील वॉच टॉवरवर राजभवनाचा कोणताही वॉचमन नव्हता काय ? या प्रकरणात पोलिसांची सर्व भूमिका संशयास्पद आहे. खरे म्हणजे आता पर्यंत दोषींना ताब्यात घेऊन त्यांच्यावर खटले भरले गेले पाहिजे होते ते आपण करणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या मार्फत सदनाला सांगू इच्छिते की, राजभवनाच्या सुरक्षेबाबत कुठल्याही प्रकारची तडजोड करण्यात येणार नाही. राजभवनावरील सुरक्षा कडक करण्यासंबंधी, कडक नियंत्रण ठेवण्यासंबंधी, तसेच राजभवन या शासकीय इमारतीच्या परिसरात अनधिकृतरित्या प्रवेश करून करण्यात आलेल्या कारवाईसंबंधी तपास करण्यासंबंधी कुठल्याही प्रकारची काटकसर करण्यात येणार नाही. या प्रकरणाचा तपास अतिशय काळजीपूर्वक करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या राजभवनाशी संबंधित अशी ही गंभीर गोष्ट आहे. या सदनात माननीय राज्यपालांच्या निवासस्थाना संबंधी गोलगोल उत्तरे मिळणार असतील यातून चुकीचा संदेश बाहेर जाईल. मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये दोन गोष्टी सांगितल्या आहेत की, संशयित आणि अज्ञात व्यक्तींविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्या संस्थेवर संशय असला तरी आमच्याकडे दुसरा कोणताही साक्षीदार नाही. माझ्याकडे पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा नागपूर, यांनी दिनांक 3 मार्च 2009 रोजी म्हणजे या घटने पूर्वी 3 ते 4 वर्षे आधी पत्र लिहिले होते, त्याची प्रत आहे. मंत्री महोदय सांगतात की, संशयित आणि साक्षीदार आमच्याकडे नाहीत. पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नागपूर यांनी माननीय राज्यपालांचे सचिव श्री.श्रीकांत देशपांडे यांना पत्र लिहिले आहे. त्यात नमूद करण्यात आले आहे की, या सर्व घटनाक्रमामध्ये पॉलिटेक्निक व मैदानावरील खाणकामाची माती विविध ठिकाणी टाकण्याबाबत नामदार श्री.अनिस अहमद यांचा भाऊ अल्ताफ अहमद या वादामध्ये संशयित असल्याचे सबळ दिसून येते. हे आम्ही म्हणत नाही. पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नागपूर म्हणत आहेत. माननीय राज्यपालांच्या सचिवांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, श्री.अनिस अहमद यांचा भाऊ श्री.अल्ताफ अहमद हा सहभागी आहे. तेव्हा त्यांच्यावर आपण कारवाई करणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

अंजूमन ग्राऊंड बचाव समिती, इंडियन युनियन मुस्लीम लिग, यांच्या संस्थेने मागणी केली आहे, आंदोलन केले होते, यात त्यांचा सहभाग आहे असे देखील नमूद आहे. या दोन संस्थांचे नाव आम्ही घेत नाही. पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा नागपूर हे या संस्थेची नावे घेत आहेत. तरी देखील सरकार अज्ञात व्यक्तींविरूद्ध गुन्हा दाखल करते. तेव्हा अंजूमन इस्लाम संस्था आणि इंडियन मुस्लीम लीग या संस्थांवर पोलीस उप आयुक्तांच्या म्हणण्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय, हा माझा पहिला प्रश्न आहे. श्री.अनिस अहमद यांचा भाऊ श्री.अल्ताफ अहमद यांच्यावर पोलीस उप आयुक्त यांच्या सांगण्या नुसार गुन्हा दाखल करणार आहात काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करण्यात येईल. यात कोणालाही वाचविण्याचा प्रश्न येत नाही. जे कोणी दोषी असतील त्यांच्या विरूद्ध कारवाई करण्यात येईल. त्यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उप सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया खाली बसावे. माननीय राज्यमंत्री महोदयांनी कोणाचाही मुलाहिजा ठेवण्यात येणार नाही असे स्पष्टपणे सांगितले आहे. माननीय राज्यमंत्री महोदया शिक्षण विभागाच्या मंत्री आहेत. आपण येथे जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याचा संबंध गृह विभागाशी देखील येतो. त्यावेळी पोलिसांनी योग्य भूमिका का बजावली नाही असा देखील प्रश्न निर्माण होतो. या संबंधात पोलिसांनी ताबडतोब चौकशी करून एका आठवड्याच्या आत कारवाईचा तपशील माननीय मंत्रिमहोदयांकडे पाठवावा व तो तपशील त्यांनी सभागृहा समोर ठेवावा.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, यात श्री.अनिस अहमद यांचा भाऊ श्री.अल्ताफ अहमद आहे असे डीसीपी म्हणत आहेत.

उप सभापती : मी येथे कोणाचेही नाव घेतलेले नाही. मला जे काही म्हणावयाचे होते ते थोडक्यात बोललो आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, या सर्वच प्रकरणांची चौकशी होणार आहे काय ?

उप सभापती : सर्वच प्रकरणांची चौकशी होणार आहे असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे.

.... ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिर्डी येथील श्री.साईबाबा संस्थानाला देणगी रुपाने मिळालेले सोन्याचे अलंकार वितळविण्याकरिता राज्य सरकारची परवानगी न घेतल्याबाबत

(2) * 43146 श्री.रामदास कदम, ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शिर्डी येथील श्री.साईबाबा संस्थानाला देणगी रुपाने मिळालेले सुमारे 110 किलो सोन्याचे अलंकार वितळवण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अलंकार वितळविण्यासाठी सन 2008-2009 आणि 2012 या तिन्ही वर्षात राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाने विहित नमुन्यात राज्य सरकारची परवानगी घेतलेली नाही, हे खरे आहे काय,

(3) तसेच, अलंकार वितळविण्यासाठी प्रक्रिया पार पडल्यानंतर राज्य सरकारला त्याचा अहवाल पाठविण्यात आला आहे, या अहवालात मात्र ही परवानगी घेतल्याचे खोटेच कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले,

(5) असल्यास, तद्नुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) होय, हे खरे आहे.

(2) देणगी रुपाने प्राप्त झालेले उत्कृष्ट कलाकुसरीचे अलंकार वगळून उर्वरित साधारण वस्तु/अलंकार जतन करणे अवघड असल्याने वितळविण्याबाबत शासन निर्णय दिनांक 31 मे, 2007 अन्वये स्थायी मान्यता देण्यात आली असून त्यातील मार्गदर्शक सूचनानुसार व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने केंद्र सरकारच्या अखत्यारितील इंडिया गर्व्हन्मेंट मिन्ट, मुंबई येथे दागिने वितळविण्याची कार्यवाही विभागाचे प्रतिनिधी व संस्थानचे अधिकारी यांच्या समक्ष करण्यात आली आहे.

(3) हे खरे नाही.

केंद्र सरकारच्या अखत्यारितील इंडिया गर्व्हन्मेंट मिन्ट, मुंबई येथे विभागाचे प्रतिनिधी व संस्थानाचे अधिकारी यांच्या समक्ष वजन काट्यावर प्रत्यक्ष वजन घेऊन वस्तु व अलंकार हस्तांतरीत करण्यात येतात. हस्तांतरीत करण्यात आलेल्या सोने वस्तू अलंकाराचे वजन रेकॉर्डमधील वजनाशी तपासले जाते व त्याची नोंद घेण्यात येते.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

यानंतर श्री.अजित...

अशुद्धीपत्र/अशुद्धीपत्र नाही

ता.प्र.क्र.43146...

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शिर्डी येथील श्री.साईबाबा संस्थानला देणगी स्वरुपात मिळालेले 110 किलो सोने वितळविण्यात आले आहे. सन 2008 मध्ये 19 किलो सोने, सन 2009 मध्ये 53 किलो सोने आणि सन 2012 मध्ये 37 किलो सोने असे एकूण 110 किलो सोने वितळविण्यात आले आहे. संस्थानला देणगी स्वरुपात मिळालेले सोने वितळवावयाचे असेल तर त्या संदर्भात नियम आहेत. प्रथम सोन्याचा लिलाव केला पाहिजे. त्या लिलावास प्रतिसाद मिळाला नाही तर जास्त गर्दी असेल त्यावेळी लिलाव केला पाहिजे. एकूण तीन वेळा लिलाव केला पाहिजे. जर लिलावाला प्रतिसाद मिळाला नाही तर सोने वितळविले पाहिजे. आणखी सोने वितळविण्याचे काम सुरु होते. परंतु माननीय सर्वोच्च न्यायालयाने त्यास स्टे दिल्यामुळे ते थांबविण्यात आले. दुसरे म्हणजे सोने वितळविताना त्या ठिकाणी शासनाचे तीन प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक आहे. सन 2008 मध्ये सोने वितळविण्यात आले त्यावेळी शासनाचा एकच प्रतिनिधी उपस्थित होते. तर सन 2009 अणि सन 2012 मध्ये सोने वितळविण्यात आले त्यावेळी शासनाचा एकही प्रतिनिधी उपस्थित नव्हता. जे सोने वितळविण्यात आले त्यामध्ये सोडचौदा किलोची घट आली आहे. सन 2009 आणि सन 2012 मध्ये ही घट आणखी वाढल्यामुळे संशयास जागा उरते. जर नियमबाह्य पध्दतीने सोने वितळविण्याचे काम होत असेल तर ती गंभीर बाब आहे. तेव्हा या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, एकूण 110 किलो सोने वितळविण्यात आले ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सोने वितळविण्यात आले त्यावेळी शासनाचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. त्या बाबत मी सांगू इच्छितो की, ज्या ज्या वेळी सोने वितळविण्यात आले त्या त्या वेळी संस्थानचे आणि शासनाचे प्रतिनिधी उपस्थित होते. हे सोने वितळविण्यासाठी शासनाची परवानगी घेण्यात आली होती काय असा प्रश्न विचारण्यात आला. त्याबाबत सांगू इच्छितो की, शासनाच्या जी.आर.प्रमाणे हे सोने वितळविण्यात आलेले आहे. दुसरी बाब म्हणजे श्री.साईबांबाना उत्कृष्ट प्रकारचे सोन्याचे अलंकार देणगी स्वरुपात मिळतात त्याचे जतन केले जाते आणि ते सोन्याचे अलंकार उत्सवाच्या दिवशी वापरले जातात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43146...

श्री.उदय सामंत...

सोन्याच्या लिलावाबाबत सांगू इच्छितो की, सन 2012 मध्ये माननीय न्यायालयाने जे निर्देश दिले त्यानुसार लिलावाची पध्दती बंद पडलेली आहे. त्यापूर्वी लिलावामध्ये जे दागिने गेले नाहीत ते वितळविण्यात आले आणि त्यामध्ये 14 किलो सोन्याची घट आली आहे. देणगी स्वरुपात जे दागिने येतात त्यामध्ये अंगठ्या व इतर अलंकार असतात त्यामध्ये खडे असतात आणि ते 12, 20 आणि 24 कॅरेटचे सोने असते. या सोन्याचे 24 कॅरेटमध्ये रुपांतर करावयाचे असल्यामुळे ती घट दिसत आहे. या संपूर्ण प्रोसेसमध्ये शासनाचे अधिकारी उपस्थित होते.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, जे सोने वितळविण्यात आले त्यामध्ये साडेचौदा किलोची घट आली आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, जे दागिने देणगी स्वरुपात येतात त्यामध्ये मोती, खडे असतात. माझा प्रश्न आहे की, त्यामध्ये किती किलो खडे वा मोती होते ? माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार श्री.साईबाबा संस्थानने सोने वितळविण्यासाठी शासनाची परवानगी घेतली नव्हती. संस्थानने नियमबाह्य पध्दतीने 110 किलो सोने वितळविले आहे. आम्ही शासनाची परवानगी घेतली होती असे संस्थानने अहवाल देताना म्हटले आहे. परंतु त्यांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे. माझी ही माहिती कदाचित चुकीची असू शकेल. तेव्हा त्या अनुषंगाने या गोष्टीची चौकशी होईल काय ?

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, 110 किलो सोन्याचे बायफरकेशन केले होते. त्यानुसार 24 कॅरेटचे 66.80 किलो सोने होते. 110 किलो सोन्यापैकी मौल्यवान खडे वगळून किंवा अन्य जे सोने त्यांना जोडले त्याचे कॅल्क्युलेशन 102 किलो होते. शिर्डी संस्थानकडून 109 किलो सोने वितळविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यातून 24 कॅरेटचे 97.379 किलो सोने तयार करण्यात आले. ज्यावेळी हे सोने वितळविण्यात आले त्या वेळी केंद्र सरकारच्या अखत्यारितील इंडिया गर्व्हन्मेंट मिन्ट, मुंबई येथे विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्या वेळी जे अधिकारी उपस्थित होते त्यांची नावासह यादी माझ्याकडे आहे. सोने वितळविण्याची प्रक्रिया दि.31 मे, 2007 रोजीच्या शासन निर्णयानुसार पार पडली आहे. तो शासन निर्णय कायमस्वरुपी झालेला आहे. संस्थानच्या समितीमध्ये सोने वितळविण्याचा निर्णय झाला तर ते सोने वितळविण्यासाठी मुंबईत आणत असताना ते इन-कॅमेरा आणून संबंधित अधिकाऱ्यांच्या समोर वितळविले पाहिजे. दि.31 मे, 2007 रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार सदरहू प्रोसेस पूर्ण करण्यात आलेली आहे.

श्री.हेमंत टकले : महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, शिर्डी संस्थानला दान करण्यात येणाऱ्या दागिन्यांमध्ये काही मौल्यवान अलंकार असतात. ते अलंकार उत्सवाच्या वेळी बाहेर काढले जातात आणि उत्सवानंतर ते पुन्हा जतन केले जातात. मोठ्या प्रमाणावर सोने संस्थानमध्ये ठेवले जात नाही. शिवाय जे सोने दान रुपाने येते ते 24 कॅरेटचे नसते. सोन्याचे दागिने घडविताना त्यात तांबे, चांदी मिक्स करावी लागते. त्यानंतरच 90 ते 94 टक्के सोन्याचे दागिने बनतात. दागिने जतन करण्यासाठी किंवा शुध्द करण्यासाठी मिन्टकडे जाऊन रिफायनिंग करण्याची प्रोसेस योग्य आहे. दोन-तीन वर्षांचा साठा वितळविण्यासाठी एकदम नेण्याऐवजी वेळोवेळी वितळविण्याची प्रक्रिया सुरु केली तर योग्य होईल. ही प्रक्रिया वेळोवेळी राबविली तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर जोखिमेच्या वस्तू बाहेर घेऊन जाण्यामध्ये ज्या अडचणी येतात त्या येणार नाहीत. शिवाय असे केल्यास संशयाला जागा राहणार नाही. त्यामुळे मी सांगितलेल्या प्रक्रियेचा माननीय मंत्री फेरविचार करतील काय ?

श्री.उदय सामंत : महोदय, दागिन्यामध्ये घट कशाप्रकारे झाली हे मी स्पष्ट केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जी सूचना केली त्याचा नक्की विचार केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन : महोदय, शिर्डी संस्थानला दान रुपाने मिळालेले 110 किलो सोने वितळविण्यात आले आहे. त्यातून 66.8 किलो शुध्द सोने मिळाल्याचे माननीय मंत्र्यांनी सांगितले. 97 किलो सोने मोडून ते शुध्द झाले आहे. त्यामध्ये 14.5 किलो सोने म्हणजेच वितळविण्यात आलेल्या एकूण सोन्याच्या दागिन्यांपैकी 15 टक्के मौल्यवान खडे होते, असे माननीय मंत्र्यांचे म्हणणे आहे. त्या खड्यांमध्ये हिरे, पुष्कर, रुबी इत्यादी मौल्यवान खडे असतील. 14.5 किलो सोने गृहीत धरले तर ते 7000 कॅरेटचे होतात. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, मौल्यवान खड्याचे व्हॅल्युएशन आपण केले होते काय, या मौल्यवान खड्यांचे व्हॅल्युएशन गव्हर्नमेंट मिन्ट, मुंबई यांनी केले नाही काय, तसेच सोने वितळवितांना कोणकोणते अधिकार उपस्थित होते ?

श्री.उदय सामंत : महोदय, फक्त सोने वितळविण्यात आलेले आहे.. मौल्यवान खडे आणि अन्य मौल्यवान वस्तू यांचे व्हॅल्यूएशन अगोदरच केले होते. 2008 मध्ये 12.28 टक्के, 2009मध्ये 13.13 टक्के आणि 2012 मध्ये 13.40 टक्के घट आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, या दागिन्यांमध्ये हिरे, पाचू इ.मौल्यवान खडे असतील. मी त्यांना सांगू इच्छितो की, जे मौल्यवान वस्तू वा खडे होते ते बाजूला काढून संस्थानकडे सिलबंद करुन ठेवलेले आहेत.

नंतर श्री.बरवड....

अशुध्दीत प्रत / शीघ्रलिपीची नाही

मुंबईतील परेल-शिवडी डिव्हिजन येथील रत्नसिंधु सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाचे काम पूर्ण न करता भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याबाबत

(३) * ४२४४९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.रमेश शेंडगे, श्री.संदिप बाजोरिया, श्री. दीपकराव साळुंखे-पाटील, श्री. जयवंतराव जाधव, श्री. अनिल भोसले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री. विनायकराव मेटे, श्री. सतीश चव्हाण, श्री. अमरसिंह पंडित, श्री. अब्दुल्ला खान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३४०९० ला दिनांक १२ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परेल-शिवडी विभागातील रत्नसिंधु सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाचे काम अपूर्ण असतांनाही सदर गृहनिर्माण संस्थेतील इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले असल्याची गंभीर बाब माहे मे, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाच्या कामामध्ये सुरु असलेल्या गैरकारभारासंदर्भात सखोल चौकशी करुन कारवाई करण्यासंदर्भात मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांच्या दालनामध्ये दिनांक २२ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास सर्वसबंधितांसमवेत आयोजित केलेल्या बैठकीमध्ये सदर इमारतींची अपूर्ण कामे तातडीने करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (२) मधील प्रकरणी आतापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांचेकडे दिनांक २७ मे, २०१३ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली तसेच सदर गृहनिर्माण संस्थेतील इमारतींची कामे तातडीने पूर्ण करुन रहिवाशांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री. सचिन अहिर, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) होय.

रत्नसिंधु सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांनी त्यांच्या दि.१.१२.२०१२, १९.१०.२०१२ व २०.१०.२०१२ रोजीच्या पत्रान्वये पुनर्वसन इमारतींचे काम अर्धवट असताना भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केले आहे, अशा प्रकाराचा तक्रार अर्ज मुंबई इमारत व दुरुस्ती पुनर्रचना मंडळाकडे केलेला आहे.

(२) रत्नसिंधु सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण विभाग यांचेकडे दिनांक २२.१.२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी रहिवाश्यांनी केलेल्या तक्रारींचे अनुषंगाने संबंधित अधिकारी व विकासक यांनी पुनर्वसन इमारतीची संयुक्त पाहणी करुन तक्रारीचे निवारण करावे असे निर्देश दिलेले आहेत.

(३) मा.विधान परिषद सदस्य यांचे दिनांक २७.५.२०१३ च्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री व मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांना निवेदन दिलेले असल्याचे दिसून येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42449... श्री. सचिन अहिर, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता ....

(४) मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाने पुनर्वसन इमारतींना महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र घेण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. तथापि, महानगरपालिकेने दिनांक १०.१०.२०१२ रोजीच्या पत्रान्वये विकासकाने बांधलेल्या पुनर्वसन इ.क्र.३, ४, ५ व ६ या इमारतींच्या विंग क्र. ए ला भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केलेले आहे. विकासक ज्या वेळेस उर्वरित इमारतींसाठी भोगवटा प्रमाणपत्र महानगर पालिकेकडून घेण्यासाठी प्रस्ताव सादर करतील, त्यावेळेस प्रचलित पध्दतीनुसार मंडळाचे संबंधित कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ हे प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करतील व विकासकाने पुनर्वसन इमारतींचे / सदनिकांचे काम हे मंजूर नकाशानुसार तसेच रहिवाश्यांसोबत केलेल्या करारनाम्यानुसार आहे किंवा नाही, याची खातरजमा केल्यानंतर मंडळातर्फे भोगवटा प्रमाणपत्र मुंबई महानगरपालिकेकडून घेण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, ज्या विषयाच्या संदर्भात मी आज हा प्रश्न उपस्थित केलेला आहे याच विषयावर 2012 मध्ये विधानसभेत चर्चा झाली होती. त्या दिवशी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिलेले होते तेच आश्वासन आजच्या उत्तरामध्ये छापून आलेले आहे. या विषयाच्या संदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सदर कायद्यान्वये बांधकाम सुरु करण्यापूर्वी आणि बांधकाम सुरु झाल्यानंतर आणि ते पूर्णत्वास आल्यानंतर त्या ठिकाणी एक नाहरकत प्रमाणपत्र दिले जाते त्याला भोगवटा प्रमाणपत्र म्हटले जाते. परंतु त्या अधिकाऱ्याने कोणत्याही प्रकारची तपासणी केली नाही. विकासकाने जे काही बांधकाम केलेले आहे त्यामध्ये सर्व सुविधा दिलेल्या आहेत की नाही हे न बघता त्या अधिकाऱ्याने भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे. त्या ठिकाणी जे चुकीचे भोगवटा प्रमाणपत्र दिले त्या बाबतीत शासन काय कारवाई करणार, त्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली गेली आहे ? माननीय राज्यमंत्र्यांनी 13 तारखेला या विषयाच्या संदर्भात बैठक घेतली. परंतु अद्याप त्या विषयावर कोणतीही प्रगती झालेली नाही. ती इमारत तशीच पडलेली आहे. विकासकाने ज्या सुविधा देण्याचे मान्य केले आहे त्या सुविधा अजून दिलेल्या नाहीत. याचा शेवटचा निकाल कधी लागणार आहे ? सदर विकासकाने कॉर्पस फंड देण्याचे मान्य केले होते. परंतु अद्याप कॉर्पस फंड देण्यात आलेला नाही. त्या ठिकाणच्या रहिवाशांची परिस्थिती खूप वाईट आहे. ते छोट्याशा घरामध्ये राहात आहेत. हे काम कधी होईल या संदर्भात माननीय मंत्री महोदय समाधानकारक उत्तर देतील का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

ता. प्र. क्र. 42449 .....

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, भोगवटा प्रमाणपत्र देण्याचे काम महापालिकेकडून केले गेले आहे. महापालिकेने ही इमारत राहण्यायोग्य आहे की नाही हे तपासल्यानंतर भोगवटा प्रमाणपणत्र देण्याचे काम केले जाते. त्याप्रमाणे ते देण्याची भूमिका त्यांनी घेतलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा सांगितला त्या बाबतीत मी स्वत: एक बैठक घेतलेली होती. त्यात संबंधित अधिकाऱ्यांनी विकासकाला बोलवून घेऊन पाहणी करुन अहवाल द्यावयास पाहिजे. परंतु विकासक काही कामामुळे येऊ शकले नाहीत किंवा आले नाहीत. आजच मी ब्रिफींगच्या वेळी सूचना दिलेल्या आहेत की, महिनाभरामध्ये त्यांनी विकासकाला बरोबर घेऊन तेथील ज्या रहिवाशांची मागणी आहे त्यांना सोबत घेऊन संयुक्त पाहणी करावी आणि जे काही निष्कर्ष असतील त्या बाबतीत माझ्याकडे अहवाल द्यावा. त्या अहवालाचे पालन केले नाही तर त्यांच्यावर उचित कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे करारामध्ये कॉर्पस फंडचा कोठेही उल्लेख नाही. करारामध्ये उल्लेख असेल तर कॉर्पस फंड देण्याचे विकासकाला बंधनकारक केले जाईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, पहिल्यांदा महानगरपालिकेने जे भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे त्या संदर्भात रिपेअर बोर्डाने त्यांना ना हरकत प्रमाणपत्र दिले होते का ? जर दिले नसेल तर महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याने हे भोगवटा प्रमाणपत्र दिले त्याच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ? उत्तरामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, "सदनिकांचे काम हे मंजूर नकाशानुसार तसेच रहिवाशांसोबत केलेल्या करारनाम्यानुसार आहे किंवा नाही, याची खातरजमा केल्यानंतर मंडळातर्फे भोगवटा प्रमाणपत्र मुंबई महानगरपालिकेकडून घेण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल." ही जी सर्व प्रक्रिया आपण करतो ती प्रक्रिया केली की नाही या स्वरुपाचे जे मिनिट्स असतील ते ठेवण्याची पध्दत आहे का ? आमच्या आश्वासन समितीसमोर एक प्रश्न आलेला असताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही हे काही बघत नाही. रहिवाशी आणि विकासक यांच्यातील ही बाब असून आमचा काही संबंध नाही अशा स्वरुपाचे उत्तर आश्वासन समितीसमोर दिले गेले आहे. आपण उत्तरात जे म्हटले आहे की अशा स्वरुपाची पध्दत आहे ती खरोखर आहे का, असेल तर तर प्रत्येक योजनेमध्ये ते तंतोतंत पाळले जाते का ?

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42449 ....

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, त्या ठिकाणी पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र दिले गेले नाही. त्या ठिकाणी पार्ट भोगवटा प्रमाणपत्र दिले गेले आहे. प्रचलित धोरणानुसार ज्यावेळी पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र द्यावयाचे असेल त्यावेळी त्यांनी मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे. यामध्ये त्यांनी ते घेतलेले नाही. सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो उल्लेख केला त्याबाबतीत आजही ब्रिफींगच्या वेळी ही गोष्ट माझ्या लक्षात आली की, विकासक आणि रहिवाशांमध्ये करार होतात तरी सुध्दा मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाने जबाबदारी झटकून चालणार नाही ही गोष्ट खरी आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42449.... श्री.सचिन अहिर...

या पुढील काळामध्ये ओ.सी.देण्यापूर्वी मुंबई घरदुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सर्व कराराप्रमाणे अंमलबजावणी झाली किंवा नाही हे पाहिले पाहिजे. त्यानंतरच ओ.सी.साठी एन.ओ.सी. दिली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे प्लॅनची जबाबदारी बी.एम.सी.ची आहे, परंतु त्या रहिवाशांना घर मिळाले किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी म्हाडाची आहे. ती जबाबदारी झटकून चालणार नाही. ती जबाबदारी पार पाडल्यानंतरच पुढील काळामध्ये एन.ओ.सी.दिली जाईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मंत्री महोदय मूळ प्रश्नाला सोयीस्कररित्या बगल देत आहेत असे मला वाटते. घरदुरुस्ती मंडळाच्या एन.ओ.सी.शिवाय बी.एम.सी.कडून ओ.सी.मिळू शकत नाही. घरदुरुस्ती मंडळाने इमारत क्र.3, 4,5 व 6 ला एन.ओ.सी.दिली नाही. तरीही बी.एम.सी.च्या डेप्युटी चीफ इंजिनिअरने त्यांना ओ.सी.दिली आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय, दुसऱ्या भागात असे उत्तर दिले आहे की, दुसऱ्या इमारतीचे ते नीट काम करीत आहेत की नाही ते बघून घरदुरुस्ती मंडळाची एन.ओ.सी.देऊ. त्यानंतर ओ.सी.देऊ. ज्या विकासकाने मंडळाच्या एन.ओ.सी.शिवाय ओ.सी.मिळविली त्याच्या पुढील कामासाठी आवश्यक असलेल्या सी.सी.ला शासनाकडून स्थगिती दिली जाणार आहे काय आणि काम थांबविण्याचे आदेश दिले जातील काय ?

श्री.सचिन अहिर : पार्ट ओ.सी.साठी म्हाडाच्या एन.ओ.सी.ची गरज नाही. त्यांनी ती दिलेली नाही. म्हणून संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. ही जबाबदारी मंडळाला टाळता येणार नाही. म्हणून म्हाडाच्या एन.ओ.सी.शिवाय पार्ट ओ.सी.देऊ नये असा निर्णय शासन स्तरावर घेतला जाईल. कराराप्रमाणे रहिवाशांची मागणी रास्त आहे. त्याची अंमलबजावणी होईपर्यंत कोणत्याही प्रकारच्या सदनिकेच्या सेलची त्यांना परवानगी दिली जाणार नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, रत्नसिंधु सोसायटीच्या 154 भाडेकरुंबरोबर पहिला करार करण्यात आला. त्याच ठिकाणी 1989 मध्ये ऐक्य दर्शन सोसायटीच्या भाडेकरुंबरोबर दुसरा करार करण्यात आला. दोन्ही इमारतींचे 252 भाडेकरु आहेत. दोन्हीकडील भाडेकरुंना एका इमारतीमध्ये घरे देण्याचे ठरल्यानंतर सेलची इमारत दुसरीकडे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बांधली गेली. या विकासकाला काम मिळण्यासाठी त्यांनी प्रथम रत्नसिंधुच्या भाडेकरुंबरोबर करार केला. त्यांच्या करारात कॉर्पस फंडाची नोंद नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु जानेवारी 2011 पासून टप्प्याटप्प्याने कॉर्पस फंडाची रक्कम देण्यात येईल असे त्यात नमूद केलेले आहे. 1 कोटी 44 लाख 37 हजार 500 रुपयांचा उल्लेख त्या करारात आहे. करारामध्ये म्हटल्याप्रमाणे विकासक काही देत नाही. अनेक सोसायट्यातील भाडेकरुंना हा अनुभव येतो. विकासकाचे भाडेकरु म्हणणे मानत नसतील तर भाडेकरुंचे भाडेही बंद केले जाते. या भाडेकरुंचेही भाडे बंद केलेले आहे. अशा भाडेकरुंच्या बाजूने सरकार उभे राहणार आहे काय, या करारामध्ये कॉर्पस फंड दिला पाहिजे, भिंत बांधली पाहिजे या सर्व गोष्टी नमूद केलेल्या आहेत. या कराराप्रमाणे भाडेकरुंना गोष्टी दिल्या जात नसतील तर शासन अशा विकासकांवर काय कारवाई करणार आहे ?

श्री.सचिन अहिर : जर करारामध्ये कॉर्पस फंडाचा उल्लेख असेल तर संबंधित विकासकाला तो देण्यासाठी भाग पाडले जाईल, त्यांनी कराराची अंमलबजावणी केली नसेल तर त्यांच्या सेल एरियाची सी.सी. किंवा पुढील कामाची परवानगी दिली जाणार नाही.

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

ठाणे महानगरपालिकेकरित क्षेपण भूमीसाठी (डम्पिंग ग्राऊंड) जमीन मिळण्याबाबत करावयाची कार्यवाही

(4) * 42735 ॲड. निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे महानगरपालिकेची स्वनियंत्रित क्षेपणभूमी (डम्पिंग ग्राऊंड) नसल्याने शहरातील जमा होणाऱ्या 600 टन कचऱ्याची विल्हेवाट महानगरपालिकेला खाजगी जमिनी, वनजमिनी वा खाडी किनारे यावर करावी लागत असल्याचे दिनांक 21 एप्रिल, 2013 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) तसेच ठाणे येथील कोपरी येथे गेल्या दहा वर्षापूर्वी कचऱ्यापासून वीज निर्मितीचा सुरु असलेला प्रकल्प बंद पडल्यानंतर तेव्हापासून आजतागायत कचरा विल्हेवाटीचा एकही प्रकल्प महानगरपालिकेने राबविला नसल्याचे देखील दिनांक 21 एप्रिल, 2013 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, ठाणे शहराची 20 कोटी इतकी लोकसंख्या विचारात घेता, क्षेपणभूमीसाठी (डम्पिंग ग्राऊंड) जमीन मिळण्यासाठी महानगरपालिका स्तरावर व शासन स्तरावर कोणकोणते प्रयत्न करण्यात आले वा करण्यात येत आहेत तसेच नव्याने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन 650 मे.टन घनकचऱ्याची विल्हेवाट खाजगी जमिनीवर जागा मालकाच्या संमतीने लावण्यात येते, हे खरे आहे.

(2) घन कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करण्याचा प्रकल्प सुरु करण्याच्या अनुषंगाने निविदा मागविण्यात आल्या असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(3) डायघर येथील शासकीय जमीन ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आली असून वन विभागाच्या जमिनीवरील बंद पडलेली खदाण मिळणेबाबत ठाणे महानगरपालिकेस घनकचरा राबविण्यासाठी पर्यावरण विभागाने तत्वत: मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर खदाणीसाठी ठाणे महानगरपालिकेने रुपये 12.69 लाख इतकी रक्कम वन विभागाकडे जमा केलेली असून जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तळोजा येथे शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प सुरु करण्यात येणार असून या प्रकल्पांतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येणार आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, स्वच्छ व सुंदर शहर असा राष्ट्रीय पुरस्कार मिळविणारे एकमेव ठाणे शहर आहे. या शहरामध्ये 650 मे.टन कचरा निर्माण होतो. या शहराची लोकसंख्या 18 लाख इतकी आहे. या लोकसंख्येमध्ये सातत्याने होणारी वाढ लक्षात घेऊन त्या ठिकाणी महानगरपालिकेचे स्वत:चे डम्पिंग ग्राऊंड व घन कचरा प्रकल्प असणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प व डम्पिंग ग्राऊंड नसल्यामुळे खाजगी जमिनीवर जागा मालकाच्या संमतीने या घनकचऱ्याची विल्हेवाट लावली जाते असे लेखी उत्तरात शासनाने नमूद केलेले आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या भूखंडाची क्षमता संपल्यानंतर शेजारच्या शेतामध्ये किंवा वन जमिनीवर महापालिका चोरुन कचरा टाकत आहे. ही चोरी पकडली जाऊन वन विभागाने कच-याचे डंपर जप्त करुन गुन्हे देखील दाखल केलेले आहेत. त्यानंतर वन जमिनी ऐवजी ठाणे महापालिकेने कळवा, गायमुख, कोपरी, मुंब्रा, दिवा येथील खाडी किना-यावर कचरा टाकायला सुरुवात केलेली आहे. त्यामुळे खाडी किना-यावरील खारफुटी नष्ट झालेली आहे. याचा गैरफायदा घेऊन झोपडपट्टीदादांनी तेथे भराव टाकून अतिक्रमण करण्यास सुरुवात केलेली आहे.

प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, "तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तळोजा येथे शास्त्रोक्त पध्दतीने कच-याची विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प सुरु करण्यात येणार असून या प्रकल्पांतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील घनकच-याची विल्हेवाट लावण्यात येणार आहे." मी माहिती देऊ इच्छितो की या संदर्भात मुख्य सचिवांकडे दिनांक 4 मे 2013 रोजी बैठक झाली होती. त्या आधी ठाणे महानगरपालिकेने निविदेच्या माध्यमातून डायघर येथे घनकचरा प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या प्रकल्पास स्थानिकांचा विरोध असल्यामुळे डायघर येथील प्रकल्प बंद पडला आणि तो पुनश्च सुरु होईल याची शाश्वती नाही. दिनांक 30.1.2013 पासून "M/s. Renewgen Enviro Venture Ltd. with consortium M/s. Hitachi Zosen Inova" यांची लघुत्तम दराची निविदा स्थायी समितीने ठराव क्रमांक 3263 द्वारे पारित केली होती. उत्तरामध्ये विसंगती अशी आहे की, एका बाजूला महानगरपालिकेने ठराव केलेला आहे आणि दुसरीकडे तळोजाला प्रकल्प होणार आहे...

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. निरंजन डावखरे : माझा प्रश्न असा आहे की, तळोजा प्रकल्पामध्ये ठाणे महानगरपालिकेला समाविष्ट करण्यात येणार आहे काय ? दिनांक 23 मार्च 2009ला ठाणे महानगरपालिकेने एक ठराव केला होता आणि तो ठराव आजही जिवंत आहे. सभापती महोदय, या संदर्भात आपण एक बैठक घेऊन हा प्रश्न सोडवाल काय ?

श्री. उदय सामंत : सन्माननीय सदस्यांनी ठाणे महानगरपालिकेच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. त्याठिकाणी खाजगी 15 एकर जमिनीवर डम्पिंग ग्राऊंड आहे ही वस्तुस्थिती आहे. डायघर येथील वन खात्याची जमीन डम्पिंग ग्राऊंडसाठी देण्याचा निर्णय झालेला आहे. या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत...

संदर्भात माननीय विधानसभा अध्यक्ष यांनी बैठक घेतली होती. या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी येणे बाकी आहे.

सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे डम्पिंग ग्राऊंड हे खाडीच्या शेजारी असल्यामुळे पावसाळयात कचरा खाडीमध्ये जाऊ शकतो ही वस्तुस्थिती आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन डायघर मधील जमीन डम्पिंग ग्राऊंडसाठी देण्यास वन खात्याने तत्वत: मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर हे डम्पिंग ग्राऊंड खदानीमध्ये सुरु केले जाईल. त्यामुळे 15 एकर जमिनीचा प्रश्न उद्‌भवणार नाही. तळोजा येथील जो प्रकल्प जाईण्ट व्हेंचरमध्ये होत आहे त्यासंदर्भात स्थायी समितीने केलेला ठराव मंजुरीच्या स्तरावर आहे. परंतु पूर्वीचा हिंजर कंपनीचा बीओटी तत्वावरचा प्रकल्प फिझिबल नसल्यामुळे थांबलेला होता. आता हा नवीन प्रकल्प अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरुन होणार आहे. त्यामुळे तळोजाचा पर्याय नक्की ठेवला जाईल आणि ठाण्याचा प्रकल्प देखील पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

श्री. गोपीकिसन बाजोरीया : उत्तरामध्ये असे सांगितलेले आहे की, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये दैनंदिन 650 मे. टन घनकचा-याची विल्हेवाट खाजगी जमिनीवर करण्यात येते. मंत्री महोदयांनी सांगितले की, 15 एकर खाजगी जमिनीवर खाजगी जमीन मालकाच्या संमतीने कचरा टाकण्यात येतो. तेव्हा खाजगी जमीन मालका सोबत जमिनीच्या भाडेपट्टयासंबंधी महानगरपालिकेने करार केलेला आहे काय ? तसेच ही जागा ठाणे महानगरपालिकेने विकास आराखड्यामध्ये कोणत्या कारणासाठी ठेवलेली आहे ?

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

ता.प्र.क्र.42735.... श्री.गोपीकिसन बाजोरिया....

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, तळोजा येथे शास्त्रोक्त पध्दतीने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करण्यात येत आहे. ठाणे महानगरपालिकेच्या विकास आरखडयात घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी किती जागा आरक्षित ठेवण्यात आलेली आहे ? आपण ज्या तिन्ही जागा दाखविता आहात, त्या जागांना कायद्याप्रमाणे मायनर मॉडिफिकेशन (37) ची कार्यवाही करुन ती जागा डंपींगसाठी ठेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, खाजगी जमीन कोणत्याही लीज बेसीसवर घेतलेली नाही. संमतीपत्रावर ती जमीन घेतलेली आहे. सदर खाजगी जमिनीच्या वापरासंदर्भात ठाणे महानगरपालिका खाजगी जमीन मालकास कोणत्याही प्रकारचा निधी देत नाही. तळोजा येथे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प हा एमएमआरडीएच्या माध्यमातून होतो आहे. एमएमआरडीएची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, तो प्रकल्प डायगर मध्ये करणार होतो. हिंजर नावाची कंपनी होती, त्यांनी तो प्रकल्प महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या ठरावाप्रमाणे केलेला होता. परंतु काही तांत्रिक अडचणी आल्यामुळे तो प्रकल्प होऊ शकला नाही. म्हणून अत्याधुनिक तंत्राचा वापर करुन महानगरपालिकेने ठरविलेल्या जागेवरच हा प्रकल्प करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. तो प्रकल्प देखील अंतिम टप्प्यामध्ये आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : ठाणे महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनासाठी दुसरी जागा निवडलेली आहे त्यासाठी आपण कायदेशीर मायनर मॉडिफिकेशन (37) ची कार्यवाही करण्यात येईल काय ? वन जमीन ही ग्रीन झोनमध्ये असते. या ठिकाणी आश्वासन दिले जाते आहे की, वन जमिनीची जागा घनकचऱ्यासाठी देऊ. अशी जागा दिली तर नंतर पुन्हा मॉयनर मॉडिफिकेशच्या अडचणी येतात. वर्षानुवर्षे अडचणी तशाच राहतात. माझ्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांकडून आलेली नाहीत. ती खाजगी जागा कशासाठी आरक्षित आहे ? आपण सुचविलेल्या जागेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणार काय ?

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42735....

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, ही खाजगी मालकाची 15 एकर जमीन आहे. खाजगी मालकाने महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारचा निधी न घेता ठाणे शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी सदर जमीन उपलब्ध करुन दिलेली आहे. दुसरी वन खात्याची जमीन आहे.त्यावर आपण प्रकल्प करीत नसून त्यावर वन खात्याच्या जागेमध्ये ज्या खदानी, खाणी आहेत. त्या खाणीमध्ये घनकचरा टाकण्यास तत्वत: मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण बोर्डाचे एनओसी येणे बाकी आहे. सदर एनओसी आल्यानंतर आता जो खाजगी जागेत घनकचरा टाकला जातो आहे, तो घनकचरा त्या ठिकाणी टाकणे बंद होईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : ती खाजगी जमीन रहिवासी क्षेत्रात असेल तर त्या जमिनीवर घनकचरा टाकण्यास अनेक रहिवाशांनी हरकती घेतल्या असतील. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, ही खाजगी जमीन ठाणे महानगरपालिकेच्या विकास आराखडयात कशासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे ? अनेक जागा महानगरपालिकेने सुचविलेल्या आहेत, त्या जागा महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असतील तर महानगरपालिकेकडून कलम 37 ची कार्यवाही करण्यात येईल काय ? जर सदर जागा महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर असतील तर त्याबाबत कलम 20 ची कार्यवाही करुन त्यांना कायदेशीर करणार काय ?

श्री.उदय सामंत : सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न विचारला आहे, त्याबाबतची माहिती घेण्यात येईल आणि ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. दुसरा खदानी आणि खाणींचा प्रश्न आहे. वन विभागाच्या जमिनींवर कोणत्याही प्रकारचा अत्याधुनिक प्रकल्प होत नाही. ज्या ठिकाणी प्रकल्प होतो आहे ती जागा महानगरपालिकेने आयडेंटीफाय केलेली आहे. त्याच ठिकाणी प्रकल्प होतो आहे. तळोजा येथे जो प्रकल्प होतो आहे, तो एमएमआरडीएमार्फत होतो आहे. तळोजा प्रकल्प झाला व डायगरला विरोध झाला तर तो प्रकल्प घनकचऱ्याच्या व्यवस्थापनेसाठी भाडयाने घेणार आहात काय अशा प्रकारचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. या बाबतीत मी स्पेसिफिक उत्तर दिले आहे की, डायगर प्रकल्पाबाबत काही अडचणी निर्माण झाल्या तर तळोजा येथील प्रकल्पाच्या माध्यमातून घनकचऱ्याचा प्रश्न सोडविला जाईल.

श्री.मोहन जोशी : राज्यातील घनकचरा व्यवस्थापनाच्या बाबतीत मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल झाली होती. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक 2 एप्रिल, 2013 रोजी यासंदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42735....

श्री.मोहन जोशी....

राज्य शासनाला आदेश दिलेले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्याच्या संदर्भात राज्य शासनाला कोणत्या प्रकारचे आदेश दिलेले आहेत ?

श्री.उदय सामंत : हा प्रश्न ठाणे महानगरपालिकेच्या डंपींग ग्राऊंडशी संबंधित आहे. त्यामुळे ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्याच्या अनुषंगाने मी संपूर्ण माहिती सभागृहाला दिलेली आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खामगांव (जि.बुलढाणा) नगरपरिषदेच्या सन २०११-१२ या वित्तीय वर्षात झालेल्या लेखा परीक्षणामध्ये घेतलेल्या आक्षेपाबाबत

(५) * ४२९८० श्री.पांडुरंग फुंडकर, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) नगरपरिषदेच्या सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण सहाय्यक संचालक, स्थानिक निधी व लेखा परीक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी वा त्या सुमारास केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा कार्यालय, बुलढाणा यांनी खामगाव नगरपरिषदेच्या इमारतीचे बाहेरील व आतील कॉलमला स्टील कलॅडींग करण्याच्या कामात अनियमितता झाल्याबाबत व इतर एकूण ९६ आक्षेप नोंदविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॉलमला स्टील कलॅडींगचे काम बांधकामाच्या अंदाज पत्रकामध्ये समाविष्ट नसतानाही व कंत्राटदारास लेखी आदेश नसताना रुपये २१,०८,६००/- इतक्या रकमेचे काम कंत्राटदाराने केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील अहवालातील आक्षेपांसंदर्भातील अनुपालन विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन अमरावती विभाग यांचेकडे कधी सादर केला आहे,

(५) असल्यास, सदरहू कामाबाबत सहाय्यक लेखा परीक्षक, बुलढाणा यांनी सन २०११-२०१२ मध्ये केलेल्या लेखा परीक्षण अहवालात घेतलेल्या आक्षेपानुसार संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्यापि, मुख्याधिकारी, खामगाव नगरपरिषद यांनी कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. सदर कामाचे अंदाजपत्रकास महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम ७२ नुसार सर्वसाधारण सभेची मंजुरी तसेच तांत्रिक मंजुरी घेण्यात येवून रितसर कामाच्या निविदा आमंत्रित करुन कामाचे आदेश कंत्राटदारास दिल्यानंतर काम करण्यात आले आहे. मंजूर अंदाजपत्रकानुसार कंत्राटदाराने काम केले असून त्यामध्ये अनियमितता झालेली नाही.

(४) मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा १९३० च्या कलम १० (१) नुसार लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून ४ महिन्यांच्या आत आक्षेपांचे अनुपालन स्थानिक निधी लेखापरीक्षण विभाग बुलढाणा येथे सादर करणे आवश्यक आहे. नगरपरिषदेला लेखापरीक्षणाची प्रत दिनांक २.४.२०१३ रोजी प्राप्त झाली असून कलमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रारुप अनुपालन अहवाल संबंधित मुख्याधिकारी यांचेकडून स्थानिक निधी लेखापरीक्षण विभाग बुलढाणा यांना सादर करण्यात येत आहे.

(५) व (६) सदर कामामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही. घेतलेले आक्षेप मान्य नसल्यामुळे या बाबत संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदर आक्षेपांचे सविस्तर अनुपालन अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षण विभाग बुलढाणा यांच्याकडे आक्षेप वगळण्याकरीता सादर करण्यात येत असल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४२९८०.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खामगाव नगरपरिषदेच्या सन २०११-१२ च्या लेखापरीक्षणासंबंधीचा हा प्रश्न आहे. या लेखापरीक्षणामध्ये लेखापरीक्षकांनी जवळपास ९६ आक्षेप नोंदविले आहेत. उत्तरामध्ये अनियमितता झाली नसल्याचे नमूद केले आहे. माझ्याकडे लेखापरीक्षण अहवालाची प्रत उपलब्ध आहे. त्या अहवालामध्ये लेखापरीक्षकांनी म्हटले आहे की, सदर नस्ती मोजमाप पुस्तिकेतील पडताळणी केली असता लेखापरीक्षणाचे पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत. "Pro and fixing A1 composite panel on top of above coloums" चे काम हे अंदाजपत्रकात समाविष्ट नसताना कंत्राटदारास तसे कोणतेही लेखी आदेश नसताना वरील काम केलेले आहे. हा लेखापरीक्षकांचा आक्षेप आहे. अंदाजपत्रकानुसार नगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील आतील व बाहेरील एकूण पूर्ण आणि अर्ध्या असलेल्या २२ कॉलमकरिता कलॅडींगचे काम असताना मोजमाप पुस्तिकेतील मोजमापानुसार कंत्राटदाराने लेखी आदेश नसताना ३२ कॉलमना कलॅडींग कसे केले याबाबत खुलासा करावा. याबाबत स्वयंस्पष्ट खुलासा निश्चित करावा, अन्यथा जादा प्रदानाची परिगणना करुन वसुली दर्शवावी हा गंभीर आरोप आहे.

सभापती महोदय, पुढे त्यांनी असे म्हटले आहे की, नगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसताना नागरिकांना पुरविण्याच्या मूलभूत सोयी सुविधाकरिता नियोजन करणे आवश्यक असताना नगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीचे सुशोभिकरण करण्यावर मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला. तसेच नगरपालिका अंदाजपत्रकामध्ये तरतूद नसल्याने आकस्मिक खर्चाची स्थिती निर्माण झाल्याचे भासवून घाईगर्दीत खास सभेत सदर खर्चाची तरतूद करण्यात आली. ही बाब अधिनियमाचे उल्लंघन करणारी आहे असे लेखापरीक्षकांनी म्हटले आहे.

सभापती महोदय, सहावा आक्षेप हा पाणी पुरवठ्यासंबंधी आहे. त्यात म्हटले आहे की, सदर नस्तीची पडताळणी केली असता यावर लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. वरील कामाची मोजमाप पुस्तिका, निविदा प्रपत्र व कामाचे अंदाजपत्रक लेखापरीक्षणाच्या वेळी वारंवार तोंडी व लेखी पत्र क्र.९, दिनांक २६.११.२०१२ रोजी सूचना करुनही अभिलेखे वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे पडताळणी करता आली नाही. वरील कामासाठी ३ निविदा प्राप्त झाल्या. मे.परफेक्ट इंजिनिअरिंग, मुंबई १३१ टक्के जादा दराने, मे.पेट्रॉन इंजिनिअरिंग, मुंबई ११७ टक्के

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व प्रतिभा इंजिनिअरिंग, मुंबई १२२ टक्के जादा दराने निविदा प्राप्त झालेली असताना जिल्हा दर सूचीपेक्षा १०० टक्क्यापेक्षा अबोव्ह दराने निविदा प्राप्त झाल्याने फेरनिविदा का मागविण्यात आल्या नाहीत किंवा सुधारित अंदाजपत्रक का तयार केले नाही? कमी दराची निविदा पेट्रॉन इंजिनिअरिंग, मुंबई यांची ११७ टक्के जादा दराने वाटाघाटी करुन १५३.४४ टक्के जादा दराने कामाचे आदेश देण्यात आले. पर्यायाने शासकीय अनुदानाचे नुकसान झाले. नगरपालिकेचे २२ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. अशा अबोव्ह निविदा मंजूर करणे हा गंभीर आक्षेप आहे. २२ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे लेखापरीक्षकांनी म्हटले आहे. आपण अनुपालन अहवाल आलेला नसल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही असे म्हटले आहे. लेखापरीक्षकांनी जो आक्षेप नोंदविला आहे त्याबद्दल अनियमितता झाली नाही असे उत्तर दिले आहे. लेखापरीक्षकांनी अनियमितता झाली असल्याचे नमूद केले आहे. यापैकी वस्तुस्थिती काय आहे?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, लेखापरीक्षणामध्ये ९६ आक्षेप नोंदविण्यात आले आहेत ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. नगरपालिकेच्या इमारत दुरुस्तीवर २१ लाख रुपये खर्च करण्यात आल्यामुळे लेखापरीक्षणामध्ये आक्षेप आलेला आहे, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. २१ लाख रुपये इमारतीवर खर्च करण्यात आलेला असला तरी ही सर्व प्रक्रिया नियमाप्रमाणे सभा घेऊन पार पाडलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : माझ्याकडे लेखापरीक्षणाच्या अहवालाची प्रत उपलब्ध आहे. लेखापरीक्षकांनी जे म्हटले आहे ते चुकीचे असेल तर असत्य अहवाल दिल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय?

नंतर एम.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 42980.....

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, नगरपालिकेच्या इमारतीचे नूतनीकरण केले गेले त्यासंदर्भात 96 आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. लेखा परीक्षणामध्ये ज्या ज्या त्रुटी आलेल्या आहेत त्यासंदर्भातील माहिती सन्माननीय सदस्यांकडून घेऊ व त्या माहितीमध्ये काही तथ्य आढळल्यास योग्य ती कारवाई केली जाईल. या ठिकाणी जो स्पेसिफिक प्रश्न विचारण्यात आलेला आहे, त्यासंदर्भात मला एवढेच सांगावयाचे आहे की, दि. 16/3/2011 रोजी खास सभा घेऊन नूतनीकरणाच्या टेंडरचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. दि. 28/5/2011 रोजी सर्वसाधारण सभेने नियम 72 नुसार, मान्यता दिली व दि. 29/6/2011 रोजी तातडीची खास सभा घेऊन कमी दराची निविदा मान्य करण्यात आली. 21 लक्ष रुपयांच्या अधीन राहून 10 लक्ष रुपयांच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जो अधिकार आहे, त्यासंदर्भात 1.69 लक्ष रुपये किंमतीचे ॲल्युमिनियमचे जे पत्रे लावावयाचे होते .....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कोणत्याही प्रकारची निविदा प्रसिध्द न करता, मंजुरी न घेता 21 लक्ष रुपये खर्च करण्यात आले, असा ठपका लेखा परीक्षकांनी ठेवलेला आहे. दुसरा आक्षेप पाणी पुरवठयाच्या संदर्भात आहे. नगरपालिकेचे 22 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. 100 पट अधिक किंमत असलेली निविदा मंजूर करण्यात आलेली आहे, हे दोष आपल्याला गंभीर वाटत नाहीत काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नासंदर्भात एकंदर 96 आक्षेप घेण्यात आले होते. या संदर्भात अनुपालन अहवाल सादर करण्यात येत आहे. आक्षेप वगळण्यासंदर्भात अजून मुदत शिल्लक आहे. सन्माननीय सदस्यांनी कॉलमला जे कॅलडींग करण्यात आलेले आहे त्यासंदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. कॅलडींगची गरज आहे काय, सुशोभिकरण करण्याची आवश्यकता होती काय यामध्ये दुमत असू शकते. या ठिकाणी 21 लाखाचे कॅलडींग करण्यात आले असून 17 लक्ष रुपये देण्यात आलेले आहेत. मी आपल्याला एवढीच विनंती करु इच्छितो की, जे 96 आक्षेप लेखा परीक्षणात आलेले आहेत, त्याचे उत्तर देण्याची संधी आपण दिली पाहिजे. अनुपालन अहवाल सादर झाल्यानंतर तो तपासून घेण्यात येईल व त्यामध्ये जर काही अनियमितता झाल्याचे दिसून आले तर निश्चितपणे योग्य ती कारवाई करण्यात येईल. परंतु कॅलडींग करावे की, न करावे हा वादाचा विषय होऊ शकतो. आक्षेप वगळण्यासाठी अनुपालन अहवाल सादर करण्याकरिता वेळ लागणार आहे. अनुपालन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी करुन योग्य ती कारवाई केली जाईल, एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-07-2013 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M-2

SGJ/ D/ MMP/ प्रथम श्री. भोगले..... 12:50

औरंगाबाद एमआयडीसी येथील बौध्द स्मशानभूमीवर झालेले अतिक्रमण

(६) * ४२८८० श्री. विजय गिरकर : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद एमआयडीसी येथे सन १९६० पासून बौध्द स्मशानभूमी असून तेथे अंत्यसंस्कार करण्यासाठी शेडची उभारणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९० मध्ये श्री.पंडितराव थोरात यांनी या स्मशान भूमी शेजारी दत्त सोप या कंपनीची स्थापना करुन बौध्द स्मशान भूमीच्या जागेवर अतिक्रमण करुन स्मशानभूमीवरील बोअरवेल व शेडचे बांधकाम पाडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.पंडितराव थोरात यांनी अतिक्रमण करुन स्मशान भूमीवरील बोअरवेलचे व शेडचे बांधकाम पाडून टाकले अशी तक्रार पंचशीलाबाई सतीश नरवाडे यांनी दिनांक १२ एप्रिल, २०१३ रोजी वा त्या सुमारास स्थानिक पोलीस स्थानक, विभागीय आयुक्त, पोलीस उपायुक्त, आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.पंडितराव थोरात हे राजकीय पुढाऱ्यांचे नातेवाईक असल्याने त्यांचेविरुध्द पोलिसांकडून कारवाई होत नसल्यामुळे स्थानिक बौध्दांवर उघड्यावर अत्यंसंस्कार करण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता : (१) होय.

(२), (३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांना सखोल तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, औरंगाबाद एमआयडीसी येथे १९६० पासून बौध्द स्मशान भूमी आहे. या स्मशानभूमीच्या बाजूला थोरात यांनी १९९० मध्ये सोप कंपनी बांधली. या ठिकाणी बौध्द स्मशानभूमी आहे काय, असा प्रश्न विचारला असून त्याला आपण "होय" असे उत्तर दिलेले आहे. श्री. पंडितराव थोरात यांनी बौध्द स्मशानभूमीच्या बाजूला जी सोप कंपनी बांधली त्याकरिता त्यांनी बौध्द स्मशानभूमीचे शेड तोडले, बोअरवेल तोडली. या स्मशानभूमीमध्ये बौध्द समाजातील लोकांना उघडयावर प्रेते जाळावी लागतात. हे शासन सातत्याने महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेत असतांना देखील आज बौध्द समाजावर अशा प्रकारे अन्याय होतो आहे. श्री. थोरात हे मंत्री महोदयांचे नातेवाईक असल्यामुळे बौध्द समाजावर अन्याय होतो आहे.

सभापती महोदय, श्री. थोरात यांच्या विरुध्द दि. १२ एप्रिल रोजी पत्र दिलेले असून आता चार महिन्यानंतर असे म्हटले जात आहे की, "सूचना देण्यात आलेल्या आहेत." चार महिन्यात काय कारवाई केली व बौध्द समाजावरील अन्याय कसा दूर केला जाणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

१७-०७-२०१३ (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M-३

SGJ/ D/ MMP/ प्रथम श्री. भोगले..... १२:५०

ता.प्र.क्र. ४२८८०.....

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, सन १९७४ च्या अगोदर त्या ठिकाणी बौध्द धर्माची स्मशानभूमी होती व त्या ठिकाणी ओटे सुध्दा अस्तित्वात होते. श्री. थोरात यांची त्या ठिकाणी साबण फॅक्टरी असून ते या विषयाच्या संदर्भात कोर्टात गेले व कोर्टाने सर्व प्रोसिजरला स्टे दिला. हा महाराष्ट्र शाहू, फुले, आंबेडकरांचाच आहे, हे आम्ही मान्य करतो व त्या सर्वांचा आदर करुनच आपण राज्य चालवित आहोत. या विषयाच्या संदर्भात अशा प्रकारचे आदेश दिले आहेत की, एमआयडीसीचा प्लॉट क्रमांक २,३ बौध्द समाजाला स्मशाभूमीसाठी देता येत नसेल तर या प्लॉटच्या बाजूला सरकारी जमीन असून त्या ठिकाणी एक नाला आहे. लवकरात लवकर कार्यवाही करुन ही जागा बौध्द समाजाच्या स्मशान भूमीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42880...

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन 1960 पासून बौद्ध स्मशान भूमी आहे. 1990 मध्ये सोप फॅक्टरी बांधण्यात आली आहे. 1960 पासून बौद्ध स्मशान भूमी असताना स्मशानभूमीसाठी वेगळी जागा देण्यात येईल असे शासन का सांगत आहे ? मूळात तेथे बौद्ध स्मशानभूमी असताना शासन सांगते की, आम्ही फुले, आंबेडकर यांच्या विचारसरणीचे आहोत.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, 1974 मध्ये श्री.थोरात यांनी पिटीशन दाखल केले होते. त्यानंतर कोर्टाने स्टे दिला आहे. मी स्पष्टपणे सांगितले आहे की, आंबेडकरवादी चळवळीतील जनतेला स्मशानभूमी पासून वंचित ठेवले जाणार नाही. तशा सूचना देखील दिलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर विभागीय आयुक्तांना देखील सूचना दिल्या आहेत की, ताबडतोब जागा आयडेन्टीफाय करून ती जागा बौद्ध स्मशानभूमीसाठी देण्यात यावी.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद महानगरपालिकेने जलवाहिनीसाठी केलेल्या खर्चाच्या तपशीलाची माहिती उपलब्ध नसल्याबाबत

(7) * 42242 श्री.सतीश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.एम.एम.शेख : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद महानगरपालिकेने 4 वर्षात जायकवाडी ते नक्षत्रवाडीपर्यंतच्या जलवाहिनी व शहराअंतर्गत जलवाहिनीसाठी 163 कोटी रुपये दुरुस्तीसाठी खर्च केले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर खर्चाची तपशीलवार माहिती महानगरपालिकेकडे उपलब्धच नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेने सन 2009-10 ते सन 2012-13 या आर्थिक वर्षात मुख्य योजना व वितरणप्रणाली अंतर्गत जलवाहिन्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रु.323.10 लक्ष इतका खर्च केला आहे.

(3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय मंत्री महोदयांना उत्तरामध्ये दुरूस्ती करावयाची आहे काय असे विचारू इच्छितो.

श्री.उदय सामंत : नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, सन 2009 ते 2013 पर्यंत एकूण साडेतीन कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत असे उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.किशनचंद तनवाणी यांनी नियम 93 अन्वये सूचना उपस्थित केली होती. त्यास माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले लेखी उत्तर माझ्याकडे आहे. त्यात आपण नमूद केले आहे की, रूपये 17.00 कोटी खर्च करण्यात आले आहेत. तेव्हा यात नेमके खरे उत्तर कोणते आहे ? ज्या चोराने चोरी केली आहे त्याचे स्टेटमेंट येथे वाचून दाखविण्यात येत आहे. यात नेमके खरे काय आहे ते आम्हाला अवगत करावे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, औरंगाबाद नळ पाणी पुरवठ्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, रूपये 161.00 कोटी खर्च करण्यात आले आहेत काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला आहे की, मागचे उत्तर खरे आहे की, हे उत्तर खरे आहे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन 2009-2010 मध्ये जायकवाडी मुख्य योजनेसाठी रूपये 21 लक्ष 46 हजार खर्च करण्यात आले आहेत. सन 2010-2011 मध्ये रूपये 25 लाख 65 हजार रूपये खर्च केले आहेत. सन 2011-2012 मध्ये रूपये 15 लाख 30 हजार खर्च केले आहेत. सन 2012-2013 मध्ये रूपये 24 लाख 73 हजार रूपये खर्च केले आहेत. या तीन वर्षाची आकडेवारी केली तर ती 3 कोटी 23 लाख 10 हजार रूपये खर्च केले आहेत हे दिसून येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात आहेत. आता गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आपल्याला अधिकारी कसे बनवित आहेत याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे. मागच्या अधिवेशनामध्ये म्हणजे दिनांक 17 मार्च 2013 रोजी नियम 93 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या सूचनेला उत्तर देण्यात आले आहे. यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, रूपये 16 कोटी 35 लाख रूपये खर्च झालेले आहेत. आता येथे जे उत्तर देण्यात आले आहे त्यात 3 कोटी 23 लाख रूपये इतका खर्च केला आहे असे नमूद केले आहे. एवढी तफावत माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या विभागामध्ये येण्याचे कारण काय आहे ? म्हणजे अधिकारी कशा प्रकारे काम करीत आहेत याचे हे जीवंत उदाहरण आहे. ज्या अधिकाऱ्याने खोटे उत्तर दिले असेल त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात हे सांगून नंतर मग मूळ प्रश्नाला उत्तर द्यावे. आमचे असे म्हणणे आहे की, यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित केले पाहिजे. त्यानंतर आपण मूळ प्रश्नाच्या उत्तरावर यावे. हा महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नास उत्तर द्यावे अशी आमची अपेक्षा आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, "खोटे" या शब्दा ऐवजी "असत्य" असा शब्दप्रयोग करण्यात यावा अशी माझी विनंती आहे. आता सदनाच्या पावित्र्याचा विषय निर्माण झाला आहे. आपल्याच खात्याचे मंत्री चार महिन्यापूर्वी एक उत्तर देतात आणि आता अधिकाऱ्यांना वाचविण्याकरिता दुसरे उत्तर देतात. हा सभागृहाचा अवमान आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी मागच्या अधिवेशन सत्रामध्ये शासनाने रूपये 16.00 कोटी इतका खर्च केल्याची बाब निदर्शनास आणली व आता शासनातर्फे रूपये 3.00 कोटी खर्च केल्याचे सांगण्यात येत आहे असे निदर्शनास आणले. ही बाब अत्यंत गंभीर आहे. विशेषाधिकाराचा भंग होणारी ही बाब आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची इच्छा असल्यास त्यांनी संबंधितांविरूद्ध विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव सादर करावा. कारण हा प्रश्न त्यांचा आहे. आता येथे माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांनी यात तातडीने लक्ष घालणे आवश्यक आहे. येथे शिवसेना-भाजपची सत्ता आहे. असे असताना अधिकारी अशा प्रकारची चोरी करत असतील तर सत्तेतील लोक बदनाम होतात.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42242....

श्री.दिवाकर रावते.....

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दुसऱ्या क्रमांकाच्या लक्षवेधी सूचनेचा विषय देखील अशाच स्वरुपाचा आहे. तेव्हा आपण अशा अधिकाऱ्यांना संरक्षण देणार आहात काय ? अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे दोषाचे खापर लोकप्रतिनिधींवर येते आणि अधिकारी चैन करीत राहतात. त्यातील हा प्रकार आहे. तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदय या प्रकरणी तातडीने लक्ष घालून सचिव पातळीवर चौकशी करण्याचे आदेश देतील काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, औरंगाबादला पाणी पुरवठा करण्याकरिता अनेक पर्याय उपलब्ध आहेत. यातील काही पर्याय जुने व कालबाह्य झालेले आहेत. त्यामध्ये जुनी नहर प्रणाली, हरसूल पाणी पुरवठा आणि जायकवाडीची जुनी आणि नवीन पाणी पुरवठा योजना अशा चार योजनांतून औरंगाबादला पाणी पुरवठा होतो. लेखी उत्तरामध्ये मागील चार वर्षाची देखभाल दुरुस्तीच्या खर्चाची माहिती दिलेली आहे. देखभाल दुरुस्ती खर्च, जायकवाडी मुख्य योजनेकरिता आणि वितरण व्यवस्थेकरिता एकूण 3 कोटी 23 लाख रुपये खर्च झालेला आहे अशी माहिती माननीय राज्यमंत्री महोदयांनी दिली. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, मागील उत्तरामध्ये दिलेली माहिती आणि आताच्या उत्तरामध्ये दिलेली माहिती यामध्ये विसंगती आहे. जी काही विसंगती दिसत आहे त्याची सत्यता पडताळून त्या संदर्भातील माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल्.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नवनिर्वाचित माननीय राज्यमंत्री श्री.उदय सामंत यांचे अभिनंदन</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नवनिर्वाचित राज्यमंत्री श्री.उदय सामंत यांनी आज प्रश्नोत्तराच्या तासामध्ये चांगल्या प्रकारे उत्तरे दिली. तत्कालीन राज्यमंत्री महोदयांना वाटत होते की माझ्या शिवाय कोणी चांगल्याप्रकारे काम सांभाळू शकणार नाही याला माननीय राज्यमंत्री महोदय श्री.उदय सामंत यांनी चोख उत्तर दिले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "महाराष्ट्र राज्य जात पडताळणी विनियमन 2000 ची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आल्याने महाराष्ट्रातील शासकीय आणि निमशासकीय सेवेतील सुमारे एक लाख कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या संपुष्टात येण्याची शक्यता" या विषयावर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली आहे. या सूचनेबाबत त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, राज्य जात पडताळणी विनियमन 2000 ची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे. जात पडताळणीच्या कठोर अंमलबजावणीमुळे एक मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांना 31 जुलैची डेडलाईन दिलेली आहे. त्यामुळे जवळपास 1 लाख लोकांच्या नोकऱ्या संपुष्टात येण्याची शक्यता आहे. अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या पदांवर जे अधिकारी वा कर्मचारी कार्यरत किंवा शिक्षक कार्यरत आहेत त्या सर्वांना 31 जुलै महिन्याच्या आत जात प्रमाणपत्र देणे शक्य नाही. शासकीय कर्मचाऱ्यांची एवढीच मागणी आहे की, त्यांच्या सेवा संरक्षित कराव्यात आणि जी काही अंमलबजावणी करावयाची आहे ती पुढील काळात करावी.

सभापती महोदय, जात पडताळणी समितीकडे मोठी यंत्रणा देखील नाही. आदिवासी विरुध्द नॉन शेड्युल्ड ट्राईब असा जातीचा संघर्ष लावणे असे कारस्थान या मागे आहे. माझी विनंती आहे की, या विषयावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. सरकारी सेवेतील एक लाख कर्मचाऱ्यांच्या नोकरीचा हा प्रश्न आहे. हे सर्व कर्मचारी देशोधडीला लागतील. त्यांच्या सेवा तातडीने संरक्षित करण्याची गरज आहे. माझ्या तीन मागण्या आहेत. आपण चर्चेसाठी वेळ दिल्यास मला त्या मांडता येतील. ट्राईबलच्या जेवढ्या जागा आहेत तेवढ्या जागा बॅकलॉग म्हणून मान्य केल्या तर त्यास आदिवासी विकास विभागाचा विरोध असणार नाही. आपण असा निर्णय घेतल्यास दोन्ही घटकांचे संरक्षण होऊ शकेल. परंतु असा मध्यम मार्ग न काढता 31 जुलैच्या आत जात प्रमाणपत्र सादर करण्याची घाई सरकारला झालेली आहे. कायद्याचे पालन केले पाहिजे ही गोष्ट खरी असली तरी एक लाख कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या पाच लाख लोकांना शासन देशोधडीला लावत

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

आहे आणि ते निर्दयपणाचे ठरेल. या प्रश्नापेक्षा दुसरा कोणताही महत्वाचा प्रश्न असू शकत नाही. तेव्हा या विषयावर तातडीने चर्चा घ्यावी जेणेकरुन कर्मचाऱ्यांना न्याय मिळू शकेल अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी म.वि.प. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाबाबतची जी सूचना उपस्थित केली आहे त्या सूचनेतील विषय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीशी निगडित नसल्यामुळे मी उपरोक्त सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री.कपिल पाटील : महोदय, हा विषय अन्य मार्गाने उपस्थित करण्याची परवानगी द्यावी.

उप सभापती : ठीक आहे. हा विषय सन्माननीय सदस्यांनी अन्य मार्गाने उपस्थित करावा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.अनिल देशमुख (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "बीड (ता.जि.बीड) येथील प्रशासन व धान्य दुकानदार यांनी मिळून केलेल्या घोटाळ्याबाबत" या विषयावरील प्रा.सुरेश नवले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. व श्री. राजन तेली, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 13053 ला दिनांक 30 मार्च, 2011 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती जोडावी.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मोटार वाहन (तिसरी सुधारणा) नियम, 2013 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एम.व्ही.आर.0211/प्र.क्र.107 पुनर्बांधणी क्रमांक 26/परि -2, दिनांकित 24 जून, 2013 सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

पृ.शी.:/मु.शी.: लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 14 जुलै, 2006 रोजी श्री. भास्कर जाधव व इतर वि.प.स. यांनी नियम 101 अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार, "चिपळूण शहरालगत (जि.रत्नागिरी) असणाऱ्या खेर्डी औद्योगिक वसाहतीमधील सुमारे 90 टक्के कारखाने बंद अवस्थेत असणे", या बाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे अधिक माहिती जोडावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : सर्वप्रथम मी दिनांक 16 जुलै, 2013 रोजी प्राप्त झालेल्या म.वि.प. नियम 93 च्या सूचना वाचतो.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "एल.बी.टी. विरोधात दिनांक 15 व 16 जुलै, 2013 रोजी "महाराष्ट्र बंद" चा फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्राने दिलेला इशारा" या विषयावर सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) येथे सुरु असलेल्या दफनभूमीच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामास दिनांक 30 जून, 2013 रोजी श्री.हुसेन मोमीन यांनी विरोध करुन अल्पसंख्याक महिलांना केलेली मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर यांनी "स्पार्क या संस्थेने गेल्या 8 वर्षांमध्ये झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात केलेली दिरंगाई" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, डॉ.रणजित पाटील यांनी "नागपूर शहरातील शासकीय मुद्रणालयाची जीर्ण झालेली इमारत, परिणामी इमारत केव्हाही कोसळून त्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांच्या जीवितास निर्माण होणारा धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "दिनांक 18 मे, 2013 रोजीचे परिपत्रक रद्द करण्यासाठी मागासवर्गीय अधिकारी, कर्मचारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिनांक 17 जुलै, 2013 रोजी आंदोलन करण्याचा दिलेला

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती....

इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.चंद्रकांत पाटील यांनी "ठाण्यातील जलद वाहतूक सेवा प्रकल्पाला रुस्तमजी विकासकाकडून आळा घालण्याच्या प्रयत्नामुळे ठाणेकर जनतेत पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "शुक्रवार, दिनांक 12 जुलै, 2013 रोजी बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव-शेगांव मार्गावरील जगदंबा नगर चौकाजवळील टी पॉईंटवर शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या ऑटोला भरधाव वेगाने जाणाऱ्या स्कॉर्पिओ गाडीने धडक दिल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया, डॉ.रणजित पाटील यांनी "अकोला येथील ए.टी.आर.72 या प्रकाराच्या विमानासाठी 1 हजार 800 मीटर लांबीच्या धावपट्टीचा निर्णय अद्याप प्रलंबित असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "नातूनगर धरणामधून (ता.खेड, जि.रत्नागिरी) सुमारे 90 टक्के पाणी वाया जात असल्याने कालव्याची दुरुस्ती करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

उप सभापती ....

आता मी दिनांक 17 जुलै, 2013 रोजी नियम 93 अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांच्या संदर्भात निर्णय देत आहे.

सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, डॉ. रणजित पाटील यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील मौजे अटाळी येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादी टाकण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "नवीन मुंबई महानगरपालिकेने 8 वी चे नवीन वर्ग उच्च प्राथमिक शाळेस जोडण्याचा निर्णय घेतल्याने अनेक माध्यमिक शाळांचे 8 वी चे वर्ग बंद पडण्याची निर्माण झालेली भीती " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील, सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, रामनाथ मोते यांनी "यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस नगरपरिषदेच्या मालकीचे नांदगव्हाण धरण फुटल्याने नदीच्या पुरात वाहून गेलेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने मंजूर केलेला निधी खर्च न झाल्यामुळे लाभार्थी घरकुलांपासून वंचित राहिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, भाई गिरकर, चंद्रकांत पाटील यांनी "जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुनर्विकासास मंजुरी मिळू शकत नसल्यामुळे इमारतीतील रहिवाशांच्या जीवितास निर्माण झालेला धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "मुंबईतील 1995 पूर्वीच्या झोपड्यांना पात्र ठरविण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजित पाटील, यांनी "अवयव प्रत्यारोपणामध्ये होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी अवयव प्रत्यारोपणाच्या अर्जावरील निर्णय 4 आठवड्यामध्ये घेण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिल्याने या आदेशाची अंमलबजावणी तत्काळ करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी "मंगरुळपीर (जि.वाशिम) येथील गोदामात मोठ्या प्रमाणावर सुरु असलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

उप सभापती : आज माझ्याकडे दोन औचित्याचे मुद्दे आलेले आहेत. त्यामध्ये सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ज्या विषयावर औचित्याचा मुद्दा दिलेला आहे त्याच विषयावर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनीही एक औचित्याचा मुद्दा दिलेला आहे. ते आपला मुद्दा मांडतील त्यावेळी या विषयाला धरुन आपणही बोलू शकता.

डॉ. नीलम गोऱ्हे : ठीक आहे.

उप सभापती : माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी मौजे देवळाली येथील जागेच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सरकारने या विषयामध्ये तातडीने लक्ष घालावे यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. असे मुद्दे अनेक असतात. परंतु श्री. सुरेश वाडकर यांनी स्वत:ची जी एक खंत व्यक्त केली त्या निमित्ताने या मुद्याची चर्चा झाली. त्यांनी नाशिक जिल्ह्यातील मौजे देवळाली येथे सर्व्हे नं. 7/13/अ क्षेत्र 6,600 चौरस मीटर कब्जेदार असलेल्या श्री. विनायक विष्णू धोपावकर यांच्याकडून जमीन घेतली. श्री. धोपावकर यांच्या जमिनीच्या बाबतीत परस्पर श्री. दरगोडे नावाच्या एका बिल्डरने सुध्दा दुसरा व्यवहार केला. श्री. सुरेश वाडकर या प्रख्यात गायकाने आपले पैसे देऊन जमीन घेतली आणि सातत्याने ते प्रयत्न करीत आहेत पण महसूल खात्याचे अधिकारी त्यांना दाद देत नाहीत. त्यामुळे धोपावकर आणि जनरल मुख्यात्यारधारक श्री. सुरेश वाडकर यांनी उप विभागीय अधिकारी, नाशिक उप विभाग यांच्याकडे अपील सुध्दा केले होते.

कायद्यामध्ये शासकीय अधिकाऱ्यांना ज्या सोयी आहेत किंवा नियमात ज्या तरतुदी आहे त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 चे कलम 258 अन्वये पुन्हा फेर चौकशी करणे अभिप्रेत होते. ती चौकशी त्यांनी केली नाही. त्यांनी नाममात्र चौकशी केली. या निर्णयावर व्यथित होऊन श्री. सुरेश वाडकर यांनी अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या न्यायालयात अपील दाखल केले आहे. राज्य शासनाने गॅरंटी ऑफ लॅण्ड टायटलचा प्रकल्प त्वरित राबविल्यास असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

होणारे जमिनीचे वाद त्वरित संपुष्टात येतील हा पुढचा मुद्दा आहे. प्रख्यात गायक श्री. सुरेश वाडकर जे बोलले त्याच्याशी मी सहमत नाही. शेवटी श्री. सुरेश वाडकर यांना साडेसहा कोटी रुपयांची जमीन घेण्याइतका जो पैसा मिळाला तो या देशातील जनतेनेच दिलेला आहे. त्यांच्यापेक्षा अतिशय अन्याय आणि अत्याचार झालेले श्री. भोतमांगे यांनी सुध्दा कधीही देश सोडून जाण्याची भाषा केलेली नाही. श्री. सुरेश वाडकर यांची देश सोडण्याची भाषा चुकीचीच आहे. पण त्यापेक्षा त्यांना हे बोलावे लागण्याची भावना ज्यावेळी मनामध्ये येते आणि ज्या अधिकाऱ्यांमार्फत येते त्या अधिकाऱ्यांना आपण कोठे तरी चाप लावला पाहिजे.

सभापती महोदय, विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना अशा प्रकारची गोष्ट समोर आल्यानंतर आपण त्याची दखल घेतली पाहिजे. ती दखल घेऊन शासनाने या विषयामध्ये जर त्वरित कृती केली तर श्री. सुरेश वाडकर यांच्यासारखी मानसिकता व्यक्त करणाऱ्या लोकांच्या मागे लोक जाणार नाहीत. ही मानसिकता चुकीची आहे. देश सोडून कोणीही विदेशात सुखी राहिलेले नाहीत. तेथून कोणाला कधी लाथ मारुन बाहेर काढतील याचा नेम नाही. आपल्या देशामध्ये काहीही झाले तरी आपल्याला नक्की राहता येईल. विदेशात तुम्हाला कधीही बाहेर काढतील. पण तरी सुध्दा त्यांनी त्यांच्या ज्या व्यथा मांडलेल्या आहेत त्या व्यथा या राजकीय व्यवस्थेने लक्षात घेतल्या पाहिजेत. त्या व्यथांवर आपण मार्ग काढला पाहिजे. श्री. सुरेश वाडकर यांच्यासारखा प्रथितयश व्यक्ती बोलला म्हणून हा मुद्दा मीडियाने उचलला. श्री. भाई जगताप यांच्यासारखे बारीक बारीक गरीब बिचारे कितीतरी लोक आहेत. त्यांचे कोण ऐकतो ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

त्यामुळे कायद्यामध्ये ज्या सोयी सवलती आहेत त्यानुसार राज्य शासनाने गॅरेण्टी ऑफ लॅण्ड टायटलचा प्रकल्प त्वरित राबविल्यास (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप लॅण्ड घेऊ शकतात. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर घेऊ शकणार नाहीत. मुद्दा एवढाच आहे की, अशा प्रकारची घटना घडल्यानंतर त्याची शासनाने दखल घेतली पाहिजे. या विषयी शासनाने तातडीने हालचाल केली तर या राज्यात संवेदनशील शासकीय व्यवस्था आहे अशा प्रकारचा यामधून संदेश जाऊ शकतो.

श्री.भाई जगताप : हा खरोखर गंभीर विषय आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझे नाव घेतले आहे. त्यांच्याकडे सरकारची किती जमीन आहे ते मला माहीत नाही. परंतु माझ्याकडे सरकारची एक इंचही जमीन नाही. सरकारचा एकही रुपया आजपर्यंतच्या माझ्या राजकीय जीवनामध्ये, सार्वजनिक जीवनामध्ये मी घेतलेला नाही. याची नोंद असावी म्हणून हे मी बोलत आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथम आपले आभार मानते. पंढरपूरच्या वारकऱ्यांसंबंधीची लक्षवेधी सूचना काल सभागृहात चर्चेला येणे अपेक्षित होती. परंतु ती लक्षवेधी सूचना उद्या चर्चेला येणार आहे. पण दिनांक 19 जुलै, 2013 रोजी आषाढी एकदशीच्या निमित्ताने लक्षावधी वारकरी पंढरपूरकडे निघालेले आहेत. शासनाने पंढरपूर विकास प्राधिकरण जाहीर केलेले आहे. या प्राधिकरणासाठी दिलेला निधी कसा वापरला गेला आहे ते शासनाकडून स्पष्ट होणे आवश्यक आहे. कारण आजही वारकऱ्यांच्या हालअपेष्टा सुरु आहेत. विशेषत: अपघातग्रस्तांना द्यावयाची मदत, आरोग्याची सोय, पिण्याच्या पाण्याची सोय, पंढरपूर देवस्थानामध्ये भाविकांना गरुड खांबापर्यंत दर्शनासाठी थांबविले जाते असे अनेक प्रश्न आहेत. त्याचबरोबर पंढरपूरला भाविकांची गर्दी हाताळली जाते व स्वच्छतागृहांची टंचाई जाणवते, पंढरपूरच्या वारकऱ्यांनी असा इशारा दिला आहे की, आम्ही सोलापूर जिल्ह्यात लोकांना प्रवेश करु देणार नाही. उद्या या विषयासंबंधी लक्षवेधीच्या अनुषंगाने सरकारकडून उत्तर अपेक्षित असले तरी या लक्षावधी वारकऱ्यांचा विचार करुन शासनाने याबाबतची उपाययोजना लवकरात लवकर जाहीर करावी हे मी औचित्याच्या मुद्याद्वारे मांडत आहे.

उप सभापती : पंढरपूरला वारीला जाणाऱ्या सर्व वारकऱ्यांच्या संदर्भामध्ये राज्य शासनामार्फत योग्य ती काळजी घेतली जाईल अशी अपेक्षा मी देखील बाळगतो.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पॉईन्ट ऑफ प्रोसिजरसंबंधी</u>

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ प्रोसिजर आहे. मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मी लक्षवेधी सूचना दिली होती. ती स्वीकृतही करण्यात आली होती. या सभागृहाचा नियम असा आहे की, अधिवेशनाच्याशेवटच्या दिवशी ज्या लक्षवेधी सूचना चर्चेला आल्या नसतील त्याची निवेदने सभासदांना वितरित केली जातात. मागील अधिवेशन संपले, आता पावसाळी अधिवेशन सुरु झालेले आहे तरी सुध्दा माझ्या लक्षवेधी सूचनेचे निवेदन आजपर्यंत मला मिळालेले नाही. विधिमंडळाच्या या सर्वोच्च सभागृहाचा अशा पध्दतीने जर अधिकारी जाणूनबुजून अवमान करीत असतील तर त्यांच्याबाबतीत आपण कारवाई करावी आणि माझ्या लक्षवेधी सूचनेचे उत्तर मला कधी वितरित केले जाईल यासंबंधीची माहिती मला द्यावी.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांना मी सांगू इच्छितो की, आपण दिलेल्या लक्षवेधी सूचनेचे उत्तर या आठवड्यामध्ये येईल. यासंबंधी विधिमंडळाने समिती नेमलेली आहे. त्या समितीची बैठक 2-3 दिवसामध्ये होणार आहे. त्या बैठकीत आपण निर्णय घेऊ.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या संदर्भात या सदनामध्ये चर्चा झाली होती आणि कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीतही मी हा विषय उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय सभापतींनी ताकीद स्वरुपात सांगितले होते की, शक्यतो 4 दिवसात लक्षवेधी सूचनेचे निवेदन आले पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

असे असताना नियमाप्रमाणे उत्तर आले नाही. आम्हाला माननीय सभापतींची मेहरबानी नको आहे. आमच्या अधिकारांचे रक्षण करणे हे माननीय सभापतींचे काम आहे. मला अशी विनंती करावयाची आहे की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यासंदर्भात आपण स्वत:हून संबंधिता विरुध्द हक्कभंग दाखल केला पाहिजे. माननीय सभापतींनी दिलेल्या निर्देशांचे पालन झालेले नाही म्हणून संबंधित खात्याच्या प्रमुखांना जबाबदार धरले पाहिजे अशा प्रकारची चर्चा झालेली आहे. तेव्हा या संदर्भात आपणाकडून सभागृहाच्या वतीने हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल झाला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील (मालाड पूर्व) आप्पा पाडा येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या इमारतीवर अनधिकृतपणे उभारलेले मोबाईल टॉवर्स

मु. शी. : मुंबईतील (मालाड पूर्व) आप्पा पाडा येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या इमारतीवर अनधिकृतपणे उभारलेले मोबाईल टॉवर्स यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण व श्री. किरण पावसकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुंबईतील मालाड पूर्व आप्पा पाडा येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या इमारतीवर अनधिकृतरित्या ३० मोबाईल टॉवर उभारलेले असणे, या शाळेतील जवळपास २५०० विद्यार्थ्यांच्या तसेच, परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर यामुळे होत असलेला विपरित परिणाम तसेच, या शाळेतील संचालक समशेर सिंह यांनी या शाळेच्या मुख्याध्यापिकेच्या नकली सह्या करुन चुकीच्या जाहिराती काढल्यामुळे या मुख्याध्यापिकेवर दखलपात्र गुन्हे नोंदविले जाऊन दंडात्मक कारवाई होणे, या शाळेतील मुख्याध्यापिका, शिक्षकांना संचालकांमार्फत होत असलेली दमदाटी शिक्षक भरतीसाठी अवैधरित्या सुमारे लाख-लाख रुपये घेऊन त्यांची फसवणूक करणे, या संदर्भात शालेय शिक्षण विभाग, पोलीस स्टेशन येथे दिनांक ४ जुलै, २०१३ रोजी वा त्यासुमारास तक्रार करुनही त्याची दखल न घेणे, परिणामी या शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापिका, विद्यार्थी व परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यांत येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मालाड मधील कुरार व्हिलेज येथील आप्पा पाडा या ठिकाणी स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या इमारतीवर अनधिकृतपणे 30 मोबाईल टॉवर्स उभारण्यात आलेले आहेत. या शाळेमध्ये इंग्रजी, हिंदी आणि मराठी अशा तीन माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविले जाते. या शाळेमध्ये 2500 मुले शिकत आहेत. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये ही संख्या 2300 इतकी दर्शविण्यात आलेली आहेत. या शाळेच्या इमारतीवर 30 मोबाईल टॉवर्स उभारल्यामुळे महानगरपालिकेने या शाळेला नोटीस दिलेली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. ही शाळा 24 वर्षापूर्वी बांधलेली असून इमारतीचे स्लॅब अतिशय कमकुवत झालेले आहेत. 30 मोबाईल टॉवरमुळे ही इमारत अतिशय धोक्याची झालेली आहे. या शाळेतील मुलांच्या जीवाशी खेळ चालू आहे. या शाळेत शिकणा-या मुलांची जबाबदारी न्यायालय घेणार आहे की शासन घेणार आहे ? दुसरे असे की, महानगरपालिकेची परवानगी न घेता कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेशासाठी जाहिराती दिल्या जात आहेत.

सभापती महोदय, आणखी एक गंभीर गोष्ट मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देत आहे ती म्हणजे या शाळेतील मराठी माध्यमाच्या शिक्षकांना संस्था चालक खूप त्रास देत असतात. या शाळेतील मुख्याध्यापिकेला काढून टाकण्यात आलेले आहे. शाळेच्या इमारतीवर बसविण्यात आलेल्या टावर्सच्या बाबतीत मुख्याध्यापकांचा काहीही संबंध नसून त्यांना नोटीसा दिल्या जातात आणि दंड ठोठावला जातो. संस्थाचालक मात्र नामानिराळे राहातात. संस्थाचालकांनी मनमानी सुरु केलेली आहे. संस्थाचालकाच्या भावाची पत्नी दिपमाला सिंह...

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती विद्या चव्हाण : माझा प्रश्न असा आहे की, या शाळेतील मुलांची जबाबदारी न्यायालय घेणार आहे की शासन घेणार आहे ? या शाळेला शासना तर्फे अनुदान देण्यात येत असतानाही संस्थाचालकांनी त्यांच्या घरातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षक म्हणून नेमलेले आहे. (अडथळा).. मुख्याधापकांच्या खोट्या सह्या केलेल्या आहेत. समशेरसिंग नावाचे संस्थाचालक आहेत. त्यांनी घरातील व्यक्तींना शाळेमध्ये 30-30 हजार रुपये पगाराच्या नोकरीवर ठेवलेले आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. गिते...

श्रीमती विद्या चव्हाण....

सभापती महोदय, या संस्थेत ज्यांना मराठी भाषेतील "म" हा शब्द उच्चारता येत नाही अशा हिंदी भाषिक शिक्षकांना मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना मराठी हा विषय शिकविण्यासाठी सक्ती केली जात आहे. हिंदी भाषिक लोकांची मराठी भाषा शिकविण्यासाठी शिक्षक म्हणून नेमणूक केली जात आहे. मराठी माध्यमाच्या शिक्षकांना इंग्रजी शिकवा म्हणून सांगितले जाते, असा प्रकार सुरु आहे. सदरच्या संस्था चालकांची मुलगी श्रीमती नुतन सिंग ही तेथे लिपीक म्हणून काम करीत आहे...

उप सभापती : आपण स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी प्रश्नच विचारीत आहे. परंतु काही सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यात अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदर संस्था चालक मनमानी कारभार करीत आहेत. या ठिकाणी जे मराठीच्या नावाने गळे काढतात, त्यांनी माझे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले पाहिजे. (अडथळा) आता मराठीच्या बाबतीत आपले पुतना मावशीचे प्रेम कोठे गेले ? सभापती महोदय, मी या ठिकाणी अतिशय गंभीर मुद्दा उपस्थित करीत आहे. शासनाची ग्रँट सदर संस्थेला मिळते आहे. त्या संस्थेतील शिक्षकांवर अन्याय होतो आहे. शिक्षकांना पूर्व सूचना न देता सेवेतून कमी केले जात आहे. संस्था चालक हे मोठया प्रमाणात अनियमितता करीत आहेत म्हणून या संस्था चालकांच्या विरुध्द शासन काय कारवाई करणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, दिनदयाल शिक्षण संस्थाव्दारा संचलित स्वामी विवेकानंद हायस्कूल येथे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या माध्यमाच्या शाळा चालू आहेत. त्या शाळांमध्ये 2500 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेच्या टेरेसवर 8 कंपनीव्दारे 24 मोबाईल टॉवर्स उभारण्यात आले आहेत. हे टॉवर्स 2006 मध्ये उभारण्यात आले आहेत. आता दिनांक 16.2.2013 रोजी मुंबई महानगरपालिकेकडून सदरहू मोबाईल टॉवर्स काढण्यासंदर्भात कंपनीस नोटीस दिली आहे. मुंबई महानगरपालिकेने 7 वर्षानंतर नोटीस दिली आहे. खरे तर मुंबई महानगरपालिकेने सदरहू नोटीस पूर्वीच द्यावयास पाहिजे होती. परंतु त्यांच्याकडून तशी कार्यवाही झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेने नोटीस दिल्यानंतर कंपनी मालकाने या बाबतीत उत्तर दिले आहे. त्या उत्तरात त्यांनी असे नमूद केले आहे की, सदर मॅटर हे सबज्युडीस आहे. (अडथळा)

(अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी परवानगी मागतात.)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : आपणास सभागृहाचे कामकाज चालू द्यावयाचे नाही काय ? मी सर्व सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करुन देणार आहे. प्रथम माननीय राज्य मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मी सिक्वेन्स ऑफ इव्हेंट सांगत आहे. मुंबई महानगरपालिकेने तेथे लावलेले होर्डींग्ज बघितले आणि त्याबाबतीत मुंबई महानगरपालिकेने मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेटकडे मुख्याध्यापकावर कारवाई करण्यासाठी प्रकरण पाठविले. त्यांनी या बाबतीत दंड लावला आहे. मुंबई महानगरपालिकेस त्या ठिकाणचे होर्डींग्ज दिसले, परंतु मोबाईल टॉवर्स दिसले नाहीत. या मोबाईल टॉवर्समुळे सर्व विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते. मुंबई महानगरपालिकेने नोटीस दिल्यानंतर कंपनीने असे उत्तर दिले आहे की, हे मॅटर सबज्युडीस आहे आणि आम्हाला कोर्टाने इंटेरियम रिलीफ दिलेला आहे. त्या कंपनीने तशी कागदपत्रे प्रोडयूस केलेली आहेत. आम्ही शासन म्हणून मुंबई महानगरपालिकेला स्पष्ट आदेश देणार आहोत की, या टॉवर्समुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे त्या टॉवर्सच्या बाबतीत ताबडतोबीने कार्यवाही करण्यात यावी.

उप सभापती : कफपरेड येथील एका छोटया हॉटेलवर 35 मोबाईल टॉवर्स लावण्यात आलेले आहेत. त्या मोबाईल टॉवर्सच्या रेडिएशनमुळे त्रास होत असल्याबाबतच्या अनेक रहिवाशांच्या तक्रारी माझ्याकडे आल्या होत्या. त्यासंदर्भात मी मुंबई महानगरपालिकेला पत्र पाठविले आहे. परंतु माझ्या पत्रास देखील मुंबई महानगरपालिकेने चुना लावला आहे. माझ्या पत्राच्या अनुषंगाने मुंबई महानगरपालिकेने काहीही उत्तर दिलेले नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत पत्र / शोधनेसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1.....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नाचा दुसरा भाग आहे. माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी त्या संदर्भात एक प्रश्न उपस्थित केला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण जे वक्तव्य केले आहे त्या अनुषंगाने मला मुद्दा मांडावयाचा आहे.

उप सभापती : माननीय विरोधी पक्षनेत्यांना मुद्दा मांडण्यास मी संधी देत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदया सरकारचे प्रतिनिधी म्हणून बोलत आहेत की पक्षाचे प्रतिनिधी म्हणून याची मला माहिती नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : (जागेवर बसून) तुम्ही पक्षाचे प्रतिनिधी म्हणून बोलत आहात.

श्री.विनोद तावडे : खाली बसून बोलायचे नाही....चूप.....(गोंधळ).....माझा मंत्री महोदयांना एवढाच प्रश्न आहे.....(अडथळा)....माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना मी सांगू इच्छितो की, मी चुकलो तर मला सांगा.....(गोंधळ).....

(सभागृहामध्ये सत्तारुढ पक्षाचे अनेक माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे असतात)

उप सभापती : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 31 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

नंतर व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या माझ्या मित्रांनी माझ्या मघाच्या भाषणामध्ये "चूप" असा शब्द आला आहे असे सांगितले आहे. मी अशा पध्दतीचे बोलल्याचे आठवत नाही परंतु तसा शब्द माझ्या तोंडातून आला असेल तर तो शब्द मी मागे घेतो. मला सभापती महोदय,आदरणीय राज्यमंत्री महोदयांना मी एवढेच सांगत होतो की, मोबाईल टॉवरमुळे मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतात. या विषयाच्या संदर्भात सन 2008 मध्ये अशाच प्रकारची एक लक्षवेधी सूचना या सभागृहात आली होती व ही लक्षवेधी सूचना जवळपास सव्वातास चालली होती. मोबाईल टॉवरमुळे शरीरावर विपरीत परिणाम होत नाही असा बीआरसीचा, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर तसेच वेगवेगळया विदेशी विद्यापीठांचा दाखला देण्यात आला. यासंदर्भात माननीय खासदार श्री. गुरुदास कामत यांचे पत्र देखील आहे. यासंदर्भात माझे असे म्हणणे आहे की, शाळेची चूक असेल तर ते नक्की थांबवा. परंतु आता या विषयाच्या संदर्भात टेलिकॉम डिपार्टमेंटने जे काही सांगितले आहे त्यांसदर्भात आपण त्यांना विचारणा केली पाहिजे. परंतु त्यावेळी होते म्हणून यावेळी का नाही केले हे जे आपण म्हणता ते त्या अर्थाने आनुषंगिक नाही एवढाच मला मुद्दा मांडावयाचा होता.

सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे त्यामध्ये तेथील मुख्याध्यापिकेला प्लस टू शाळेला अटॅच होण्याचे काम दिल्यानंतर मी ते काम करणार नाही, त्यासाठी मला ॲडिशनल पगार दिला जावा असे त्या मुख्याध्यापिकेने लेखी लिहून दिलेले आहे. आपल्या शिक्षण अधिकाऱ्याने यासंदर्भात काय म्हटलेले आहे ते सभागृहात सांगितले तर बरे होईल . प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा मांडला आहे त्याबद्दल मला .....

श्री. गोपिकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी आदरणीय सदस्यांनी सांगितले आहे की, "हिंदी साईडरला मराठीचा "म" देखील येत नाही".

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उप सभापती : आपल्याला कामकाज करावयाचे नाही असे मला वाटते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड अनिल परब : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्यांचा हरकतीचा मुद्दा मान्य केला आहे.

उप सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण खाली बसावे. माननीय मंत्री महोदयांनी माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या प्रश्नाला उत्तर द्यावे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी हरकतीचा मुद्दा मान्य केलेला नाही.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी उत्तर देत असताना माझा मुद्दा असा होता की, मुंबई महानगरपालिकेने 7-8 वर्षानंतर नोटीस कशासाठी दिलेली आहे. सदर नोटीस त्यांनी आधीच द्यायला पाहिजे होती.

सभापती महोदय, शासनातर्फे लवकरच मोबाईल टॉवर संबंधातील पॉलिसी घोषित होणार आहे. याबाबत भारत सरकारकडून वेगवेगळ्या प्रकारच्या गाईड लाईन्स आलेल्या आहेत. त्यामुळे सर्वंकष असे धोरण लवकरच घोषित होणार आहे. या शाळेतील दहावीच्या शिक्षिकेसंबंधीच्या नियुक्तीचा देखील विषय आहे. डेप्युटी एज्युकेशन ऑफिसरच्या रिपोर्ट प्रमाणे यात अनियमितता झाल्याचे आढळून येते. त्यामुळे संस्थेने मुख्याध्यापकांना निलंबित केले आहे. पण संस्थेने मुख्याध्यापकांना निलंबित करण्यापूर्वी डेप्युटी डायरेक्टरची परवानगी घेतली नाही. मुख्याध्यापिका व शाळेचे संचालक यांनी पोलीस ठाण्यामध्ये परस्पर विरोधी तक्रार केली आहे. संस्थेने शाळेच्या मुख्याध्यापिकेला शिक्षण विभागाची परवानगी न घेता निलंबित केले असल्यामुळे संस्थेने त्यांना पुन्हा रुजू करून घ्यावे अशा प्रकारची नोटीस शिक्षण निरीक्षकांनी पाठविली आहे. तसेच, नियुक्ती संबंधी अनियमितता असेल तर ती दुरूस्त करावी व तसे केले नाही तर संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल अशा प्रकारची नोटीस देण्यात आली आहे.

श्री.गोपिकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितले की, हिंदी भाषिकांना मराठीचा "म" देखील येत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण (बसून) : असे मी बोलले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपिकिशन बाजोरिया : सभापती महोदय, हे पटलावर आहे. हिंदी भाषिकांना सक्तीचे शिक्षण द्यावे असे त्यांनी म्हटले आहे.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, शाळेचा महत्त्वाचा प्रश्न असून देखील त्या प्रश्नाला बगल देण्याचे काम विरोधी पक्षाकडून होत आहे. त्याची कारणे वेगळी असू शकतील. कदाचित ही पहिला शाळा असेल की, शिक्षक भरतीसाठी स्वत:च्या नातेवाईकांची वर्णी शाळेत लावली असेल. नातेवाईकांना घेऊ नये अशा प्रकारचा जी.आर.असताना सुद्धा संस्था चालकांनी आपल्या भावाची पत्नी श्रीमती दीपमाला सिंह हिला गावी रहात असताना सुद्धा शाळेच्या सेवेत दाखविले आहे. ही शाळा अनुदानित आहे. श्रीमती दीपमाला सिंह या गावी राहतात. पण त्याना अनुदानातून पगार दिला जात आहे. संस्था चालकांची मुलगी श्रीमती नूतन सिंह सर्व कामकाज बघते. त्यांच्या भावाचा मुलगा हिंदी मधून शिकला असून त्याला मराठी भाषेचा प्रमुख म्हणून नेमला आहे. सन्माननीय सदस्य मघाशी म्हणाले की, त्याला "म" येत नाही. मी तर असे म्हणतो की, त्याला ग, म, भ, न देखील येत नाही. मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात नमूद केले आहे की, या शाळेत 2300 विद्यार्थी शिकत आहेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

या शाळेच्या संस्थाचालकांचा माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार केला पाहिजे.

सभापती महोदय, उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, मोबाईल टॉवर लावण्यास महानगर पालिकेने परवानगी दिलेली नाही. पुढे असे नमूद केलेले आहे की, "माननीय मुंबई उच्च न्यायालयाने "जैसे थे" असे आदेश दिलेले आहेत." मला याचा अर्थ समजलेला नाही. खरे म्हणजे ज्यांनी परवानगी घेऊन मोबाईल टॉवर उभे केले त्यांच्यासाठी "जैसे थे" चे आदेश आहेत. ज्यांनी मोबाईल टॉवर उभारण्यासाठी परवानगी घेतलेली नाही त्यांच्या बाबतीत "जैसे थे" चा प्रश्न उद्भवत नाही. मोबाईल टॉवरमधून निघणाऱ्या रेडिएशनमुळे आरोग्यावर परिणाम होतो असे आपण सातत्याने म्हणतो. पण त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करीत नाही. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात दिलेले उत्तर मला विसंगत वाटते.

सभापती महोदय, संस्थाचालक एखाद्या पक्षाशी निगडीत असतील, काम करीत असतील, परंतु त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे जीवन खरोखर धोकादायक असेल तर त्याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. या संस्थेची प्रकरणे पोलीस स्टेशनमध्ये आहेत. ही शाळा अनुदानित आहे. तेव्हा त्या शाळेवर कठोर कारवाई करुन ते टॉवर काढून टाकणार आहात काय ? संस्थाचालकांनी आपल्या नातेवाईकांची भरती केली असेल तर त्या संस्थाचालकांवर कठोर कारवाई करणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगू इच्छिते की, उत्तरामध्ये कोणत्याही प्रकारची विसंगती नाही. मी अगोदरच या प्रश्नाचे सविस्तर उत्तर दिलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली ती सत्य समजून त्याची सखोल चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने आपण सभागृहात खेद व्यक्त केला की, महानगरालिका आयुक्तांना मी स्वत: पत्र लिहून देखील त्याचे उत्तर दिले जात नाही. माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, माननीय उप सभापतींनी पाठविलेल्या प्रश्नांना जे अधिकारी उत्तर देत नाहीत त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मला त्यांच्याकडून उत्तर आले परंतु ते नकारात्मक होते.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शैक्षणिक संदर्भातील कार्यवाही उप संचालकांकडून करण्यात येईल तर मोबाईल टॉवरच्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना पत्र लिहिण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या शाळेने प्रचलित कायद्याचे पालन केलेले नाही. त्या शाळेने सर्व नियम धाब्यावर बसविले आहेत. आपण त्या शाळेला संधी दिलेली आहे. तेव्हा त्या शाळेवर कारवाई करण्यात येईल काय ? मोबाईल टॉवर्सच्या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायलयाने, उच्च न्यायालयाने आणि केंद्र सरकारने गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. त्या शाळेने मोबाईल टॉवर उभारण्यासाठी कोणाचीही परवानगी घेतली किंवा घेतली नाही ही बाब आपण बाजूला ठेवू या. परंतु शाळेच्या इमारतीवर उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवर्समधून निघणाऱ्या रेडिएशनला विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत आहे. रेडिएशनचे प्रमाण निश्चित करण्यात आलेले आहे त्याच्या कितीतरी पटीने त्या ठिकाणी रेडिएशन होत आहे. तेव्हा ते मोबाईल टॉवर्स तातडीने काढून टाकणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, या संदर्भात मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना पत्र लिहून कारवाई करण्यास सांगणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी ताबडतोब कारवाई करण्याबाबत सांगितले त्याबाबत सांगू इच्छिते की, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने त्यांना संधी देणे आवश्यक आहे. तेव्हा त्यांना तशी संधी देण्यात येईल. त्यानंतर चौकशी करुन आवश्यकता वाटल्यास कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार : महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर व भाई जगताप यांनी सदरहू टॉवर्स अनधिकृत असल्याचे सांगितले. माझा प्रश्न आहे की, ज्यावेळी हे टॉवर्स बांधले त्यावेळी ते मुंबई महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय अनधिकृत होते काय ? मुंबई महानगरपालिकेने दि.1 ऑक्टोबर, 2012 रोजी उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशनच्या आधारावर मुंबईतील सर्व टॉवर्सच्या बाबतीत जैसे थे परिस्थिती ठेवून संरक्षण दिले आहे हे खरे आहे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : महोदय, बीएमसीने नोटीस दिलेली आहे की, 8 टॉवर्स काढून टाकावेत. बीएमसीने स्पष्टपणे सांगितले की, टॉवर्स उभारण्यासाठी आपण कोणतीही परवानगी घेतलेली नाही. त्यावर भारती या संस्थेने....

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना 'बीएमसी' असे म्हटले आहे. मी त्यांना विचारु इच्छितो की 'बीएमसी' म्हणजे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : माननीय रावते साहेब, बीएमसी म्हणजे काय, मुंबई महानगरपालिका म्हणजे काय यावर चर्चा न करता या विषयाचे गांभीर्य पहावे. मी या ठिकाणी गांभीर्याने उत्तर देत आहे. आपण 'बीएमसी' असा शब्दप्रयोग करीत नाही का ? असो.

सभापती महोदय, हा प्रश्न गंभीर आहे. मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता एका शाळेवर मोठ्या संख्येने टॉवर्स उभारलेले आहेत. महापालिकेने विचारण केल्यानंतर उच्च न्यायालयाने या प्रकरणी स्थगनादेश दिल्याचे उत्तर दिले जात आहे. उभारण्यात आलेल्या टॉवर्सच्या बाबतीत उच्च न्यायालयाने दि.26 एप्रिल रोजी स्टेटस-को दिला ही गोष्ट खरी आहे. स्टेटस-को दिला असला तरी या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळले जात असेल तर मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना बोलावून त्यांना स्पष्ट सूचना देण्यात येतील की, आपण विद्यार्थ्यांच्या हितासाठीच न्यायालयाकडे धाव घ्यावी.

उप सभापती : या निमित्ताने माझे म्हणणे आहे की, ज्या ज्या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता अशा प्रकारचे अनधिकृत टॉवर्स उभारलेले आहेत ते तत्काळ काढण्याचे आदेश आपण देणार काय ? माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब, आपण सभागृहात येण्यापूर्वी मी एक प्रश्न उपस्थित केला होता. कारण आमच्याकडे सुध्दा मोठ्या प्रमाणावर अनधिकृत टॉवर्स आहेत. म्हणूनच जे अनधिकृत टॉवर्स आहेत ते काढून टाकावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे कार्यक्षेत्र शाळेपुरते आहे. मुंबईत जे अनधिकृत टॉवर्स आहेत ते काढून टाकण्याबाबत मुंबई महापालिकेने कारवाई केली पाहिजे. त्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून महानगरपालिका आयुक्तांना बोलावून त्यांना या बाबतच्या सूचना देण्यात येतील.

उप सभापती : मी स्वत: या बाबत मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना पत्र लिहिले होते. जे अनधिकृत टॉवर्स आहेत ते राज्य सरकारने महिनाभरात काढून टाकावेत, असे मी स्पष्टपणे निदेश देत आहे.

श्री.छगन भुजबळ : माननीय मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या आयुक्तांना या बाबत योग्य त्या सूचना ताबडतोब देण्यात येतील.

श्री.कपिल पाटील : महोदय, माझे दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत. एक प्रश्न माननीय उप सभापतींनी उपस्थित केला आहे. या निमित्ताने मी निदर्शनास आणून देतो की, न्यायालयाचा जो स्थगनादेश आहे तो अधिकृत परवानगी घेतलेल्या टॉवर्सपुरता मर्यादित आहे. तो स्थगनादेश अनधिकृत टॉवर्ससाठी नाही. टॉवर्सवर कारवाई करण्याबाबत आपण निर्णय घेत असला तरी आजच्या घडीला त्या शाळेतील मुलांना संरक्षण मिळत नाही, ही खरी माननीय उप सभापती आणि सभागृहाची चिंता आहे. संस्थेच्या अत्यंत बेकायदेशीर कारभाराबद्दल मुख्याध्यापक आणि शिक्षक यांचे बळी जात आहेत. त्यांना संरक्षण मिळण्याची गरज आहे.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत/शोधनीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

शिक्षण निरीक्षकाने सेवेत रुजू करुन घ्या, रि-इन्स्टेट करा असे स्पष्ट आदेश दिल्यानंतरही आजही त्या मुख्याध्यापिकेला रुजू करुन घेतलेले नाही. आज संध्याकाळपर्यंत त्यांना रुजू करुन घेतले जाईल असे स्पष्ट आश्वासन माननीय मंत्री देणार आहेत का आणि त्या शाळेतील शिक्षकांची सेवाज्येष्ठता राखली जाईल असे आश्वासन देणार का ? त्या ठिकाणी बाहेरची शिक्षिका नेमली. त्या ठिकाणी सेवाज्येष्ठता नाकारली जाते म्हणून असंतोष निर्माण झाला आहे आणि आधीच्या तारखेपासून नेमल्यामुळे ही अडचण निर्माण झाली. ज्या मुख्याध्यापिकेचा बळी दिला त्यांना रि-इन्स्टेट केले पाहिजे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारलेले आहेत. त्यांचा पहिला प्रश्न ज्या शिक्षिकेला त्या ठिकाणी नियुक्त करण्यात आले त्याबद्दलचा आहे. त्यांचा दुसरा प्रश्न ज्या मुख्याध्यापिकेला निलंबित केले त्याबद्दलचा आहे आणि तिसरा प्रश्न त्या ठिकाणी जे टॉवर्स लावण्यात आले आहेत त्याबद्दलचा आहे. त्याबद्दल माननीय राज्यमंत्र्यांनी अगोदर उत्तर दिलेले आहे की, त्या ठिकाणी ज्या सोनार नावाच्या शिक्षिकेची नियुक्ती करण्यात आली त्यांना या अगोदरच आपण नोटीस दिलेली आहे तसेच मुख्याध्यापिकेलाही निलंबित करण्यात आले आहे या दोन्ही बाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे तातडीने पुढच्या पंधरा दिवसात उप संचालकांमार्फत उचित कारवाई होईल. टॉवर्सचा जो प्रश्न आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन त्यांना संरक्षण देण्यासाठी माननीय आयुक्तांशी चर्चा करुन त्याबद्दल सुध्दा निश्चितपणे पावले उचलण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबईतील महापालिका रुग्णालयात मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारी यंत्रे आणि औषधांची रखडलेली खरेदी

मु.शी.: मुंबईतील महापालिका रुग्णालयात मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारी यंत्रे आणि औषधांची रखडलेली खरेदी यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, भाई जगताप, सुभाष चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील महापालिका रुग्णालयात मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक लागणारी यंत्रे, व्हेंटिलेटर, जीवरक्षक उपकरणे आणि औषधांची खरेदी गेल्या तीन वर्षापासून रखडली असल्याचे माहे 24 जून, 2013 रोजी वा त्यासुमारास उघकीस येणे, सन 2010 पासून मेंदूवरील शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या ड्रील मशीन खरेदी करणे, अपेक्षित असताना 2013 पर्यंत खरेदीच करण्यात न येणे, त्याचप्रमाणे औषध व डेंग्यू चाचणी किट्सची खरेदी, तसेच एक्स-रे मशीन, सर्जिकल ड्रेसिंगचीही खरेदी रखडली असल्याचे निदर्शनास येणे, केईएम रुग्णालयात उपकरण खरेदीच्या 32 फाईल्स व कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्यांकडे सहा फाईल्स प्रलंबित असल्याचे आढळून येणे, सायन आणि नायर रुग्णालयांतही औषध खरेदीच्या फाईल्स पडून असणे, सदर उपकरणांची खरेदी रखडवून ती भाडेतत्वावर घेतली जात असल्याचे आढळून येणे, यामुळे पालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत असून रुग्णांसाठी योग्य सेवा मिळत नसणे, यामुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ MMP/

श्री. उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ MMP/

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मुंबईकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांचा मला फोन आला. ते आजारी असल्यामुळे सभागृहात उपस्थित राहू शकले नाहीत.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या लक्षेवधी सूचनेच्या संदर्भात जे निवेदन दिलेले आहे त्या बाबतीत माझी हरकत आहे.

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. परिच्छेद क्रमांक 3 मध्ये "महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये 200" असा आकडा दिलेला आहे त्या ऐवजी " महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये 285" असे वाचावे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये दुरुस्ती केली तरी सुध्दा या एकंदरीत उत्तराला माझी हरकत आहे. हा असा एक नमुना आपल्यासमोर आलेला आहे की ज्यामध्ये अधिकारी स्वत:च्या चुका लपविण्यासाठी शब्दच्छल कसा करतात किंवा कसे उत्तर देतात याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे. अशी अनेक उदाहरणे आहेत. या लक्षवेधी सूचनेमध्ये आमचा स्पेसिफिक मुद्दा 2010 पासून मेंदूवरील शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या ड्रील मशीन्स खरेदी करणे याबाबतचा आहे तसेच बाकीचे विषय सुध्दा आहेत. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, शस्त्रक्रियेसाठी लागणारी यंत्रे सद्य:स्थितीमध्ये उपलब्ध असून न्युरोसर्जरी विभागासाठी नवीन ड्रील मशीन खरेदी करण्याकरिता प्रस्ताव मंजूर झाला आहे. हा प्रस्ताव 2010 पासूनचा आहे. सर्वसामान्य लोकांच्या एवढ्या गंभीर प्रकारच्या ज्या शस्त्रक्रिया आहेत त्या संदर्भात 2010 ते 2013 पर्यंत खरेदीमध्ये विलंब का झाला असा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी सर्व बाबतीत गोलगोल उत्तर दिलेले आहे.

या लक्षवेधी सूचनेचा रोख हाच आहे की, 2010 पासून 2013 पर्यंत या सर्व प्रक्रिया होणे आवश्यक असताना त्या झालेल्या नाहीत. निवेदनामध्ये हे मान्य केले आहे की अशी परिस्थिती नाही. निवेदनामध्ये 6 आणि 32 फाईल्स गायब आहेत हे वेगळ्या शब्दांमध्ये मान्य केले आहे. मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, अधिकारी जे सांगतील, जे ब्रिफींग करतील तेच माननीय मंत्री महोदय सांगतात. कारण आपली तशी पध्दत आहे. परंतु अधिकारी सांगत असताना किंवा लिहून देत असताना अशा प्रकारे जी दिशाभूल करतात आणि स्वत:च्या चुकांवर पांघरुण घालतात त्याला कोण शासन करणार ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

हे सभागृह सर्वोच्च असताना अशा प्रकारे सभागृहाची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ? सर्वसामान्य लोकांच्या आरोग्याशी निगडित असलेला हा प्रश्न आहे. महानगरपालिकेच्या रुग्णालयात कामगार, कष्टकरी, सामान्य माणसे जातात. मलबार हिलवर राहणारी माणसे तेथे जात नाहीत. या अधिकाऱ्यांनी हा सर्व घोळ घातलेला आहे, महत्वाच्या प्रश्नाला बगल दिलेली आहे. या अधिकाऱ्यांविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे याचे मला प्रथम उत्तर मिळाले पाहिजे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये स्पष्टपणे असे नमूद केलेले आहे की, 307 नवीन उपकरणे खरेदी करण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यापैकी फक्त 12 प्रस्ताव खरेदीचे प्रलंबित राहिलेले आहेत. बाकीच्या सर्व प्रस्तावांना मंजुरी देऊन ती उपकरणे आलेली आहेत. या लक्षवेधीमध्ये मेंदूवरील शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेली ड्रील मशीन्स खरेदी केलेली आहेत की नाही असे विचारले होते. याबाबत मी स्पष्टपणे सांगतो की, 2010 पासून ते 2013 पर्यंत मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये एकही शस्त्रक्रिया प्रलंबित राहिलेली नाही. त्यामुळे कोणत्याही रुग्णाला त्रास झालेला नाही. मुंबईमध्ये केईएम, सायन व नायर ही तीन महत्वाची रुग्णालये आहेत. केईएममध्ये 4 ड्रील मशीन्स आहेत, नायरमध्ये 2 व सायनमध्ये 1 अशी एकूण 7 ड्रील मशीन्स आहेत. सन्माननीय सदस्यांनी आता जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये ठराव मंजूर होऊन 80 लाख रुपयांची दोन अत्याधुनिक ड्रील मशीन्स घेण्याचा निर्णय झालेला आहे. त्याची ऑर्डर सुध्दा दोन दिवसापूर्वी देण्यात आलेली आहे आणि 90 दिवसांच्या कालावधीमध्ये दोन ड्रील मशीन्स केईएममध्ये येणार आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हीच वस्तुस्थिती मी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. मंत्री महोदयांना अधिकाऱ्यांनी पुरविलेले उत्तर त्यांनी वाचून दाखविलेले आहे. या दोन मशीन्सच्या खरेदीचा ठराव 2010 साली मंजूर झाला होता. त्या विषयीच ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. मेंदू शस्त्रक्रियेवरील आवश्यक असलेल्या ड्रील मशीन खरेदी करण्यासाठी दिनांक 28.9.2010 रोजी निविदा उघडल्या होत्या. अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर आम्हाला मंत्री महोदय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.भाई जगताप.....

वाचून दाखवित असतील तर ते योग्य नाही. याची गंभीरता मंत्री महोदयांनी लक्षात घ्यावी. ही खरेदी 2010 मध्ये झाली नाही आणि मंत्री महोदय आता सांगत आहेत की, शासनाने 1.5 कोटी रुपये मंजूर केले आहेत. 3 वर्षात मेंदूवर एकही शस्त्रक्रिया झाली नाही असा कोणी दावा करीत असेल तर तो चुकीचा ठरेल. मग या खरेदीची संपूर्ण चौकशी होण्याची आवश्यकता आहे. स्थायी समितीने निर्णय घेतला असल्याची माहिती मंत्री महोदयांनी दिली आहे. पण दि.28.9.2010 साली या ड्रील मशीन्सच्या खरेदीचा ठराव मंजूर झाला होता. त्याला आता 3 वर्षे झालेली आहेत. ही खरेदी 3 वर्षे प्रलंबित होती, त्याचे कारण काय, या विलंबाबाबत अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन शासन त्यांच्यावर कारवाई करणार आहे की नाही ?

श्री.उदय सामंत : सन 2010 मध्ये या मशीन्सच्या खरेदीचा निर्णय झाला होता हे खरे आहे. परंतु या खरेदी प्रक्रियेच्या वेळी एल-1 निविदा आली होती त्याच्या निविदाकाराने पुरवठा करण्यासाठी असमर्थता दर्शविल्यामुळे एल-2 च्या निविदाकारास एल-1 च्या रेटनुसार हे काम दिलेले आहे. त्यामुळे या खरेदीला विलंब झालेला आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, स्थायी समितीने ठराविक कालावधीत प्रस्ताव मंजूर केला नाही तर तो प्रस्ताव आयुक्तांना मंजूर करता येतो. इमर्जन्सीच्या काळात वापरावयाचे अधिकार आयुक्तांना असताना आयुक्तांनी हे अधिकार का वापरले नाही आणि या मशीन्सची खरेदी का केली नाही ? मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांची अवस्था फार बिकट आहे. तेथे अनेक जीवरक्षक उपकरणे व जीवरक्षक औषधे नाहीत. अनेक आवश्यक असलेल्या उपकरणांच्या व वस्तूंच्या खरेदीची प्रक्रिया वर्षानुवर्षे चालू आहे. त्यामुळे सामान्य जनतेच्या जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. राज्यातील सर्वच हॉस्पिटल्समध्ये हा प्रश्न भेडसावत आहे. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना कळकळीची विनंती आहे. अशा प्रकारच्या खरेदीबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन शासन कायद्यात दुरुस्ती करणार आहे का ?

श्री.उदय सामंत : मुंबई महानगरपालिकेतील सर्वच रुग्णालयांचा आढावा घेतला तर 4 मोठी रुग्णालये आहेत, 16 रुग्णालये सेकंडरी क्लासमध्ये मोडतात, 175 प्राथमिक दवाखाने आहेत, 175 आरोग्य केंद्रे आहेत असे दिसते. सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडला आहे की, या रुग्णालयांमध्ये जीवरक्षक औषधे कमी आहेत, तेथे व्हेण्टिलेटर्स कमी आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तीन मोठया रुग्णालयातील व्हेण्टिलेटर्सची संख्या 109 आहे. त्यापैकी नवजात शिशुसाठी 18 व्हेण्टिलेटर्स आहेत. नायर रुग्णालयामये 72 व्हेण्टिलेटर्स आहेत. त्यापैकी नवजात शिशुसाठी 5 व्हेण्टिलेटर्स आहेत. नवीन उपकरणे घेण्यासाठी 170 कोटीच्या निविदा मागविलेल्या आहेत. त्या देखील मंजुरीच्या स्तरावर आहेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

ॲड. आशिष शेलार : मुंबई महानगरपालिकेच्या गंभीर विषयावर या सदनामध्ये चर्चा होत आहे. त्यामुळे काही गोष्टी स्पष्ट झाल्या पाहिजेत आणि काही गोष्टींचा उलगडा झाला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी आयुक्तांना खर्च करण्याचे अधिकार आहेत असे सांगितले. परंतु विषय स्थायी समितीसमोर आल्यानंतर ते अधिकार आहेत. ही फाईल टेंडरच्या प्रक्रियेमध्ये होती ती स्थायी समितीसमोर आलेली नव्हती. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, एल-1 टेंडर नाकारुन एल-2शी निगोशिएट करुन त्याला एल-1च्या स्तरावर आणण्यासाठी महापालिकेच्या आयुक्तांनी प्रयत्न केले. आयुक्तांनी महापालिकेचे पैसे वाचविण्याचे काम केले.

सभापती महोदय, महानगरपालिकेकडे ड्रील मशिन नव्हत्या असे नाही. उपकरणे होती, कुणाला ट्रीटमेण्ट मिळत नव्हती किंवा ऑपरेशन होत नव्हते असे नाही. त्यामुळे हा प्रस्ताव अपग्रेडेशनचा आहे की रिप्लेसमेण्टचा आहे ? या सर्व प्रक्रिया जलदगतीने होण्यासाठी महानगरपालिकेने प्रोक्युअरमेण्ट रिड्रेसल कमिटी नेमलेली आहे काय ?

श्री. उदय सामंत : मेंदूची शस्त्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेकडे ड्रील्स उपलब्ध नव्हत्या असे नाही. ड्रील्स उपलब्ध होत्या. सन्माननीय सदस्यांनी एल-1 आणि एल-2 टेंडरचा उल्लेख करुन विलंबाने कार्यवाही सुरु झाली असे सांगितले. आपण केईएम हॉस्पिटलसाठी रुग्णाला कमीत कमी त्रास होईल अशा प्रकारची अत्याधुनिक ड्रील घेत आहोत. 80 लाख रुपयामध्ये 2 ड्रील्स घेणार आहोत. 90 दिवसाच्या आत त्या घेण्यात येतील.

श्री. हेमंत टकले : मुंबई महानगरपालिकेची रुग्णालये गरिबांसाठी आहेत. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी विचारणा केल्या प्रमाणे हा अपग्रेडशनचा किंवा नवीन उपकरणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

खरेदी करण्याचा प्रश्न नाही. वर्तमानपत्रातून आपल्याला रोज बातम्या वाचायला मिळतात. आजच्या वर्तमानपत्रामध्ये जुळया नवजात मुलींना महानगरपालिकेच्या तिन्ही रुग्णालयामध्ये यंत्रे बंद असल्यामुळे प्रवेश देण्यात आला नाही आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जेव्हा नागरिकांचे असे मृत्यू समोर येतात त्यावेळी असे प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित होतात. फाईल स्थायी समिती समोर जाणे, टेंडर काढणे इत्यादी तांत्रिक गोष्टी ठीक आहेत. परंतु सर्जिकल ड्रेसिंग सारख्या साध्या गोष्टीचा कमी पुरवठा असेल तर त्याबाबतीत निश्चितपणे तपास करण्याची आवश्यकता आहे. या बाबतीत आरोग्य खात्याची मदत घेऊन सर्व यंत्रणा तपासून कमतरता दूर केल्या जातील काय आणि या कमतरता राहाण्यामध्ये जबाबदार असणा-या अधिका-यांवर कारवाई केली जाईल काय ?

श्री. उदय सामंत : यामध्ये यंत्रसामग्रीची नवीन खरेदी आणि औषधांची खरेदी या दोन बाबी आहेत. ही खरेदी 180 दिवसात करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी 170 कोटीची तरतूद केलेली असून निविदा प्रक्रिया 180 दिवसांमध्ये पूर्ण होईल. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितलेली बाब तपासून घेण्यात येतील. ॲड. आशिष शेलार यांनी प्रोक्युअरमेण्ट रिड्रेसल कमिटी नेमलेली आहे काय अशी विचारणा केली.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत...

सभापती महोदय, 50 लाख रुपयांचे अधिकार डीन यांना दिलेले आहेत. डीन यांनी त्यांच्या स्तरावर खरेदी करावी आणि त्यासंबंधीचा अहवाल आयुक्त आणि शासन यांच्याकडे पाठवावा. खरेदी मोठी असेल तर मध्यवर्ती खरेदी खाते असे प्राधिकरण नेमून त्यांना तशा खरेदीचे अधिकार देण्यात आलेले आहेत. अशा प्रकारची ही प्रोसेस राहील. मी या ठिकाणी एल-1,एल-2 चा उल्लेख केला. त्यासाठी देखील एक तक्रार निवारण समिती माजी न्यायमूर्ती श्री.रिबेलो यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली आहे. जेणे करुन या सर्व गोष्टी लवकरात लवकर होतील. या गोष्टींचा त्रास रुग्णांना होणार नाही अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. आपण एखादे उपकरण अर्जन्सीमध्ये घेत असतो. अशा परिस्थितीतील ही खरेदी सिंगल विंडो सिस्टीमने करणार काय ? उपकरणे खरेदी करावयाची असेल तर स्टॅंडींग कमिटीकडे मंजुरी घेण्यासाठी जावे लागते, त्यासाठी निविदा मागविल्या जातात ही सर्व प्रोसेस पूर्ण करावी लागते. अधिकारी बऱ्याच वेळा यावर चर्चा करतात. ही संपूर्ण प्रोसीजर पूर्ण करण्यासाठी बराच कालावधी जातो. म्हणून एखादे महत्वाचे उपकरण इर्मजन्सीमध्ये पाहिजे असेल तर तशी खरेदी सिंगल विंडो सिस्टीम मध्ये करण्याबाबत धोरणात्मक निर्णय शासनाकडून घेण्यात येईल काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, ही सगळी इक्वीपमेंट आणावयाची आहेत ही महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपलब्ध नव्हती म्हणून आणावयाची नाहीत. त्या रुग्णालयांमध्ये सगळी इक्वीपमेंट उपलब्ध होती. त्यात अपग्रेडेशन असलेली इक्वीपमेंट असली पाहिजेत, म्हणून ती घेत आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जो विचार मांडला आहे, त्याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला या ठिकाणी मुद्दाम सांगावे लागेल की, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार हे अभ्यासू आहेत. एखाद्या विषयाला बगल कशी द्यावयाची याची त्यांना चांगली माहिती आहे. या ठिकाणी आधुनिक मशीनचा उल्लेख केला गेला आहे. त्याच मशिनचा उल्लेख दिनांक 28 सप्टेंबर, 2010 रोजी झाला होता. ते मशीन त्याच कालावधीत खरेदी करावे असे ठरले होते. मी या ठिकाणी ठरावाच्या तारखेसह माहिती देतो आहे. शस्त्रक्रिया थांबल्या असे मी म्हणालो नाही, औषधे मिळाली नाहीत असे मी म्हणालो नाही. मी असे म्हणालो

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

की, अत्याधुनिक मशीन 2010 मध्ये खरेदी करण्याचे आपण ठरविले होते. त्या खरेदीस तीन वर्षाचा विलंब का लागला, ज्या अधिकाऱ्यांमुळे या मशीन खरेदीला विलंब झाला, त्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द काय कारवाई केली जाणार आहे असा माझा साधा प्रश्न होता. हा विषय महत्वाचा आहे, तो डायव्हर्ट होऊ नये अशी माझी विनंती आहे. संबंधित अधिकारी अत्याधुनिक मशीन खरेदीसाठी तीन-तीन वर्षाचा कालावधी घालवत असतील आणि अशा प्रकारची उत्तरे देत असतील, तर त्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द काय कारवाई करणार असा माझा प्रश्न आहे.

श्री.उदय सामंत : सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे, ती तपासून घेतली जाईल. परंतु यात महत्वाचा मुद्दा असा आहे की, केईएम हॉस्पिटलचा संदर्भातील हा विषय होता. केईएम हॉस्पिटलमध्ये चार ड्रिल चालू होती व सध्य:स्थितीत देखील चालू आहेत. आपण ॲडिशनल म्हणून दोन मशीन घेत आहोत. 80 लाख रुपये किंमतीची दोन मशीन्स घ्यावीत एवढी इमर्जन्सी नव्हती. म्हणून सदर खरेदीस विलंब झाला असावा. परंतु सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती पडताळून बघितली जाईल.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे खाडीला पडलेला प्रदूषणाचा विळखा

मु.शी. : ठाणे खाडीला पडलेला प्रदूषणाचा विळखा या संबंधी सर्वश्री दिवाकर रावते व विनायक राऊत, वि.प स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वाढते शहरीकरण, कारखानदारी आणि बांधकामांमुळे 23 किलोमीटर इतका मोठा प्रवाह लाभलेल्या या खाडीला प्रदूषणाचा पडलेला विळखा, या महानगरपालिकेकडे स्वत:ची क्षेपणभूमी (डंपिंग ग्राऊंड) नसल्याने रोज 700 मेट्रीक टन घनकचरा खाडी क्षेत्रात टाकण्यात येणे, त्यामुळे तिवराची झाडे, कांदळवन आणि जल वनस्पतींचा ऱ्हास होणे, पर्यावरणाचे संतुलन बिघडून कचरा कुजण्याच्या प्रक्रियेमुळे विषारी वायू निर्माण होणे, या वायूमुळे तेथील नागरिकांना श्वसनाचे तसेच अन्य विकार जडत असल्याचे उघडकीस येणे, सदर खाडी सध्या एका मोठ्या गटारात परिवर्तित झाल्याचे ठाणे महापालिकेच्या "पर्यावरण सद्य:स्थिती" अहवालातही नमूद करणे, दिवा येथील खाडी भागात भराव टाकणाऱ्यांवर व महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची, तसेच भराव टाकून करण्यात आलेल्या जागेवर पुन:श्च जलवनस्पतींची लागवड करण्याची नितांत आवश्यकता, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, त्यांनी याबाबत आंदोलन करण्याचा घेतलेला पवित्रा, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय , लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री.भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खाजगी व्यक्ती आपल्या मालकीची जागा कच-याची विल्हेवाट लावण्याकरिता मोफत देणार नाही. संबंधित व्यक्तीने कोणत्या अटी व शर्तीनुसार महापालिकेला किंवा खाजगी ठेकेदाराला क्षेपणभूमी म्हणून वापरण्यासाठी जागा दिली, त्या जागेचे क्षेत्रफळ किती आहे आणि किती वर्षानंतर त्या जागेची उपलब्धता संपुष्टात येईल?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, याच विषयावर आज सभागृहामध्ये तारांकित प्रश्न चर्चेला आला होता. खाजगी मालकाने 15 एकर जागा ठाणे महापालिकेला दिली आहे. त्या जागेवर कचरा डंपिंग करावा एवढ्याच अटी व शर्तीवर जागा उपलब्ध झालेली आहे. या जागेच्या बदल्यात ठाणे महापालिका किंवा शासन निधी उपलब्ध करुन देणार नाही. काही काळानंतर ही जागा देखील कमी पडणार आहे. पर्याय म्हणून शासनाने वन खात्याची जमीन ठाणे महापालिकेला देण्यास तत्वत: मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र प्रदुषण मंडळाकडे ना हरकत प्रमाणपत्र प्रलंबित असून ते प्राप्त झाल्यानंतर त्या जागेवर डंपिंग सुरु केल्यानंतर सध्याच्या जागेवरील कचरा डंपिंग करणे बंद होईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, ठाणे महापालिकेच्या क्षेपणभूमी संदर्भात आज सभागृहात तारांकित प्रश्न चर्चेला आला होता. त्या तारांकित प्रश्नाचे उत्तर आणि या लक्षवेधी सूचनेस अनुलक्षून केलेले निवेदन यामध्ये विसंगती आढळून येते. खाजगी मालकाची जागा कराराने घेण्यात आली, ती जागा ठाणे महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये कोणत्या कारणासाठी राखीव ठेवली आहे? या उपप्रश्नाचे उत्तर पटलावर ठेवण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले. डायघर येथील वन विभागाची जागा शासनामार्फत महापालिकेला देण्यात येणार आहे. त्या जागेवर डंपिंगचे काम केले जाणार आहे असे तारांकित प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, डायघर येथील प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले होते. परंतु स्थानिक रहिवाशांच्या विरोधामुळे प्रकल्पाचे काम पूर्ण न झाल्यामुळे सद्य:स्थितीत काम बंद आहे. विहित मार्गाने हा प्रश्न मार्गी लावण्यात आला नाही. परिच्छेद क्रमांक 2 मध्ये म्हटले आहे की, वन विभागाच्या मालकीची शीळ येथील राखीव वन सर्व्हे क्र.218/अ-0.900 हेक्टर ठाणे महापालिकेला देण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे. ही जागा कशासाठी राखीव आहे? प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर जर कोणी कोर्टात दावा दाखल केला.....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया.....

आणि विकास आराखड्यात ही जागा ग्रीन झोनमध्ये आणि डायघर येथील जागा सेमी पब्लिक झोनमध्ये आहे असे आढळून आले तर हा प्रश्न निकाली निघणार नाही.

ठाणे महापालिकेच्या मूळ किंवा सुधारित विकास आराखड्यामध्ये डंपिंग ग्राऊंडसाठी जागा आरक्षित केली नसेल तर पुन्हा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 37 प्रमाणे कारवाई करुन तीनही ठिकाणच्या जागांचा त्यात समावेश करावा, त्यामध्ये हरकती व सूचना मागविल्या जात असल्यामुळे कालांतराने कोणी हरकत घेणार नाही. महापालिकेच्या क्षेत्रात असेल तर कलम 37 प्रमाणे आणि प्रादेशिक नगररचना क्षेत्रात असेल तर कलम 27 प्रमाणे कारवाई करुन हा प्रश्न मार्गी लावला जाईल काय?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, डायघर येथील जागेच्या संदर्भात मॉडिफिकेशन करणार का असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे. ती जागा डंपिंग ग्राऊंडसाठी राखीव आहे. त्यामुळे मॉडिफिकेशन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वन खात्याची जमीन ही वन कायद्याप्रमाणे दिली आहे, ती जागा घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी राखीव असण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. तळोजा येथे 200 हेक्टर जागा शासनाने निश्चित करुन दिली आहे. त्यामुळे मॉडिफिकेशनचा प्रश्न निर्माण होत नाही.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेचा रोख ठाणे जिल्हयातील कांदळवनाची जी राजरोस कत्तल होत आहे त्या दिशेने आहे. डंपिंग ग्राऊंडसाठी खाजगी व्यक्ती मालकीची जागा मोफत वापरावयास देणार नाही, त्या मोबदल्यात त्याला शासनाने काही कमिटमेंट दिली आहे का? ज्या ठिकाणी दिवसा कचऱ्याचे डंपिंग केले जाते, त्या ठिकाणी एक स्कॅम सुरु आहे. खाजगी बिल्डर्सकडून त्यांचे डंपिंग मटेरियल ठाणे-भिवंडी रस्त्याच्या कडेला आणून टाकले जाते. त्यामुळे ठाणे-भिवंडी रस्त्याला लागून असलेले डंपिंग मटेरियल टाकून कांदळवन पूर्णपणे बुजविले गेले आहे.

नंतर 2इ.1....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. निंरजन डावखरे ....

त्या ठिकाणचे मॅन्ग्रोव्हज तोडून त्या ठिकाणी हा तुझा प्लॉट व हा माझा प्लॉट अशी डिव्हीजन लाईन करण्यात आली आहे. या विषयाच्या संदर्भात महसूल अधिकाऱ्याने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिल्यामुळे त्यासंदर्भात कारवाईही झालेली आहे. परंतु या विषयाच्या संदर्भात योग्य प्रकारे कारवाई झालेली नाही. या विषयाच्या संदर्भात आमच्याकडे योग्य ती यंत्रणा नाही असे महसूल अधिकाऱ्याचे म्हणणे आहे. या ठिकाणी अक्षरश: क्रेन लावून मॅन्ग्रोव्हजची कत्तल केली जात आहे. डम्पींगच्या माध्यमातून मॅन्ग्रोव्हजी ही जी काही कत्तल होत आहे ती थांबवण्यासाठी शासन योग्य ती कार्यवाही करणार आहे काय ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, ज्या ठिकाणी आता कचरा टाकला जात आहे त्या ठिकाणी मॅन्ग्रोव्हज अजिबात नव्हते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी जर अशा पध्दतीने मॅन्ग्रोव्हजची कत्तल होत असेल तर सन्माननीय सदस्यांकडून माहिती घेतली जाईल व त्यांची माहिती खरी असेल तर महानगरपालिकेला यासंदर्भात कारवाई करण्याचे आदेश दिले जातील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मॅन्ग्रोव्हजच्या संदर्भात कारवाई करण्याचे अधिकार महानगरपालिकेला नाही तर ते अधिकार वन विभागाला असून त्यासंदर्भात मॅन्ग्रोव्हजचे अधिकारी श्री. राव असून त्यांना सांगून योग्य ती कारवाई होऊ शकेल.

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, संबधित यंत्रणेला तशा प्रकारच्या सूचना निश्चितपणे दिल्या जातील.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोल्हापूर व नांदेड येथे भारत राखीव बटालियन-3 तसेच न्यायिक प्रयोगशाळेची स्थापना करण्याबाबत शासनाने घेतलेला निर्णय

मु. शी. : कोल्हापूर व नांदेड येथे भारत राखीव बटालियन-3 तसेच न्यायिक प्रयोगशाळेची स्थापना करण्याबाबत शासनाने घेतलेला निर्णय यासंबंधी ॲड. आशिष शेलार,सर्वश्री विनोद तावडे,चंद्रकांत पाटील, विजय गिरकर वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात भारत राखीव बटालियन (IRB) -३ या स्वतंत्र युनिटची स्थापना कोल्हापूर येथे, तसेच न्यायिक प्रयोगशाळा (Forensic Laboratory) ही कोल्हापूर व नांदेड येथे स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला असणे, या बटालियनसाठी गृह विभागाने ५० एकर जमीनही दिलेली असणे, परंतु प्रत्यक्षात या युनिटसाठी ३०० एकर जमिनीची मागणी बटालियनने केलेले असणे, हे संपूर्ण युनिट स्थापनेसाठी ७७ कोटींची आवश्यकता असणे, या बटालियनसाठी सशस्त्र पोलीस शिपाई अंतर्गत ६५७ जवानांची नियुक्तीही केलेली असणे, या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असलेले हे युनिट उभारण्यासाठी व या बटालियनला लागणारे सर्व अत्याधुनिक साहित्य पुरवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, अतिशय गंभीर विषयाच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. भारत राखीव बटालियन ही केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेला केंद्र सरकार पैसे देणार असून राज्य सरकार त्यासाठी जागा व बाकीच्या फॅसिलीटीज देणार आहे. मिनिस्ट्री ऑफ होम अफेअरचा यासंदर्भातील पत्राचा पॅरा मी या ठिकाणी वाचून दाखविणार आहे. "The left extremist affected states have been sanctioned Indian Reserve Battalion...." म्हणजे माओवाद आणि नक्षलवाद भागासाठी भारत राखीव बटालियन सुरु करण्याचा कार्यक्रम केंद्र सरकारने दिलेला आहे. केंद्र सरकारने भारत राखीव बटालियन 9 राज्यांना दिला असून पैसेही दिलेले आहेत. "Andhrapradesh, Zarkhand, Maharashtra has been converted into Special Indian Reserve Battalion." महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाले तर स्पेशलाईज इंडियन रिझर्व्ह बटालियन (SIRB) निर्माण करण्याचे निश्चित झाले आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारने पैसही दिले आहेत. उत्तरामध्ये म्हटले आहे की, "दि.8 डिसेंबर, 2010 रोजी तिसरी शासकीय बटालियन स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून औरंगाबाद येथे एक,गोंदिया येथे 2 आणि तिसरी बटालियन कोल्हापूर येथे स्थापन करण्याचा निर्णय घेतला. गोंदिया येथे नक्षलवाद खऱ्या अर्थाने जास्त असतांना तेथे बटालियन सुरु झाली नाही. छत्तीसगड येथी नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्ये कॉंग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा मृत्यू झाला होता. गडचिरोली येथील घटनेमध्ये पोलिसांवर हल्ला झाला होता.

सभापती महोदय, गोंदियाची आयआरबी ॲक्टीव्हेट झाली नाही. कोल्हापूरची आयआरबी स्थापन करण्याचा निर्णय 8/12/2010 रोजी झाला परंतु त्यासाठी अद्यापपर्यंत जागा ताब्यात आलेली नाही. 3 वर्षे होऊनही जागा ताब्यात आलेली नाही. या आयआरबीसाठी 675 जवानांची रिक्रुटमेंट करण्यात आली. परंतु परेडसाठी जागा नाही म्हणून त्या जवानांना पुण्याला आणले गेले. पुढे उत्तरामध्ये असेही म्हटले आहे की, "121 हेक्टर जागा देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे व पैसे देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे."

सभापती महोदय, छत्तीसगड ते गडचिरोली या ठिकाणी घडलेल्या घटना आपण बघितलेल्या आहेत. त्यामुळे यासंदर्भात माझा पहिला प्रश्न असा आहे की, 100 हेक्टर जागा प्रत्यक्षात किती दिवसात उपलब्ध करुन दिली जाणार आहे ? 50 एकर जागा आपल्या हातात आली परंतु आजुबाजूचा जो विभाग आहे त्या ठिकाणच्या सरकारी जागेवर काही संस्थांना परस्पर

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

जागा देण्यात आलेली आहे. यासंदर्भातील नावे मी नंतर सांगणार आहे. जी 100 एकर जागा आहे त्यातील 50 एकर जागा मिळाली परंतु उरलेल्या 50 एकर जागा कोणत्या खाजगी संस्थाना देण्यात आलेल्या आहेत ? आपल्याकडे स्पेशल इन्फ्रास्ट्रक्चर अपग्रेड करण्यासाठी जो पैसा आला किंवा यासंदर्भात बजेटमध्ये प्रोव्हीजन केली जाईल असा उल्लेख लक्षवेधी सूचनेमध्ये आहे. हा पैसा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्यक्षात किती वेळ लागणार आहे ? हा गंभीर मुद्दा असल्यामुळे शासनाने माझ्या तिन्ही प्रश्नांना उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

माझा तिसरा प्रश्न असा आहे की, स्पेशल इन्फ्रास्ट्रक्चर अपग्रेड करण्यासाठी बजेटमध्ये प्रोव्हीजन करण्यात येईल असे म्हटले आहे. ती प्रत्यक्षात एग्झीक्युट करण्यासाठी किती वेळ लागणार आहे ? हा गंभीर मुद्दा आहे. शासनाने माझ्या या तिन्ही प्रश्नांची पिनपॉईंटेड उत्तरे द्यावीत अशी माझी विनंती आहे.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, आयआरबीची मान्यता मिळाल्यानंतर किमान 100 एकर जागा असणे अपेक्षित होते. त्यादृष्टीने मजगी आणि तमदलगी येथील जागा आपण आयटेंडीफाय केली. 40 हेक्टर जागा बटालियनच्या नावावर करण्यात आली आहे. भविष्यकाळातील उपयुक्ततेसाठी जास्त जागा असणे गरजेचे आहे. काही जागा वन संज्ञेखाली येत होती. त्यामुळे यासंबंधीचा प्रस्ताव शासन स्तरावर पाठविला आहे. काही जागांवर बगिचांसाठी आरक्षण होते. ते आरक्षण उठविण्याचे काम आपण प्राथमिकतेने केले आहे. भरती थांबू नये म्हणून भरतीची कार्यवाही आपण पुणे येथे केली आहे. त्यानुसार कोल्हापूर येथे 200 जणांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेमध्ये कुठेही अडचण येणार नाही. साधारणत: एक महिन्याच्या कालावधीमध्ये जागेचा प्रश्न सुटून तीन महिन्याच्या आत प्रत्यक्षपणे जागेवर बांधकामाला सुरूवात करण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सन्माननीय सभापती महोदय, माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांचे मी सर्वप्रथम आभार मानतो की, त्यांनी एका चांगल्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. या लक्षवेधी सूचनेला माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी उत्तर दिले असते तर ते अधिक सोयीचे झाले असते असे मला वाटते. ही बाब अतिशय गंभीर आहे. आपण सर्वांनी 26/11 चा प्रसंग पाहिला आहे. दिल्लीतून बटालियन येण्यासाठी आपल्याला सकाळ पर्यंत वाट पहावी लागली. हे सर्व आपल्या डोळ्या समोर आहे. रात्री हेलिकॉप्टर येऊ शकत नाही म्हणून सकाळी विमानातून बटालियन आली आणि मग येथे कारवाई झाली. त्यानंतर मग त्यांनी अतिरेक्यांचा खात्मा केला.

दिनांक 8.12.2010 रोजी बटालियन स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास तीन वर्षे होत आली आहेत. म्हणजे शासन किती गंभीर आहे हे दिसते. तीन वर्षे झाल्यानंतर अद्याप पर्यंत पैशाचा, जागेचा कुठलाही निर्णय झालेला नाही. आपण फक्त मंत्र्यांच्या संस्थांनाच जागा देऊ शकता. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे कोकणातील असल्यामुळे जागा घेऊ शकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

माननीय गृह राज्यमंत्री पाटील आहेत आणि माननीय गृह मंत्री देखील पाटील आहेत. आपण सन 2010 मध्ये निर्णय घेतला आहे. यासाठी शासनाकडे निधी नाही. निवडणुका डोळ्या समोर ठेवून सत्ताधाऱ्यांमधील एका एका आमदारांना 10 कोटी रूपये देण्यात येत आहेत. देशाच्या आणि राज्याच्या संरक्षणासाठी शासनाकडे पैसे नाहीत. या शासनाला भीक लागली आहे काय ? तेव्हा हा सगळा निधी आपण केव्हा देणार आहात ते सांगावे. 100 एकर जागा आपण किती दिवसात देणार आहात ? तीन वर्षात केंद्र शासनाकडे जाऊन वना संबंधी परवानगी आणता येत नाही ? याचा अर्थ आपणाकडे गांभीर्यच नाही असे दिसते. तेव्हा केंद्र शासनाकडे जाऊन वन विभागाची जागा बटालियनसाठी किती दिवसात देणार आहात हा माझा पहिला प्रश्न आहे. आपण 1007 पदे निर्माण केली आहेत. त्यापैकी 675 जवानांची भरती करण्यात आली आहे. उर्वरित जवानांच्या भरतीचे काय ? सदर पदे भरण्यासाठी अजून किती वर्षे लागणार आहेत ? सदर भरती का थांबली आहे ? त्यासंबंधी कोण उत्तर देणार आहे ? मी माननीय महिला व बालविकास मंत्री यांना सांगू इच्छितो की, आपल्या विभागाच्या संबंधातील माहिती देखील माझ्याकडे आहे. त्यासंबंधी देखील मी प्रश्न विचारणार आहे. आपल्या विभागाने खरेदीमध्ये काय काय केले आहे ते देखील सांगणार आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

माझे स्पेसिफीक प्रश्न आहेत की, युनिटसाठी 100 हेक्टर जागा केव्हा उपलब्ध करुन देणार आहात, या सर्व कामांसाठी लागणारा सर्व निधी किती दिवसांत उपलब्ध करुन देणार आणि सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सांगितल्याप्रमाणे त्या जमिनी शेजारील जागा कोणत्या संस्थांना देण्यात आली, त्या संस्थांची नावे सांगणार काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, 26/11च्या वेळी दिल्लीवरुन आलेले कमांडो हे एनएसजीचे होते. आपण एनएसजीसाठी मरोळ येथे जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. आपण स्वत:चे फोर्स-वन देखील डिप्लॉय केलेले आहे. आयआरबी औरंगाबाद, गोंदियामध्ये उपलब्ध आहेत. ज्या ज्या राज्यांमध्ये या बटालियनची आवश्यकता असते त्या प्रमाणे त्यांचा उपयोग करण्यात येतो. आपल्याला गरज लागली तर आपल्याला देखील त्याचा उपयोग होणार आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. जमिनी संदर्भातील विषय महिन्या भरात मंत्रालय स्तरावर मार्गी लावण्यात येईल. कारण शासनाने तेथील जमिनी ताब्यात घेतलेल्या आहेत. निधीची कोणतीही अडचण नाही. निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. जी.आर.काढलेला आहे. तीन महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, बटालियनची भरती करताना स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, नक्षलवादी भागातील तरुणांना बटालियनमध्ये घेतले पाहिजे. गडचिरोली जिल्ह्यतील तरुणांनी बटालिनमध्ये नोकरी मिळण्यासाठी अर्ज केले. बटालियनमध्ये भरती होण्यासाठी पुणे येथे फॉर्म ठेवले होते आणि तेथेच मुलाखत ठेवली होती. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी तरुण आधीच मागसलेले आहेत. त्यांना पुणे् येथून फॉर्म आणणे आणि पुन्हा मुलाखतीसाठी तेथे जाणे परवडणारे नव्हते. तेव्हा मी माननीय राज्यमंत्री महोदयांना फोनवर सांगितले की, किमान फॉर्म वाटण्याची व्यवस्था गडचिरोली जिल्ह्यामध्ये करावी. जेणेकरुन त्यांना फॉर्म उपलब्ध होतील. ही बटालियन गोंदिया, गडचिरोली या नक्षलवादी विभागासाठी आहे. कोल्हापूर आणि पुणे येथील तरुणांची भरती करुन ते येथील नक्षलवाद्यांशी सामना करु शकणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

नाहीत. स्थानिक तरुणांना नोकरीची संधी मिळत नाही म्हणून तेथे नक्षलवाद फोफावला आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांना गडचिरोलीमध्ये फॉर्म उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. त्यांनी ते मान्य देखील केले होते. परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे आमच्या भागातील तरुणांवर अन्याय झालेला आहे. सरकारला या भागातील नक्षलवाद संपवावयाचा असेल तर तेथील तरुणांना बटालियनमध्ये घेणे आवश्यक आहे. नक्षलवादी भागातील तरुणांना नोकरीमध्ये समाविष्ट करावे असे स्पष्ट आदेश आहेत. तेव्हा शासन फॉर्म् देण्याचा आणि मुलाखत घेण्याचा कार्यक्रम पुन्हा हाती घेणार काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, गोंदिया जिल्ह्यामध्ये बटालियन आहे त्यामुळे त्या भागातील तरुणांना नोकरीची संधी मिळालेली आहे. या भरती प्रक्रियेमध्ये पुणे येथे एकाच ठिक्राणी केंद्र ठेवले होते. त्या संदर्भात मला सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचा फोन आला होता. परंतु एकाच ठिकाणी भरती असल्यामुळे सर्व ठिकाणी फॉर्म देण्याची व्यवस्था करण्यात आली नाही. परंतु आपण प्रायॉरिटी गोंदिया जिल्ह्याला दिलेली आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, तीन वर्षापूर्वी निर्णय होऊन देखील या महत्वाच्या प्रकल्पाची अंमलबजावणी अजून झालेली नाही. शासनाने पदांची निर्मिती केलेली आहे. जागा उपलब्ध नसताना, कोणत्याही प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर उभे राहिलेले नसताना शासनाने घाईने भरती करण्याची आवश्यकता काय, जी भरती झालेली आहे त्यांचा उपयोग कोठे होत आहे, आयआरबीच्या संदर्भात एक महिन्यात कार्यवाही करण्यात येईल काय ? न्यायिक प्रयोगशाळेचा प्रश्न विचाराधीन आहे असे म्हटलेले आहे. तेव्हा न्यायिक प्रयोगशाळा केव्हा सुरु करणार आहात ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, आयआरबी मंजूर होऊन काही कालावधी झाला असल्यामुळे भरती प्रक्रिया करणे गरजेचे होते. आपल्या ताब्यात 40 एकर जागा आल्यामुळे भरती प्रक्रियेस सुरुवात केली आणि नानवीज येथे प्रशिक्षण देण्याचे काम सुरु करीत आहोत. त्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था देखील करीत आहोत. न्यायिक प्रयोगशाळेच्या निधीसाठी आणि पदांसाठी हाय पॉवर कमिटीकडे जाणार आहोत. त्यासाठी शेंडेपार्क येथे न्यायिक प्रयोगशाळेसाठी जागा निश्चित केलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील....

हाय पॉवर कमिटीकडून मंजुरी मिळाल्यानंतर लवकरच कामाला प्रत्यक्षात सुरुवात होईल.

ॲड.आशिष शेलार : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, एक महिन्यात जागा ताब्यात घेऊन, तीन महिन्यात बांधकामास सुरुवात करण्यात येईल. या बाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु माननीय राज्यमंत्री माझ्या प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळत आहेत. मी पुन्हा एकदा स्पेसिफिक विचारतो की, 40 हेक्टर जागा सोडून आजूबाजूच्या सरकारी जमिनीवर कोणकोणत्या संस्थाना जागा देण्यात आलेली आहे ? फॉरेन्सिक लॅबसाठी आपण हाय पॉवर कमिटीपुढे जात आहात. माझ्या माहितीनुसार या संदर्भात आपली केंद्र सरकारसोबत चर्चा झाली आहे. मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, केंद्र सरकारने गुजरात येथे 300 एकर जागा मागितली होती. गुजरात राज्याने केंद्र सरकारला सांगितले की, आम्ही 1000 एकर जागा देण्यास तयार आहोत. परंतु संपूर्ण वेस्टर्न रिजनसाठी आयआरबीचे सेंटर आमच्या राज्यात करा. महोदय, यामध्ये मला राजकारण करायचे नाही. गुजरात सरकारने या कामी 1000 एकर जागा दिली. याचा फायदा त्या राज्याला होईल. आपला कालबध्द कार्यक्रम असेल तर आपल्याकडे सुध्दा तशा प्रकारचे आयआरबीचे सेंटर होऊ शकते. त्यामुळे आपल्या राज्याचा फायदा होईल आणि आपल्या राज्याचे नाव मोठे होईल. या निमित्ताने मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, फॉरेन्सिक लॅबसाठी कालबध्द कार्यक्रम आखून किती महिन्यात संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : महोदय, कोल्हापूर आणि नांदेड येथील जागेचा विषय आहे. तेथील जिल्हाधिकाऱ्यांना 3-3 जागा निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव देण्यास सांगितले होते. त्यानुसार नांदेड जिल्हाधिकाऱ्यांकडून दोन जागेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. जी जागा सयुक्तिक असेल आणि ताबडतोब मिळेल त्या जागेबाबत निर्णय घेण्यात येईल. कोल्हापूर आणि नांदेड या दोन्ही ठिकाणांना प्राधान्य देण्यात येईल. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण मला दीड-दोन महिन्याचा वेळ द्यावा. या कालावधीत जागा निश्चित करण्यात येईल. या संदर्भातील सर्व मंजुरी प्राप्त करुन व टेंडर काढून आवश्यक ती प्रोसेस करण्यासाठी तीन-चार महिन्यांचा कालावधी लागेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील....

तसेच सन्माननीय सदस्यांनी सरकारी जमिनीवर कोणकोणत्या संस्थाना जागा देण्यात आलेली आहे असा प्रश्न विचारलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न आमच्या विभागाशी संबंधित नाही. आजूबाजूच्या जागा कोणाच्या आहेत या बाबतची माहिती आमच्या विभागाकडे असण्याचे कारण नाही.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.42 ते 3.15 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

विशेष उल्लेख

पृ.शी./मु.शी. : वार्षिक अनुदान योजनेचा गैरफायदा घेणाऱ्या राज्यातील 914 ग्रंथालयांचे वार्षिक अनुदान बंद करण्याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो. राज्यातील ग्रंथालयांच्या संदर्भात हा विशेष उल्लेख आहे.

"वाचन संस्कृती वृध्दिंगत करण्यासाठी राज्यातील सर्व ग्रंथालये सुसज्ज असावयास हवीत त्यासाठी दर्जानुसार मान्यताप्राप्त ग्रंथालयांना वार्षिक अनुदान दिले जाते. परंतु या योजनेचा गैरफायदा घेणारी 914 ग्रंथालये पडताळणीमध्ये आढळून आली आहेत. या ग्रंथालयाचे अनुदान बद करण्याचे आदेश दिलेले असताना पुढील प्रमाणे विभागवार ग्रंथालयांना अनुदान दिले जात आहे. यामध्ये अमरावती विभाग 169, औरंगाबाद विभाग, 381, नागपूर विभाग 79, नाशिक विभाग 82, पुणे विभाग 85, मुंबई विभाग 14 अशा एकूण 914 ग्रंथालयांचे अनुदान अजूनही चालू ठेवण्यात आलेले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, हे अनुदान त्वरित बंद करावे आणि नव्याने ज्या ठिकाणी ग्रंथालये येणार असतील त्यांच्यासाठी हा निधी उपलब्ध करुन द्यावा."

सभापती महोदय, या निमित्ताने मी आपल्या परवानगीने राज्यातील एक मान्यवर नेते स्व. बाळासाहेब देसाई यांच्या बाबतीत एक बाब मांडू इच्छितो. या विधिमंडळामध्ये काम करताना अनेक वेळा आम्ही ग्रंथालयामध्ये जाऊन आपल्या राज्यातील मोठ्या नेत्यांबद्दल माहिती घेत असतो. आपल्या महाराष्ट्रातील अत्यंत जबाबदार असे हे नेतृत्व होते. साधारणपणे 1952 पासून 1978

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

पर्यंत त्यांनी या सदनामध्ये काम केलेले आहे. अनेक वेळेला ते मंत्री म्हणून लोकांच्या लक्षात आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे ते या राज्याचे गृहमंत्री असताना या राज्यावर गृह खात्यांचा विलक्षण असा प्रभाव होता, दबदबा होता. कायदा व सुव्यवस्था राखण्यामध्ये त्यांनी फार मोठे योगदान दिले होते. काही काळ महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले होते. 1980 मध्ये पुन्हा ते महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले होते. या अतिशय महत्वाच्या नेतृत्वाबद्दल महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांना आजही पुरेशी माहिती उपलब्ध नाही. जसे आपण स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांबद्दल किंवा स्व. वसंतराव नाईक साहेबांबद्दल बोलतो त्याच पध्दतीने किंबहुना त्यांच्याही अगोदर त्यांची जन्मशताब्दी होऊन गेली. कारण त्यांचा जन्म 1910 साली झालेला होता. असे हे दुर्लक्षित पण मोठे नेतृत्व आहे. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, आदरणीय बाळासाहेब देसाई यांच्या संदर्भातील एक उत्कृष्ट ग्रंथ या निमित्ताने शासनाने विचार करुन लवकरात लवकर प्रकाशित करावा.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आता विशेष उल्लेखाव्दारे जी सूचना केलेली आहे त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, स्व. बाळासाहेब देसाई हे खरे तर त्या काळात गोरगरिबांचे कैवारी म्हणून ओळखले जात होते. ते मराठा समाजाचे एक अत्यंत पोलादी नेतृत्व होते. गोरगरिबांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी फार वेगळी होती. 1200 रुपये उत्पन्नाची जी सवलत होती ती बाळासाहेब देसाई शिक्षण मंत्री असताना त्यांनी दिली होती. महाराष्ट्र राज्य शासनामध्ये त्यांनी विविध खात्यांमध्ये काम करुन आपल्या स्वत:च्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला होता. त्यामुळे आपण या ठिकाणी जी विशेष उल्लेखाची सूचना मांडलेली आहे ती अत्यंत स्वागतार्ह आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती.....

म्हणून मी याठिकाणी स्पष्टपणे निर्देश देतो की, स्व.बाळासाहेब देसाई यांच्याबाबतचा एक व्यवस्थित व चांगला ग्रंथ प्रकाशित करण्याची जबाबदारी वि.स.पागे केंद्राकडे देण्यात यावी.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी. :राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन शिक्षण मंडळाच्या दहावी व बारावीच्या पाठ्यपुस्तकातील चुका सुधारण्यासाठी ॲकॅडेमिक विंग सुरु करण्याची आवश्यकता याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या दहावी व बारावीच्या पाठ्यपुस्तकातील राष्ट्रगीतात 'सिंध' या प्रांताचा उल्लेख करण्याऐवजी सिंधू असा नदीचा उल्लेख केला तर 'आशिष' या शब्दाऐवजी 'आशिस' असा अशुध्द शब्द प्रसिध्द होणे, याबाबत उच्च न्यायालयाने राष्ट्रगीत राज्य शासनाला माहिती आहे काय, असा सवाल राज्य शासनास विचारणे. या आधीही पाठ्यपुस्तक मंडळाने दहावीच्या भूगोलाच्या पुस्तकात अरुणाचल प्रदेशचा नकाशा चुकीचा छापण्याचा प्रताप, इयत्ता नववीच्या हिंदीच्या पुस्तकात चुकीचे व अशुध्द शब्द यांचे शतक मंडळाने ठोकलेले असणे, अजिंठा लेण्याच्या ठिकाणी वेरुळची लेणी छापण्याची किंवा आहार शास्त्राबाबतचे जावईशोध छापून विद्यार्थ्यांची दिशाभूल करणे, चुकीचे राष्ट्रगीत असलेली सात लाख पुस्तके छापून तयार असणे, अशा असंख्य चुकांची मालिका मंडळाने सुरु ठेवली असून शाळांमधील शिक्षकांचा दर्जाही सुमार असल्याने त्यांच्या लक्षात या चुका येत नसल्याने अशा चुका करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने या चुका केव्हा सुधारल्या जात नसणे, परिणामी देशाच्या भावी पिढीवर याचा होणारा विपरित परिणाम, याकरिता राज्य शिक्षण मंडळाने 'ॲकॅडेमिक विंग' सुरु करण्याची केलेल्या घोषणेची तातडीने अंमलबजावणी होण्याची आवश्यकता असल्याने शासनाने याबाबत तत्काळ निवेदन करावे."

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने दहावी व बारावीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये फार भयंकर अशा 7 चुका केलेल्या आहेत. भूगोलाच्या पुस्तकात नकाशा चुकीचा छापणे, नववीच्या हिंदी पुस्तकात 100 अशुध्द शब्द छापणे, अजिंठा लेणीला वेरुळची लेणी म्हणून प्रसिध्द करणे, आहारशास्त्राबाबत चुकीचे छापणे, सिंध प्रांताबाबत 'सिंधु' असा नदीचा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

उल्लेख करणे आणि 'आशिष' या शब्दाऐवजी 'आशिस' असा अशुध्द शब्द प्रसिध्द करणे, उच्च न्यायालयाने राष्ट्रगीत राज्य शासनाला माहीत आहे काय असा प्रश्न विचारलेला आहे. या पाठ्यपुस्तकाने चुकांची मालिका सुरु केलेली आहे, त्यामुळे मी मागणी करते की, राज्य शिक्षण मंडळाने यासाठी अभ्यासात्मक विंगमार्फत याची तपासणी करावी आणि ज्यांनी या चुका केलेल्या आहेत त्या सर्वांवर कडक कारवाई करावी.

उप सभापती : यानंतर बुधवार, दिनांक 17 जुलै, 2013 रोजीच्या विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

4....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी. : राज्यात कृषि क्षेत्रात राबत असलेल्या बाल कामगारांना शिक्षण देऊन त्यांचे भविष्य घडविण्याची आवश्यकता याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात सुमारे दोन लाख बाल कामगार कृषि क्षेत्रात राबत असल्याची धक्कादायक माहिती जून, 2013 मध्ये निदर्शनास येणे, याबाबत कोणतीही माहिती वा आकडेवारी शासनाकडे उपलब्ध नसणे, या क्षेत्रातून बाल कामगारांना बाहेर काढण्यासाठी कोणताच ठोस कृती-कार्यक्रमही राबविला जात नसल्याने दिवसेंदिवस या बाल कामगारांची संख्या वाढतच असणे, असे मत 'सेव्ह द चिल्ड्रेन' या संस्थेने व्यक्त करणे, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स आणि सेव्ह द चिल्ड्रेन या संस्थांच्या संयुक्तपणे राज्यातील ऊसतोडीमध्ये गुंतलेल्या कुटुंबातील कामगारांची सद्य:स्थितीचे वास्तव समोर येणे, कृषि क्षेत्रात बाल कामगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असून कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढावे म्हणून ऊसतोड कामगार आणि मुकादम मुलांना शाळेत घालण्याऐवजी शेतीच्या कामाला ठेवत असणे, सदरहू ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण देणे गरजेचे असणे, याकरिता शासनाने ठोस उपाययोजना करुन या कृषि क्षेत्रातील बाल कामगारांना शिक्षण देऊन त्यांचे भविष्य घडविण्याची नितांत गरज, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्याकरिता करावयाची उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी. :चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी नगरपरिषदेच्या 18 वॉर्डात दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत शौचालय बांधकामात झालेला भ्रष्टाचार याबाबत श्रीमती शोभा फडणवीस,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी तालुक्यातील समाजकल्याण विभागाकडून ब्रम्हपूरी नगरपरिषदेच्या 18 वॉर्डात दलित वस्ती सुधार योजनेंर्गत शौचालय बांधकामात भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस येणे, सन 2012-13 या आर्थिक वर्षाकरिता समाजकल्याण विभागाकडून ब्रम्हपूरी नगरपरिषदेच्या दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत 490 शौचालयांचे बांधकाम हाती घेण्यात आलेले असणे, अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांच्या घरी शौचालय नसणे व त्यांची आर्थिक परिस्थिती सबळ नसणे, या योजनेचा लाभ फक्त नगरसेवकांनी आपापल्या नात्यातील व मर्जीतील लोकांची निवड करणे, खरे गरजवंत लाभार्थी या योजनेपासून वंचित असणे, 10 ते 12 बोगस लाभार्थ्यांनाही लाभ दिला जाणे, या संपूर्ण योजनेच्या अंमलबजावणीची प्रामाणिक आणि सखोल चौकशी करणे, यावर शासनाने करावयाची कारवाई, म्हणून या विशेष उल्लेखाद्वारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे."

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत श्री.किरण पावसकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"राज्यात दिवसेंदिवस सुशिक्षित बेरोजगारांच्या संख्येत होत असलेली वाढ, त्या तुलनेत रोजगाराच्या संधी अत्यल्प असणे, यासाठी शासनाने सन 2000 मध्ये रोजगार व स्वयंरोजगार संदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करण्याचा निर्णय 2012 मध्ये घेणे, त्यानुसार राज्यात 8202 संस्था स्थापन करण्यात येणे, या संस्थांना शासकीय/निमशासकीय 5 लाख रुपयांची विनानिविदा कामे देण्याचा शासनाने निर्णय घेणे, परंतु काही शासकीय/निमशासकीय विभागातील अधिकारी संस्थांना सहकार्य करीत नसणे, या संस्थांना पहिली तीन वर्षे व्यवस्थापकीय अनुदान देण्याचे शासनाचे धोरण असताना संस्थांना केवळ एवढेच अनुदान देण्यात येणे, सप्टेंबर 2011मध्ये माननीय सहकार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्या प्रतिनिधी सोबत बैठक झाली. परंतु अद्याप यावर शासनाने निर्णय घेतला नसणे, त्यामुळे राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी मी या विशोष उल्लेखाद्वारे करीत आहे."

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : गिरगाव चौपाटीला "स्वराज्य भूमी" असे नाव देण्याबाबत श्री.सुभाष चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' असे बोलून भारतीयांमध्ये ब्रिटीशाविरुध्द भावना निर्माण करणारे, भारतीय असंतोषाचे जनक, भारतीय लोकांमध्ये बंधुत्वाची व एकजुटीची भावना निर्माण होण्यासाठी शिवजयंती व गणेशोत्सव सुरु करणारे लोकमान्य टिळक यांचा मृत्यू दिनांक 1 ऑगस्ट 1920 रोजी झाला. लोकमान्य टिळकांची समाधी ऐतिहासिक व प्रसिध्द अशा गिरगांव चौपाटीवर आहे. तरी या गिरगाव चौपाटीला "स्वराज्य भूमी" असे नाव देण्यात यावे याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : पुणे शहरातील एस.टी.स्थानके स्वच्छ ठेवण्याबाबत श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पुणे शहरातील स्वारगेटसहीत सर्व एस.टी.स्थानकामध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे रोज हजारो प्रवासी तेथे ये-जा करीत असतात. या एस.टी.स्थानकाचा परिसर आणि तेथील प्रसाधन गृहे अतिशय अस्वच्छ झालेली आहेत. अगदी नाईलाज म्हणून नागरिकांना एस.टी.स्थानकातील प्रसाधन गृहांचा वापर करावा लागत आहे. तेव्हा या परिस्थितीमध्ये त्वरित लक्ष घालून पुणे शहरातील सर्व एस.टी.स्थानकावर पसरलेले घाणीचे साम्राज्य दूर करुन एस.टी.स्थानके स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : म्हाडाची दलालांमुळे पडून असलेली 300 घरे गोरगरीब लोकांना देण्यासाठी करावयाची कार्यवाही याबाबत ॲड. अनिल परब,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"मुंबई येथील म्हाडाच्या 2010 च्या सोडतीत तब्बल 456 बनावट अर्ज भरुन घरे हडपण्याचा प्रयत्न करणारे दलाल दोन वर्षानंतरही अद्याप मोकट फिरत असून त्यांना लागलेली सुमारे 300 घरे पडून आहेत. म्हाडाने खेरवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मात्र अद्यापही या दलालांवर काहीही कारवाई झालेली नाही. सदरचे दलाल आजही म्हाडाच्या कार्यालयात खुलेआम फिरतांना दिसत असूनही त्यांच्यावर पोलिसांकडून कोणतीच कारवाई होत नसल्याने घरांची निकड असणा-या गोरगरीब जनतेला या घरांचा लाभ मिळत नसणे, त्यामुळे त्यांच्यातही निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, या प्रकरणी शासनाने संबंधित दलालांवर कडक कारवाई करुन सदरची 300 घरे गरीब लोकांकरिता उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याने ही बाब मी विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : अमरावती येथील प्रिस्ट फार्मास्युटीकल कंपनीने

शासनाची कोटयवधी रुपयाची केलेली फसवणूक
याबाबत श्रीमती अलका देसाई,वि.प.स. यांनी
दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"राज्यातील ग्रामीण भागातील आणि आदिवासी भागातील अंगणवाड्या आणि मिनी अंगणवाड्या यांना करण्यात आलेल्या औषध पुरवठयात अमरावती येथील प्रिस्ट फार्मास्युटिकल या औषध कंपनीने शासनाची कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्याचा भयंकर प्रकार आढळून आला आहे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळातील (एमएसएसआयडीसी) अधिका-यांनी प्रिस्ट फार्मास्युटीकल या खाजगी कंपनी बरोंबर हातमिळवणी करुन शासनाच्या डोळयात धूळफेक करण्यात येणे, औषध किटच्या पुरवठयासाठी मागविलेल्या निविदांमध्ये औषध संचाचे वजन निर्धारित केले होते. त्यानुसार प्रत्येकी 400 ग्रॅम वजनाच्या दोन कॉटन रोलचा पुरवठा करावयाचा होता. परंतु पुरवठा आदेश देताना यात परस्पर बदल करुन 200 ग्रॅम वजनाचे कॉटन रोल पुरविण्याचे आदेश देण्यात आलेले असल्याचे आढळून येणे, अशा प्रकारे शासनाची कोटयवधी रुपयांची करण्यात आलेल्या फसवणूक प्रकरणाची सखोल चौकशी होऊन कंपनीवर व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळातील अधिकारी (एमएसएसआयडीसी) यांच्यावर कठोर कारवाई करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीकरित प्रत / शुद्धीकरणासाठी नाही

पृ.शी./मु.शी.:महाविद्यालयांमध्ये दर्जेदार शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत श्री.रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"सभापती महोदय, सध्या स्पर्धेच्या युगात राज्यात मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा अस्तित्वात आला असून मात्र शाळा, महाविद्यालयातून महत्वाच्या विषयाचे अध्यापन तितकेच दर्जेदार आणि अचूक अभ्यास शिक्षकांकडून देण्यात न येणे, परिणामी विद्यार्थी आणि पालक खाजगी क्लासकडे ओढावला जाणे, परिणामी शासनाचा बुडत असलेला महसूल आणि शाळा महाविद्यालयातून खाजगी क्लासकडे जाणारे लोंढे थांबविण्यासाठी शाळा,महाविद्यालये यात दर्जेदार शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी.: खरीप-रब्बी असा निकष न लावता सरसकट 50 पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांना सवलतीचा लाभ देणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, "गेल्या वर्षी राज्यामध्ये अपुरा पाऊस झाल्यामुळे दुष्काळ व टंचाई निर्माण झालेली असणे, दिनांक 10 एप्रिलच्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाने टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर करुन विविध सवलती दिलेल्या असणे, या परिस्थितीमुळे राज्यात रब्बी हंगामात 50 पैशांपेक्षा कमी अंतिम पैसेवारी असलेल्या 2 हजार 794 गावांतील सहकारी कर्जाचे रुपांतर व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस शासनाने स्थगिती दिलेली असणे, मात्र यात नाशिक जिल्हयातील एकाही गावाचा समावेश नसणे, नाशिक जिल्हा दुष्काळी व टंचाईग्रस्त असूनही जिल्हयातील शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहिले असणे, जेथे पावसाळयात खरीप हंगाम निघाला नाही तेथे रब्बी हंगाम कसा निघणार ? याबाबत यंत्रणेने विचार करण्याची आवश्यकता, मात्र याचा विचार न करता दुष्काळी गावांना शासकीय मदतीपासून वंचित ठेवले जाणे, ही गावे केवळ सरकार दप्तरी रब्बीची नसल्याचे या मागील कारण असणे, मग जिल्हयातील रब्बी असणाऱ्या गावांची पैसेवारी ऐन दुष्काळात 50 पैशांपेक्षा जास्त झाली का असा प्रश्न उपस्थित होत असणे, रब्बी गावे अन त्या गावामधील 50 पैशापेक्षा कमी पैसेवारी हा निकष ठेवून सहकार विभागाने मदत देण्याचा लाभ न मिळता वंचित रहावे लागणार असणे, नाशिक विभागवार कटाक्ष टाकला तर नगर या एकाच जिल्हयाला लाभ होणार असून विभागातील नाशिक, जळगांव, धुळे व नंदुरबार हे जिल्हे सरकाराच्या सहकार्यापासून वंचित राहणार असणे, सहकार विभागाने रब्बी गावांचा निकष ठरवून मदतीचा हात पुढे किला असला तरी जिल्हयातील गावे रब्बीत नसल्याने अनेक गावे अन गावोगावचे शेतकरी वंचित राहणार असणे, त्यामुळे राज्य शासनाने खरीप-रब्बी असा निकष न लावता सरसकट 50 पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांना या सवलतीचा लाभ द्यावा, अशी मागणी मी विशेष उल्ले्खाव्दारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : शासकीय,निमशासकीय किंवा खाजगी मालकीच्या विविध मालमत्तांवर सविस्तर पत्त्यांसह नामफलक लावणे बंधनकारक करण्याची आवश्यकता याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, " आपण सर्वजण कोणत्या ना कोणत्या वाहनाने कामानिमित्ताने रस्त्याने धावत असतो, आपल्या नियोजित ठिकाणी कमीत कमी वेळात, कमीत कमी श्रमात, मधल्या वाटेने पोहचण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी वाटते कच्च्या किंवा पक्क्या रस्त्याने धावत असतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूस छोटी मोठी व्यापारी संकुले किंवा निवासी संकुले किंवा उद्योग धंदे किंवा कारखाने दिमाखाने उभे राहिलेली दिसतात. त्यामध्ये मोठी शैक्षणिक संकुले, मोठी निवासी हॉटेल्स, धाबे, क्रीडांगणे इत्यादीचा समावेश असतो. या संकुलावर मोठाले नामफलकही असतात. मात्र या नामफलकावर त्या भागाच्या किंवा नगराच्या नावाचा उल्ले्खही असत नाही. त्यामुळे आपणास नियोजित ठिकाण किंवा पत्ता शोधण्यासाठी रस्त्यावरील वाटसरुंकडे चौकशी करावी लागते. त्यामध्ये काही वेळा दिशाभूल किंवा फसवणुकही संभवते. तसेच रस्त्यांची देखभाल करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग देखील रस्त्याच्या दोन्ही बाजूस दिशादर्शक (मार्गदर्शक) फलकस लावण्यामध्ये कमालीचा हलगर्जीपणा करतात. उदाहरणार्थ नामफलकावरील अक्षरे ठळक नसणे, बुजलेली असणे, नामफलक मोडलेला असणे, आवश्यकता असतानाही नामफलक नसणे, त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होते. या विशेष उल्ले्खाव्दारे मी शासनास अशी विनंती करतो की, शासकीय, नियमशासकीय किंवा खाजगी मालकीच्या विविध मालमत्ते्वर नामफलक लावणे व त्या नामफलकावर त्या ठिकाणाचा सविस्तर पत्ता नमूद करणे बंधनकारक करावे."

यानंतर श्री. भोगले...

अनुशंसित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : कल्याण तालुक्यातील वालधुनी नदीच्या विकासाबाबत
श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, कल्याण तालुक्यात वालधुनी येथील नदीच्या काठावर झालेली अतिक्रमणे, वालधुनी नदीच्या पात्रात सोडण्यात आलेल्या प्रदूषित पाण्यामुळे नदीचे पात्र धोक्यात आले असून नदीचे रुपांतर नाल्यात होत आहे. मिठी नदीच्या धर्तीवर या नदीचा विकास करण्याचे आश्वासन राज्य सरकारने 8 वर्षापूर्वी दिले होते. 8 वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी वालधुनी नदीचा विकास केवळ कागदावर राहिला आहे. या नदीच्या किना-यावर फार मोठया प्रमाणावर अतिक्रमणे व नियमांचे उल्लंघन करुन बांधकामे सुरु असून प्रशासन या बाबीकडे दुर्लक्ष करीत आहे. वालधुनी नदीच्या विकासासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने एका नामवंत कंपनीकडून वालधुनी नदीच्या विकासाचा अहवाल तयार केला आहे. तथापि अद्यापही कोणती कारवाई झालेली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी वालधुनी विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन देऊनही कोणती कारवाई झालेली नसून मिठी नदीच्या धर्तीवर वालधुनी विकास प्राधिकरणाची अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने तातडीने कारवाई करावी याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : सक्तीच्या मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत निकषाची पूर्तता करणाऱ्या शाळांना मान्यता प्रदान करण्याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यात दिनांक 1 एप्रिल, 2010 पासून बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी सुरु करणे, त्यानुसार दिनांक 1 एप्रिल, 2010 पासून दिनांक 31 मार्च, 2013 पर्यंतच्या कालावधीसाठी 10 निकषांची पूर्तता करण्याच्या अटीवर शाळांना मान्यता प्रदान करणे, नागपूर भागातील 28 शाळांनी फक्त 2 निकषांची पूर्तता करणे, 41 शाळांनी 3 निकषांची पूर्तता करणे, 77 शाळांनी 4 निकषांची पूर्तता करणे, 290 शाळांनी 5 निकषांची पूर्तता करणे, 1037 शाळांनी 6 निकषांची पूर्तता करणे, 3013 शाळांनी 7 निकषांची पूर्तता करणे, 4273 शाळांनी 8 निकषांची पूर्तता करणे, 3061 शाळांनी 9 निकषांची पूर्तता करणे आणि 1036 शाळांनी 10 निकषांची पूर्तता करणे, त्यामुळे मान्यता प्रदान करण्याबाबत पेच निर्माण होणे, मंत्री महोदयांनी या प्रश्नामध्ये लक्ष घालावे म्हणून मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : ठाणे रेल्वे स्थानकाशेजारील एस.टी.बस स्थानकामध्ये प्रवाशांना सोयी सुविधा पुरविणे याबाबत श्री.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, ठाणे रेल्वे स्थानकाच्या नजिकच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे एसटी स्थानकातून दररोज लाखो प्रवासी एसटी बसने प्रवास करीत असून परिवहन महामंडळाला देखील अधिक उत्पन्न प्राप्त होत आहे. तथापि या एसटी बस स्थानकामध्ये प्रवाशांसाठी सुविधा नसणे, स्थानकाच्या परिसरातील रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे बसचे टायर वारंवार फुटण्याचे प्रकार घडत असून खड्डयामुळे बस रस्त्यावर आदळल्याने प्रवासी जखमी होण्याच्या घडलेल्या घटना, इतकेच नव्हे तर सदर एसटी बस स्थानक मोडकळीस आलेल्या स्थितीत असणे, सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने प्रवाशांना खड्डयात व तुंबलेल्या पाण्यात उभे राहून बसची प्रतिक्षा करावी लागत असून बसमधून उतरलेल्या प्रवाशांना पाणी तुंबलेल्या खड्डयातून पायपीट करावी लागत असणे, एसटी बस स्थानकामध्ये फेरीवाल्यांनी अतिक्रमणे केल्याने प्रवाशांना त्याचा नाहक त्रास सोसावा करावा लागत असून संबंधित महामंडळ प्रशासन, महापालिका प्रशासन यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असणे, परिणामी ठाणे रेल्वे स्थानकानजिकच्या एसटी बस स्थानकाची तातडीने सुधारणा करणे आवश्यक असून प्रवाशांना सोयी सुविधा महापालिकेकडून उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

उप सभापती : माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना मी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी देत आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मुंबईतील चारही आमदार निवासामध्ये मिळून 350 सदस्यांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे. परंतु आमदार निवासात 7 ते 8 हजार लोक अनधिकृतरित्या वास्तव्यास असणे, त्यामुळे आमदार निवासातील सेवा, सोयी सुविधा आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणे, आकाशवाणी निवासालगत अनेक महत्वाची व अति महत्वाची कार्यालये असणे, कार्यालयांसमोर वाहनांची पार्किंग व्यवस्था नसणे, त्यामुळे बेजबाबदारपणे रस्त्यावर वाहने उभी करणे, रस्त्यावरील अनधिकृतपणे वाहनांमुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणे, अतिरेक्यांचे पुढील लक्ष आमदार निवास असल्याचे गोपनीय अहवाल पत्राद्वारे महाराष्ट्र पोलिसांनी आमदार निवास प्रशासनास कळविणे,

नंतर 2एन.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

आमदार निवासाची सुरक्षा मुंबई पोलिसांकडे नसल्यामुळे त्यांना केवळ सावधानतेचा इशारा देणे, आमदार निवासात दुर्धर आजाराने व संसर्गजन्य आजाराने रुग्ण वास्तव्यास असणे, रुग्णांनी वापरलेली बेडशीट व इतर साहित्य आमदार व इतरांच्या सानिध्यात येण्यामुळे अनेक गंभीर आजारांचा फैलाव मोठया प्रमाणात होणे, अनाधिकृत लोक विनाशुल्क वास्तव्य करणे, मात्र माजी सदस्यांना वास्तव्यासाठी शुल्क द्यावे लागणे, राज्यात सुमारे 1600 माजी सदस्य असणे, त्यांच्या निवासासाठी केवळ 24 कक्ष उपलब्ध असणे, आमदार निवासातील सेवा, सुविधा व सुरक्षेबाबत शासनाने गांभीर्याने कार्यवाही करावी अशी शिफारस मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पशुधन सुधारणा(सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VII OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LIVE-STOCK IMPROVEMENT ACT.)

श्री. संजय सावकारे (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 7, महाराष्ट्र पशुधन सुधारणा अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.संजय सावकारे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 7 मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VIII OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 8, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. डी.पी.सावंत: सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 200 चे वि. प. वि. क्रमांक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांसाठी ठोस कार्यक्रम आखणे

मु.शी : ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांसाठी ठोस कार्यक्रम आखणे या विषयावर सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. सुभाष चव्हाण, प्रकाश बिनसाळे, संजय दत्त, श्रीमती विद्या चव्हाण, निरंजन डावखरे, विक्रम काळे, अब्दुल्ला खान दूर्राणी, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, दीपकराव साळुंखे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री एम.एम.शेख, ॲड.जयदेवराव गायकवाड, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात ज्येष्ठ नागरिकांची वाढत असलेली संख्या, ज्येष्ठ नागरिकांनी उमेदीच्या काळात त्यांच्या मुलांचे शिक्षण व त्यांच्या विकासासाठी व इतर बाबींसाठी आपल्या आयुष्याची सर्व पुंजी खर्च करणे, मात्र, हीच मुले त्यांच्याकडे वृध्दापकाळात लक्ष देत नसणे, घरातील वृध्द व्यक्तींकडे एक ओझे म्हणून पाहत असणे, त्यांच्या जेवणाची व औषधांची होत असलेली आबाळ, बरेचसे ज्येष्ठ नागरीक एकटे जीवन जगत असून त्यांच्यावर होत असलेले हल्ले, राज्यात सुमारे 40 ज्येष्ठ नागरिकांच्या झालेल्या हत्या, ज्येष्ठ नागरिकांसाठी केंद्र शासनाने सन 2007 मध्ये कायदा करणे, परंतु राज्य शासनाने अद्यापही टिब्युनल नेमलेले नसणे, वृध्दापकाळात वयोमानानुसार आजारात वाढ होत असल्यामुळे त्यांचा सर्वात जास्त खर्च औषधोपचारावर होत असणे, या ज्येष्ठ नागरिकांना मोफत औषधे देण्याची आवश्यकता, केंद्र शासनाच्या निवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध असणे, त्याच धर्तीवर राज्य शासनाच्या निवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना खाजगी रुग्णालयांसह सर्वत्र मोफत वैद्यकीय सेवा देण्याबाबत शासनाने त्वरित निर्णय घेण्याची आवश्यकता, राज्यात वृध्दाश्रमाची संख्या वाढविण्याची आवश्यकता, इतर राज्याप्रमाणेच या राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना राज्य शासनाने किमान दोन हजार रुपये निवृत्त वेतन देण्याची होत असलेली मागणी,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

जेष्ठ नागरिकांना उर्वरित जीवन समाधानाने जगता यावे यासाठी शासनाने 2004 मध्ये मसुदा जाहीर करणे, परंतु त्याचा लाभ ज्येष्ठ नागरिकांना न होणे, त्यामुळे नवीन मसुदा तयार करुन धोरणात्मक निर्णय जाहीर करण्याची नितांत आवश्यकता, ज्येष्ठ नागरिकांना आयुष्याच्या संध्याकाळी केवळ शारीरिकच नाहीतर भावनिक आधाराची सुध्दा गरज असते हे लक्षात घेता ज्येष्ठ नागरिकांसाठी ठोस कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करणे बाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : या प्रस्तावाला माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह एकूण अडीच तास वेळ देण्यात आला आहे. आपल्याला सदर आजच चर्चा संपवायची आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाच्या अशा एका प्रश्नावर नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. खरे म्हटले तर एका सामाजिक प्रश्नाबाबत ही चर्चा घडवून आणण्यात येत आहे. या प्रश्नाबाबत आपल्या सभागृहामध्ये चांगल्या प्रकारची चर्चा झाली पाहिजे. आज एका मोठ्या वर्गाला आपल्या मदतीच्या हाताची गरज आहे. त्यांच्या पर्यंत पोहोचण्यासाठीचा विलंब कमी व्हावा, त्यांना कुठे तरी दिलासा मिळावा यासाठी शासनाने चांगले धोरण आणले पाहिजे. एवढेच नव्हे तर या धोरणाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा सुद्धा सक्षम करायला हवी.

मला निश्चित कल्पना आहे की, या प्रश्नाकडे केवळ शासनाने लक्ष देऊन उपयोग नाही तर समाजातील सर्वच घटकांनी या वर्गाकडे पाहिले पाहिजे. या वर्गाबद्दल आपली त्यांच्या प्रती काही तरी जबाबदारी आहे याची जाणीव ओळखून व त्यासाठी आवश्यक असलेले मानवी मन याची गुंतवणूक करून या प्रश्नाकडे पहायला हवे.

मी या प्रश्नाचा अधिकाधिक खोलात जाऊन विचार करायला लागलो तेव्हा साधारणपणे गेल्या महिन्याभरातील आपल्याकडे येणारी वर्तमानपत्रे चाळली. वर्तमानपत्रातून ज्येष्ठ नागरिकांचे वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न आपल्या समोर येतात. एवढेच नव्हे तर वेगवेगळ्या वाहिन्यांवरून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची माहिती मिळत असते. एक वेगळा असुरक्षिततेचा भाव त्यांच्या उतारवयात दिसून येतो. नव्हे त्यांना त्यास सामोरे जावे लागते. हे सर्व पाहून खरोखरच अस्वस्थ व्हायला होते. ही साधीसुधी गोष्ट नाही.

सभागृहात भाषण करताना दैनंदिन व्यवहारात घडलेल्या अनेक गोष्टी सांगता येतील. एक वृद्ध आता कमावता नाही. मुले कमावती आहेत. परंतु, वृद्धापकाळामुळे आपण केव्हा जेवलो, केव्हा झोपलो, याचे काहीही भान त्याला राहिलेले नाही. त्याला केव्हाही भूक लागते. केव्हाही झोप येते. त्याच्या मुलांना हे सर्व असह्य झाले. त्याची मुले सुस्थितीतील आहेत. पण आपल्या वडिलांचे काय करायचे, हे त्यांना समजत नव्हते. शेवटी त्यांनी त्यांना घराच्या गच्चीवर एका साखळदंडाला बांधून सहा महिने ठेवले. एखाद्या तुरुंगात असल्याप्रमाणे रोज दिवसातून दोनदा गच्चीच्या दारामधून त्यांच्यासाठी जेवणाचे ताट सरकवले जायचे. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

ही गोष्टी आजूबाजूच्या लोकांच्या लक्षात आली आणि त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली तेव्हा त्या ज्येष्ठ नागरिकाची त्यातून सुटका झाली. हे तर चांगल्या वस्तीत राहणाऱ्या मध्यमवर्गीय घरात घडले. पण या पलीकडे देखील एक मोठा वर्ग आहे जो ग्रामीण भागामध्ये राहातो. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी हा आयुष्यभर कुठल्याही ऑर्गनाईज्ड लेबर युनियनचा सदस्य होऊ शकत नाही.

यानंतर श्री.अजित....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.हेमंत टकले....

स्वत:च्या शेतात राबून मुलांना वाढवतो. शेतीवर कर्ज काढून त्याची परतफेड करतो. हे सर्व करुन आयुष्याच्या संध्याकाळी त्याची उपयुक्तता नष्ट होते त्यावेळी त्याला अक्षरश: रस्त्यावरील भिक्षेकऱ्याचे जीवन जगावे लागते. ही शोकांतिका आज समाजातील सर्व स्तरांमध्ये आहे.

सभापती महोदय, काल माझ्यासमोर एक धक्कादायक बातमी आली. पुणे येथील येरवडा मेन्टल होममध्ये 91 वर्षाची महिला गेली 63 वर्षे ॲडमिट आहे. तिला दिनांक 13 मार्च 1950 रोजी ॲडमिट करण्यात आले. त्या महिलेला स्वत:चे नाव सांगता येत नाही, बाहेर जाता येत नाही. मेन्टल होममध्ये वृध्दांना सोडून देण्याची प्रवृत्ती समाजामध्ये वाढू लागली आहे.

सभापती महोदय, आपण म्हणतो की, वृध्दाश्रमांची संख्या वाढली पाहिजे. परंतु वृध्दाश्रमांचे अनुभव असे आहेत की, वृध्दाश्रमामध्ये दाखल करण्यापर्यंत वृध्दांबरोबर त्यांचे नातेवाईक येतात. त्यांना दाखल केल्यानंतर अधून-मधून भेटायला येतात. नंतर हळूहळू त्यांचे येणे कमी होत जाते. वृध्दाश्रमांमधून घरच्या नातेवाईकांना फोन केल्यास या ना त्या कारणाने फोनवर येण्याचे टाळले जाते. एखाद्या वृध्दाचा वृध्दाश्रमामध्ये मृत्यू झाला तर अंत्यविधी करण्यास त्यांचे नातेवाईक येत नाहीत. तेव्हा वृध्दाश्रम चालविणाऱ्यांची मागणी आहे की, अशा वृध्दांचे अंत्यसंस्कार करण्यासाठी अनुदान द्यावे. ही केवढी मोठी सामाजिक शोकांतिका आपल्यासमोर आहे.

सभापती महोदय, अशी घटना दुसऱ्याच्या घरात झाल्यास आपण हळहळ व्यक्त करतो. त्याबद्दल चिंता व्यक्त करतो. परंतु असा प्रश्न स्वत:च्या घरात उभा राहतो त्यावेळी समाजातील प्रत्येक माणूस त्याकडे कशा पध्दतीने पाहतो, काय करतो हे देखील तपासून पाहण्याची आज वेळ आली आहे.

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्या काही चांगल्या गोष्टी घडल्या त्यामध्ये आरोग्य व्यवस्था सुधारली, चांगल्या औषधांची मागणी वाढली, पुरवठा वाढला, लोकांचे आजार लवकर समजू लागले आणि त्यावर वेळीच इलाज होऊ लागले. या सर्वांचा चांगला परिणाम देशातील नागरिकांची आयुर्मर्यादा दहा-बारा वर्षांनी वाढली. ज्याला आपण Demographic Analysis म्हणू शकू.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, आज देशामध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या दहा कोटींच्या आसपास आहे. महाराष्ट्रामध्ये ही संख्या एक कोटीच्या घरात आहे. ज्येष्ठ नागरिकांचे अनेक प्रश्न चित्रपटांतून, नाटकांतून आणि टी.व्ही सिरीअल्समधून आपल्यासमोर मांडले जातात. पण त्यांच्या प्रश्ना संदर्भातील उद्देश आपण नीट लक्षात घेत नाही तेव्हा तो चुकीच्या पध्दतीने समाजापर्यंत पोहोचतो. एखाद्या जोडप्याची वाटचाल वृध्दत्वाकडे होते. त्यांच्यातील एक साथीदार निघून गेल्यामुळे दुसऱ्याच्या वाट्याला एकटेपण येते. आपल्याकडे वृध्दांची संख्या एक कोटी आहे आणि त्यामध्ये एकटेपण आलेल्या वृध्द महिलांची संख्या 50 टक्के आहे.

यानंतर श्री.बोर्डे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

महोदय, नागपूरमध्ये कोणी तरी एक उपक्रम हाती घेतला होता. ज्या वृध्दांना मुलेबाळे बघत नाहीत किंवा त्यांची हेळसांड करतात अशा वृध्दांसाठी तो उपक्रम होता. आपल्या हक्काचा माणूस शेवटच्या क्षणी आपल्या बरोबर असावा म्हणून पुढील जीवन जगण्यासाठी एकटे राहणाऱ्या दोघांना एकत्र आणणे हा त्यामागील उद्देश होता. त्या दोघांनी एकत्र येऊन पुढील आयुष्याची वाटचाल करावयाची ठरविले तर त्याला समाजाने मान्यता देऊन त्या दोघांना एकमेकांच्या साह्याने जीवन जगण्यासाठी मदत केली पाहिजे. वास्तविक पाहता हा स्तुत्य असाच उपक्रम आहे. परंतु याकडे विकृत नजरेने पाहिले तर हे काही तरी निती नियमाच्या विरुध्द चालले आहे असे वाटेल. त्यामुळे समाजाने या बाबतचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. अनेकांच्या कथा अशा असतात की, ते काबाडकष्ट करुन पैसे कमवितात. कमविलेल्या पैशातून घरे बांधतात. उतरत्या वयात मुले सांगतात की, घर आमच्या नावावर करुन द्या. वृध्द आई-वडिलांनी मुलांच्या नावावर घर करुन दिले की, आपलेच आई-वडील त्यांना नकोसे होतात. अशा नकोशा झालेल्या माणसांची काय अवस्था होते यांचे उत्तम चित्रण वि.वा.शिरवाडकर यांनी 'नटसम्राट' या नाटकात अतिशय उत्कटतेने आपल्यासमोर मांडलेले आहे.

महोदय, 'नटसम्राट' नाटकामध्ये नटसम्राट असलेल्या गणपत बेलवलकर यांना त्यांची पत्नी म्हणते की, तुम्ही आज सत्काराच्या दिवशीच मुलांमध्ये घरांची वाटणी करुन मोकळे का झाला ? त्यावेळी नटसम्राट पत्नीला सांगतात की, मी जे काही दिले ते आपल्या मुलांनाच दिले. आपण आपल्याच मुलांच्या बाबतीत ताटात काय अन् वाटीत काय असा फरक कशासाठी करायचा ? त्यांच्या प्रश्नावर नटसम्राटांची पत्नी चांगल्या पध्दतीने मांडणी करते. ती म्हणते की, आपण समोरच्यांना आपले भरलेले ताट द्यावे, पण बसण्याचा पाट कधी देऊ नये. त्यांच्या पत्नीचा बोलण्याचा मतितार्थ असा असतो की, समोरच्याला कधीही पाट देऊ नये म्हणजे बसण्याची जागा देऊ नये. परंतु वृध्दापकाळाची वेळ अशी असते की, त्या वेळी त्यांना काही सूचत नाही.

महोदय, बऱ्याच लोकांचा विशिष्ट व्यवसाय वा उद्योग असतो. त्या क्षेत्रातील माणसे निवृत्त होत नाहीत. परवा सर्वोच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल केलेल्या महिला वकिलाच्या बाजूने निकाल लागल्यानंतर त्या व्हील चेअरवर बसून मुलाखत देत होत्या. 91 वर्षाचा वकील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

चांगली वकिली करु शकतो, 90 वर्षाचा डॉक्टर आजही ऑपरेशन करु शकतो. एवढेच नव्हे तर 80 वर्षाच्या पुढील अर्थतज्ज्ञ आपली रोजी रोटी कमवू शकतो. परंतु हे क्षेत्र थोड्याशा लोकांपुरते आहे. ज्यांनी आयुष्यभर नोकरी किंवा व्यवसाय केला त्यांचे वय झाल्यानंतर हातपाय चालत नाहीत. याचा अर्थ असा की, वयोमानानुसार त्यांना दृष्टी जाणे, बहिरेपणा येणे इ. अनेक प्रकारचे अपंगत्व येते.

महोदय, 25-30 वर्षांपूर्वी अशी परिस्थिती होती की, साठी ओलांडल्यानंतर डोळ्यात फूल पडले असे म्हटले जायचे. त्या वेळी सहज बोलले जायचे की, आता त्यांचे वय झाले आहे. त्यांचा डोळा दुरुस्त करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे मोतीबिंदूचे प्रमाण वाढत गेले. वास्तविक पाहता मोतीबिंदूची शस्त्रक्रिया छोटीशी असते. या बाबतीत सरकार प्रयत्न करीत आहे याची मला कल्पना आहे.

महोदय, आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या नातेवाईकांची चौकशी केली तर घरच्या मंडळीकडून सांगितले जाते की, ते आता बाहेर येऊ शकत नाहीत. मागच्याच आठवड्यात त्यांच्या गुडघ्याच्या वाट्या बदलण्यात आल्या आहेत. हे खरे आहे की, वयोमानानुसार गुडघे दुर्बल होत जातात. परंतु गुडघ्यावरील शस्त्रक्रिया अतिशय महागडी असते. जेव्हा काही आजार आपल्याला सोबत घेतो तेव्हा तो आयुष्यभर आपल्या सोबत राहतो. ब्लड प्रेशर, डायबिटीज किंवा इतर आजार झाले असतील तर त्या आजारावर नियमितपणे औषधोपचार करावा लागतो.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

ती औषधे नियमितपणे घ्यावयाची असतील तर त्यासाठी महिन्याकाठी काही तरी निश्चित खर्च येणार असतो. ही औषधे चांगल्या दर्जाची आणि योग्य किंमतीमध्ये किंबहुना किंमत न घेता जर आपण वृध्दांना वेगवेगळ्या ठिकाणी उपलब्ध करुन दिली तर त्या निमित्ताने आपण त्यांची फार मोठी गरज भागविणार आहोत.

सभापती महोदय, आपण हे सर्व करतो त्यावेळी यातील एक वर्ग वयोमानाप्रमाणे असा असतो की, त्यांची शारीरिक क्षमता कमी झालेली असली तरी त्यांची बौध्दिक ताकद मात्र शाबूत असते. त्यांची स्मरणशक्ती चांगली असते. त्यांच्याकडे शिकविण्याची हातोटी असते. एखाद्या विषयात त्यांचे प्रभुत्व असते. या सिनिअर सिटीझन्सचा हा एक टॅलेंट पूल आपल्या हाताशी असतो. आपण बघतो की, सगळीकडे शाळामध्ये चांगले शिक्षक दिले जात नाहीत. कोणाला संगीत शिकावयाचे असल तर संगीत शिकण्यास वेळ मिळत नाही. ही सगळी मंडळी म्हणतात की आम्हाला विरंगुळा म्हणून आम्हाला आवडेल असे छोटेसे तरी काम कोठे तरी मिळवून द्या. हे करणे शासनाला अवघड आहे असे मला वाटत नाही. यासाठी त्यांची फार उत्पन्नाची अपेक्षा नसते.

या सर्व लोकांची सुरक्षा हा एक आणखी फार मोठा भेडसावणारा प्रश्न नेहमी सर्वांच्या समोर येतो. मुंबईसारख्या शहरामध्ये बकालपणा इतका वाढलेला आहे की, एकट्यादुकट्या राहणाऱ्या वृध्द माणसावर केव्हा आणि कसा हल्ला होईल हे सांगता येत नाही. गृह खात्याने एक खूप चांगली योजना काढलेली आहे. प्रत्येक मोहल्ल्यातील जबाबदार अधिकाऱ्याला आपल्या भागातील सर्व वृध्द नागरिकांची नोंद ठेवणे, त्यांच्या घरी जाणे, त्यांना वारंवार मदत करणे अशी योजना आहे. मागे मी माझ्या एका लेखामध्ये दिल्लीतील वृध्द महिलेबद्दल लिहिले होते. ती वृध्द महिला एकटी राहात होती. एक पोलीस कॉन्स्टेबल रोज तिच्याकडे जाऊ लागला, तिला मदत करु लागला. सुरुवातीला ती मदत घेण्यास तयार नव्हती. परंतु शेवटी त्या कॉन्स्टेबलमध्ये त्या आईबाईंना आपला नातू सापडला. यथावकाश पोलीस खात्याप्रमाणे अडीच-तीन वर्षात त्या हवालदाराची बदली झाली. तो त्या आजीबाईंकडे हे सांगण्यासाठी गेला की, आता माझी बदली झाली आहे, आता या ठिकाणी दुसरा माणूस येईल तोही तुमची काळजी घेणार आहे. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

आजीबाई मानावयास तयार नव्हत्या. त्या म्हणाल्या, तुझी बदली करणारा कोण अधिकारी आहे ? 90 वर्षाच्या त्या आजीबाई पोलीस आयुक्तांच्या कायालयात गेल्या आणि त्यांना सांगितले की, आमच्या भागात हा कॉन्स्टेबल चांगले काम करीत आहे, यांची बदली करुन नका. बराच वेळ खल केल्यानंतर त्या आजीबाईंनी त्या ठिकाणी धरणे धरले आणि ती बदली रद्द करुन घेतली. 90 वर्षाच्या एका वृध्द महिलेने पोलीस खात्यातील बदली अशी चमत्काराने थांबविली. वृध्द माणसांचे त्यांना मदत करणाऱ्यांशी, त्यांच्याशी जिव्हाळ्याने बोलणाऱ्यांशी जे नाते तयार होते हा अतिशय महत्वाचा भाग आहे.

सभापती महोदय, सर्वसाधारणपणे असे समजले जाते की, एकदा निवृत्ती झाली की, दासबोध वाचा, गीतेचे प्रवचन एंका, मंदिरात जा. खरोखरच या सर्वांचे मन त्या ठिकाणी रमत असेल का याचा कोणी तरी विचार केला आहे का ? त्यांना काही चांगले साहित्य मिळेल, त्यांना चांगली कला बघावयास मिळेल, त्यांचा कोठे तरी चांगला विरंगुळा होईल याचा विचार केला आहे का ? सर्वजण त्यांना भक्तिमार्गाला जाण्यासाठी लोटत असतात. बरेच लोक अनिच्छेने त्यामध्ये बसतात. त्यांचे मन त्यामध्ये रमत नाही. त्यांची श्रध्दा नसते असे नाही परंतु ते म्हणजे सर्वस्व आहे असे मानण्याची त्यांची तयारी नसते. आजारपणामुळे, बदललेल्या सामाजिक व्यवस्थेमध्ये मुलगा आणि सून दोघेही कमविण्यासाठी बाहेर जाणार, मुलगी असेल तर ती तिच्या सासरी जाणार, नातवंडे असतील तर ते कोणत्या तरी होस्टेलमध्ये किंवा दिवसभर बाहेर शाळेत किंवा क्लासमध्ये जाणार. मग घरी फक्त एक वृध्द असतो किंवा दोन वृध्द असतात. मग त्यांनी काय करावयाचे ? त्यांच्यावर बंधने असतात. कारण त्यांना उमगत नाही. त्यांनी गिझर चालू ठेवला आहे का, त्यांनी बाहेरच्या दराचा लॅच नीट लावला आहे का याची काळजी करीत असतो. म्हातारपण हे दुसरे बालपण असते असे म्हणतात. आपण लहान मुलांची जशी काळजी घेतो तशी वृध्दांची काळजी घ्यावी असे संस्कृती आपल्याला सांगते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

घरातील आई कामावर जात असल्यामुळे मुलांसाठी पाळणाघरे तयार केली जातात. त्यामध्ये मुलांना ठेवता येते. माझी सरकारला अशी विनंती आहे की, प्रत्येक शहरामध्ये 'शेल्टर होम' काढावे. जेव्हा घरातील सर्वजण सकाळी नोकरी धंद्याला जातील तेव्हा त्यांनी आपल्या घरातील वृध्दांना तेथे आणून सोडावे. संध्याकाळी कामावरुन परत येताना त्यांना घरी घेऊ जावे. दिवसभर त्यांच्या वयोगटातील त्यांच्यासोबत राहतील, त्यांच्याबरोबर बोलतील, काही तरी संवाद घडेल. तेथे त्यांची चांगली व्यवस्था करावी. या छोट्या छोट्या गोष्टी ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनामध्ये पुन्हा एकदा आनंद फुलण्यासाठी खूप महत्वाच्या आहेत. या सगळ्याबाबत मला नेहमी असे वाटते की, आपण कोणताही प्रश्न सभागृहात चर्चेला घेतला की, शासन आता त्याचे लवकरच धोरण जाहीर करणार आहे असे सांगितले जाते. धोरण या शब्दाचा अर्थ धोरण म्हणून घ्यावा की शासन धोरणी आहे असा घ्यावयाचा ? कोणतीच गोष्ट करावयाची नसते तेव्हा धोरण जाहीर करणार आहे असे म्हणावयाचे असते का असा प्रश्न उपस्थित होतो.

आमचे असे म्हणणे आहे की, केंद्र सरकारचे जेव्हा धोरण निश्चित होईल तेव्हा होऊ दे. आपल्या राज्यातील वृध्दांचे प्रश्न आपल्याला माहिती आहेत. त्यांना दिलासा देण्यासाठी जे जे करणे आपल्याला शक्य आहे, ते शासनाने का करु नये, त्यासाठी केंद्र शासनाची वाट का बघावयाची ? हे न सुटणारे कोडे आहे. या गोष्टी खूप मोठ्या नाहीत. सामाजिक संस्था शासनाला या कामी मदत करण्यास तयार आहेत. आज महाराष्ट्रामध्ये ज्येष्ठ नागरिक संघ नावाची चळवळ अतिशय सक्षमपणे उभी राहिलेली आहे. प्रत्येक गावामध्ये, शहरामध्ये जाऊन ते लोक काम करीत आहेत. त्यामध्ये त्यांचा कोणताही स्वार्थ नाही. परंतु त्यांच्या काही मागण्या आहेत त्या एका सनदीद्वारे मागील महिन्यात शासनाला सादर केलेल्या आहेत. त्या सगळ्या मागण्यांचा मी उल्लेख करणार नाही. परंतु त्या मागण्यांची सनद माझ्या भाषणाचा एक भाग म्हणून सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

या ज्येष्ठ नागरिकांमध्ये अनेक शारीरिक समस्या असतात. परंतु मानसिक आजारांची लागण या वयामध्ये अधिक होत असते. स्मृतीभ्रंश, मानसिक दौंबल्य, कशाची तरी सातत्याने भीती वाटत असणे, कोणत्या तरी दबावाखाली असणे, घरातील कर्त्यासवरत्या लोकांची घरात संध्याकाळी परत येण्याची वेळ असते त्यावेळी तो वृध्द घरातील कोणत्याही तरी एका कोपऱ्यात घाबरुन बसलेला असतो अशी परिस्थिती कित्येक घरांमध्ये दिसून येते. न जाणो आपण काही केले तर कर्त्या माणसांनी दिवसभर जे कष्ट केलेले आहेत किंवा त्यांच्यावर जे प्रसंग आलेले असतील त्याचा राग ते आपल्यावर तर काढणार नाहीत ना असे त्यांना वाटत असते. त्याच्यातूनच पुढे मानसिक दौंबल्याचा विकार जडत जातो. या लोकांनी उदासीन, निराश होण्याचे कारण काय ते शोधणे आवश्यक असते. त्यावर मात करण्यासाठी फार मोठी आर्थिक गुंतवणूक करावी लागेल असे वाटत नाही. यासाठी शासनाला समाजाचेही प्रशिक्षण करावे लागेल. समाजाला अधिक सजग बनवावे लागेल.

शासकीय यंत्रणेमध्ये जे अधिकारी व कर्मचारी काम करतात त्यांनी या प्रश्नाकडे बघताना वेगळ्या नजरेने बघितले पाहिजे. किंबहुना, सर्वच खात्यामध्ये सरमिसळ कारभार असतो. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयामध्ये स्वतंत्र विभाग स्थापन केला पाहिजे. यासाठी सर्व यंत्रणा उभी केली पाहिजे.

प्रत्येकाला अशी जाणीव असते की, आपण केव्हा ना केव्हा आयुष्यात त्या वयाच्या टप्प्यावर पोहोचणार आहोत. आज ते भोगत आहेत त्याप्रमाणे भोगण्याची किंवा आज ज्या सोयी त्यांच्यासाठी करीत आहोत त्या आपल्यासाठी सुध्दा राहतील हा दिलासा मिळण्याची आज आवश्यकता आहे. तो दिलासा देण्यासाठी शासनाने फार प्रयत्न करण्याची गरज आहे. हा काही धोरण जाहीर करण्याचा प्रश्न नाही. या प्रश्नाकडे कोणत्या नजरेने बघत आहोत, या वर्गाला सुरक्षित व आनंदी राहण्यासाठी काय प्रयत्न करतो हे सर्व पुन्हा पुन्हा तपासून पाहण्याची वेळ आलेली आहे. मला वाटते की, कोणत्याही राजकीय पक्षाचा हा विषय नाही. हा विषय समाज बांधणीचा, समाजातील एका उपेक्षित घटकाचा आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

हा एका समाजाच्या बांधणी मधला, समाजामधील एका उपेक्षित घटकाला, ज्यांचे दिवस आता थोडे राहिलेले आहेत, त्यांची एकच मागणी आहे की, त्यांचा शेवटचा दिवस तरी समाधानाने गोड होऊ द्या. हे आपले संचित, आपण जे काही करतो ते चांगल्या भावनेने, प्रामाणिकपणे आपल्याच घरातल्या, आपल्याच समाजातल्या वृद्धांसाठी अधिक काही तरी करण्याची गरज आहे आणि त्या दृष्टीने या ठरावाचा विचार व्हावा अशी मी आपणाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना, त्यांनी अशा प्रकारचा ठराव मांडल्या बद्दल, मनापासून धन्यवाद देतो.सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले आणि मी, आम्ही दोन्ही प्रतोद ज्येष्ठ नागरिक आहोत. आम्ही सरकारी नोकरीमध्ये होतो. सरकारी नोकरीतून रिटायर होणे हे शब्द त्यावेळी धडकी भरविणारे होते. माणूस निवृत्त झाल्यानंतर तो पुढे चार-पाच वर्षेच जगेल अशी त्यावेळी परिस्थिती होती. आता जेवढी डॉक्टरांची आणि दवाखान्यांची व्यवस्था आहे तेवढी त्यावेळी नव्हती. निवृत्ती हा शब्द भयानक असला तरी आपण त्याचे भांडवल करता कामा नये.

सभापती महोदय, महाराष्ट्राची लोकसंख्या 1 कोटी 40 लक्ष आहे. महाराष्ट्रात दिवसेंदिवस ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. आज राज्यात 10 टक्के ज्येष्ठ नागरिक आहेत. 90 टक्के ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन मिळत नाही. 40 टक्के ज्येष्ठ नागरिक एकटे राहातात, त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. 53 टक्के ज्येष्ठ महिला नागरिक विधवा आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी एक वर्षापूर्वी पुण्यामध्ये ज्येष्ठ नागरिक दिनाच्या दिवशी घोषणा केली होती की, लवकरात लवकर ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भातील धोरण जाहीर करण्यात येईल. परंतु अद्याप या बाबतीत कार्यवाही करण्यात आलेली नाही. माननीय सामाजिक न्यायमंत्री श्री. शिवाजीराव मोघे यांना मी विनंती करु इच्छितो की, जेथे आर्थिक बाबींचा संबंध आहे अशा बाबी वगळून अनेक सवलती वद्धांना देता येतील. या सवलतींचा विचार करुन ज्येष्ठ नागरिकांसाठी एक धोरण लवकर जाहीर करावे. आई-वडिलांचे पालन पोषण करण्यासंबंधीचा कायदा 2007मध्ये करण्यात आला. या कायद्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अनेक प्रकरणाची सुनावणी वेळेवर होत नाही, निकाल लवकर लागत नाहीत. ज्येष्ठ नागरिकांसाठी एक प्राधिकरण करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नागरिकांच्या पेन्शनचा विषय प्रलंबित आहे. गोवा राज्याने प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांसाठी 2 हजार रुपये पेन्शन लागू केलेली आहे. आपले राज्य किती तरी मोठे आहे. आपल्या राज्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी 3 हजार रुपये पेन्शन द्यावी अशी मी मागणी करीत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा फार मोठा प्रश्न अलीकडे निर्माण झालेला आहे. त्यांच्यावर हल्ले होण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यांना सुरक्षितता मिळत नाही. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती करावी, हेल्प लाईन सुरु करावी. बरेच वृद्ध निराधार झालेले आहेत. राज्यात 350 वृद्धाश्रम आहेत. या वृद्धाश्रमामध्ये आमुलाग्र बदल करुन ते सुसाध्य करावेत. सरकारी रुग्णालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र वार्डाची व्यवस्था करावी, त्यांच्यासाठी स्वतंत्र विंडो करावी, त्यांना हेल्थ इंशुरन्स फॅसिलिटी द्याव्यात अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, पर्यटन हे ज्येष्ठ नागरिकांचे टॉनिक आहे. पर्यटनामुळे ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्य वाढते. आता उत्तराखंडामध्ये जी घटना आपण टी.व्ही.वर पाहिली त्यामध्ये 80 टक्के ज्येष्ठ नागरिक होते. ज्येष्ठ नागरिकांना पर्यटनातून आनंद मिळतो, त्यांचे आयुष्य वाढते. म्हणून शासनाने त्यांना पर्यटनासाठी जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. पूर्वी कोकणातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना चाकरमान्यांच्या मनी ऑडर्स येत होत्या. पोस्टमन केव्हा मनी ऑर्डर घेऊन येईल याची कोकणातील ज्येष्ठ नागरिक आतुरतेने वाट पहात होते. आज कोकणामध्ये तशी परिस्थिती नाही. आता कोकणामध्ये सीवर्ल्ड सारखे हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प उभे होत आहेत. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिक रमतील अशी मी आशा करतो.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिक दिनी वृद्धांच्या आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी शिबिरे आयोजित केली पाहिजेत. वृद्धाच्या मानसिक आरोग्याकडे फारसे कुणी पहात नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

त्यासाठी प्रत्येक कुटुंबाने व शासनाने पुढाकार घेतला पाहिजे.

सभापती महोदय, वृध्दांचा सुरक्षिततेचा प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. ज्येष्ठ नागरिकांकडे असलेली प्रॉपटी बघून त्यांच्यावर हल्ला होतो. आज स्वत:ची मुले आई-वडीलांना सोबत ठेवत नाहीत. ज्येष्ठ नागरिकांकडे तुटपुंजी प्रॉपर्टी असते, ती प्रॉपर्टी मिळावी म्हणून त्यांच्या हल्ला होतो ही दुर्देवी गोष्ट आहे. ज्येष्ठ नागरिकांना योग्य ती सुरक्षा मिळत नाही. या ठिकाणी एका पोलीस हवालदाराचे उदाहरण दिले गेले. ते उदाहरण अंगावर शहारे आणणारे आहे. ज्येष्ठ नागरीक फार हुशार असतात. दिवसें दिंवस त्यांची प्रगती होत जाते आणि विचारशक्ती वाढत जाते. ते आक्रमक असतात. ते एकत्रित आले तर आक्रमकपणे वागू शकतात. निराधार असलेल्या वृध्द नागरिकांची माहिती पोलिसांना देण्याबाबतीत राज्य शासनाने पुढाकार घेतला पाहिजे. प्रत्येक पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात जे ज्येष्ठ नागरीक राहतात त्यांची यादी पोलीस स्टेशनकडे असली पाहिजे.

सभापती महोदय, गेल्या महिन्यामध्ये सहा वृध्द महिलांच्या हत्त्या झाल्या. त्या सर्व हत्त्या चोरीच्या हेतूने केल्या गेल्या. वयोवृध्दांच्या हत्त्या होतात, त्याची टक्के्वारी बघितली तर चोरीमुळे जास्त हत्त्या झालेल्या आपणाला दिसून येतील. चोरटयांनी त्यांना लक्ष्य केले आहे. एकटे राहणाऱ्या वयोवृध्दास शेजाऱ्यांनी मदत केली पाहिजे. वयोवृध्दांच्या अडचणी सोडविण्यासाठी राज्य शासनाने समन्वय ठेवला पाहिजे.

सभापती महोदय, मुंबई शहरात ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी बी.ई.एस.टी.ने दैनंदिन प्रवास करण्यासाठी 40 रुपयांचा पास उपलब्ध करुन दिलेला आहे. ज्येष्ठ नागरिकांकडे तो पास असतानांही बी.ई.एस.टी.च्या वाहकाकडून पुरावे म्हणून स्मार्ट कार्ड, आधार कार्ड इत्यादीची मागणी केली जाते. बी.ई.एस.टी.ने स्मार्ट कार्ड असले पाहिजे, आधार कार्ड असले पाहिजे अशा जाचक अटी टाकलेल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी त्या अटी शिथिल केल्या पाहिजेत. त्या अटी शिथिल करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला पाहिजे. बी.ई.एस.टी.चे 40 रुपयांचे तिकीट 25 रुपये करावे ज्येष्ठ नागरिकांकडून अशी मागणी होत आहे. त्या मागणी बाबत देखील शासनाने विचार केला पाहिजे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, नामांकित डॉक्टरांच्या रुग्णालयात आणि सर्व नामवंत रुग्णालयांमध्ये 70 ते 75 वर्षे वयाच्या ज्येष्ठांना आरोग्य तपासणी कामी प्राधान्य देण्यात यावे. कारण वयोवृध्द ज्येष्ठ नागरीक एका जागेवर फार वेळ बसू शकत नाही. त्यांचा चक्कर येते, झोप येते. त्यामुळे त्यांना आरोग्य तपासणी कामी प्राधान्य द्यावे अशा प्रकारच्या सूचना राज्य शासनाने सर्व नामांकित रुग्णालयांना द्याव्यात.

सभापती महोदय, हल्ली औषधांच्या किंमती खूप वाढलेल्या आहेत. शस्त्रक्रियेवरील खर्च हा गगनाला भिडला आहे. ज्येष्ठ नागरिकांना औषध खरेदीमध्ये 20 ते 50 टक्क्यांपर्यंत सवलत राज्य शासनाने दिली पाहिजे. शस्त्रक्रियेचा खर्च लाख रुपयांपेक्षा जास्त असतो. ज्येष्ठ नागरिकांना तो खर्च परवडत नाही. या बाबतीत राज्य शासनाने स्वतंत्र धोरण जाहीर केले पाहिजे.

सभापती महोदय, प्रत्येक ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य देणे हे कायद्याने बंधनकारक करावे. वीज बील भरणे, दूरध्वनीचे देयक भरणे अशा ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. रेल्वे गाडीत ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डबा आरक्षित ठेवण्यात यावा.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांची मुले कामानिमित्त बाहेर गावी जातात अशा वेळी त्यांना एकाकी जीवन जगावे लागते. अशा वेळी त्यांना सुरक्षिततेची अत्यंत गरज असते. ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत प्रचंड मागण्या आहेत. परंतु त्या मागण्या न करता ज्येष्ठ नागरिकांसाठी एक चांगले धोरण राज्य शासनाने तत्काळ जाहीर करावे अशी मी कळकळीची विनंती करतो आणि माझे छोटेसे आणि संक्षिप्त भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी तालिका सभापती : ॲड.अनिल परब

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अत्यंत संवेदनशील विषय सभागृहात उपस्थित केलेला आहे. हे ज्येष्ठाचे सभागृह आहे म्हणून मी बोलण्यासाठी उभा राहिलो आहे. ज्येष्ठांच्या सभागृहामधून ज्येष्ठ नागरिकांच्या संवेदना व्यक्त होणे हा या सभागृहाचा सन्मान आहे. दुर्दैवाने सभागृहाचे नाव आता ज्येष्ठ राहिलेले आहे. परंतु आता सदस्य म्हणून जे आणले आहेत, ते सगळे पहिलवान आहेत. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो. कालच आपल्याकडे ज्येष्ठांच्या सन्मानाची एक तालीम झाली. अधिवेशन सुरु झाले, कोणी कोठे बसावयाचे यावरुन ज्येष्ठामध्ये एकमेकात विचारणा होत होती. डॉ.पतंगराव कदम की श्री.शिवाजीराव मोघे यात ज्येष्ठ कोण आहेत. विधिमंडळातील ज्येष्ठांची नोंद वर्तमानपत्राच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राला घ्यावी लागली. त्यांची ज्येष्ठता माननीय डॉ.पतंगराव कदम यांनी मान्य केली. आज या चर्चेला उत्तर माननीय श्री.शिवाजीराव मोघे देणार आहेत. त्यामुळे तुम्ही ज्या काही सूचना केल्या आहेत, त्या सूचनांचा निश्चितपणे सन्मान होईल असे मला वाटते. हा दोन गोष्टींचा विषय आहे.....

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आजच्या वर्तमानपत्रात बारबालांच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिला त्या अनुषंगाने 'घुंगरु सुटलं' अशी एक सुंदर कॅप्शन आली आहे. पत्रकाराची कल्पकता कशी असावी याचे ते मूर्तिमंत उदाहरण आहे. घुंगरु सुटलं याचा अर्थ न्यायालयाने काय म्हटले, बारबालांचे म्हणणे आहे की आम्हाला कामाचा हक्क आहे. आज जी चर्चा सुरु आहे ती वयोमानानुसार आम्ही जरी वडिलधारी झालो असलो तरी आम्हालाही जगण्याचा हक्क आहे. ही संवेदना आपण मांडत आहोत.

सभापती महोदय, या संवेदनेवर बोलत असताना आज जे सुरक्षित आहेत, आर्थिकदृष्टया सबळ आहेत त्याचबरोबर जे दुर्बल आहेत त्या सगळ्याच्या बाबतीत परिस्थिती अशी आहे की, वयोमानानंतर काय? या देशाचे संस्कार होते. आपल्या घरामध्ये एक तरी ज्येष्ठ असणे हे वैभव समजले जायचे. त्याचा अंतिम शब्द हा घरात सर्वोच्च असायचा. घरामध्ये कितीही तंटे बखेडे झाले तरी त्या ज्येष्ठाने सांगितल्यानंतर घरातील वातावरण मंगलमय व्हायचे. घरात मंगलमय वातावरण निर्माण करण्याची पोषकता त्या ज्येष्ठाच्या शब्दामध्ये असायची.

सभापती महोदय, आमचा रामकृष्ण जेव्हा रामा आणि कृष्णा झाला तेव्हापासून आमचे संस्कार बिघडले. देवालाच कारे मध्ये मोजल्यानंतर घरातील ज्येष्ठांना कारे म्हणण्याचा संदर्भ आला. पूर्वी चुकून माकून घरातील वडिलधाऱ्यांना कोणी अरे म्हटले तर पटकन दम भरला जायचा. कोणी अरे बोलायचे नाही. आता नवीन फॅशन आली आहे. आता सर्रास घरातील ज्येष्ठांच्या सहवासात अरे बोलत नातवंडे मोठी होतात. घरातून बाहेर गेल्यानंतर आजोबा आणि नातू एकमेकाशेजारी बसतात.. अरे तुरेच्या भाषेत बोलत असतात. संस्कारामध्ये प्रचंड दरी निर्माण झाली आहे.

हा धार्मिकतेचा विषय नसून संस्काराचा विषय आहे. मुलांनी सायंकाळी घरी आले पाहिजे. हात पाय धुतले पाहिजेत. देवासमोर उभे राहून दिव्या दिव्या दिप:कार, कानी कुंडल मोती हार म्हटले पाहिजे. हे झाल्यानंतर देवाला नमस्कार म्हणजे सरस्वतीला नमस्कार केला पाहिजे. त्यानंतर दररोजची उजळणी म्हटली पाहिजे. हे सगळे घरातील ज्येष्ठ करुन घ्यायचे. त्यांच्याबद्दल आदर असायचा. आता हे सगळे संपले आहे. मध्यंतरी "7 च्या आत घरात" हा सिनेमा प्रदर्शित झाला होता, त्यात हे सर्व दाखविण्यात आले आहे. घरामध्ये प्रत्येकाचे शील असते. फक्त महिलांना शील असते असे नाही. साहित्यामधील शील या शब्दाचा अर्थ प्रत्येकाला लागू होतो. नवीन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पिढीतील संस्कार लोप पावल्यामुळे, रामा आणि कृष्णा यांची टिंगल टवाळी वाढल्यामुळे ज्या घटना घडतात त्यातून हा विषय व्याकूळतेने व कळकळीने मांडावा लागतो.

माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी आरोग्याचा विषय मांडला. वयोवृध्दांचे आरोग्य कसे असते? ज्यावेळी आदरणीय सभापतींच्या दालनामध्ये बैठक घेण्यात आली त्या बैठकीला मी उपस्थित होतो, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले उपस्थित होते, उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार उपस्थित होते, माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. आमदारांच्या पेन्शनचा विषय निघाला. माननीय उपमुख्यमंत्री म्हणाले, पेन्शन दरमहा 15 हजार ऐवजी 17 हजार करु.

2डब्ल्यू.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यावेळेस मी म्हणालो होता की, 17 कशाला करता त्यापेक्षा करुच नका. आमदारांची पेन्शन वाढवायचीच असेल तर व्यवस्थित वाढवा. आता जे काही ज्येष्ठ आमदार आहेत त्यातील बऱ्याच आमदारांना मधुमेह झालेला आहे. ज्यांना मधुमेह होतो त्यांना औषधोपचारासाठी महिन्याकाठी जवळपास 4000 रुपये खर्च येतो. औषधांचे तरी पैसे सुटतील या भावनेने ज्येष्ठ आमदारांच्या पेन्शनमध्ये वाढ व्हावी असे मी त्यावेळेस सांगितले आणि त्याच क्षणाला दादांनी माजी आमदारांना 25,000 रुपये पेन्शन केली. आता पुन्हा औषधांचे दर वाढले असल्यामुळे त्यामध्ये अजून वाढ करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, समाजामध्ये तुम्ही आम्ही सगळेच काम करीत असतो. मी पूर्वीपासून ज्येष्ठांसाठी आरोग्य शिबीरे भरवित आहे. ज्येष्ठांसाठी आरोग्य शिबीरे भरविणे हा माझा छंदच होता. मी ग्रामीण भागात फिरतो. ॲग्रोसील झाला माणूस शरीराचे वजन घेऊन फिरत असतो. फूल पडल्यानंतर तो आजार समजतो. ॲग्रोसीलचे ऑपरेशन करण्यासाठी फक्त 3 मिनिटे लागतात. 1200 ते 1300 ऑपरेशन गावागावामध्ये झालेली आहेत. ॲग्रोसीलचे ऑपरेशन झाल्यानंतर रुग्णाला चार दिवस सांभाळावे लागते. ग्रामीण भागातील शिवसेनेच्या शाखेमध्ये ज्येष्ठांच्या डोळयाचे मोफत ऑपरेशन होत असते व ऑपरेशन झाल्यानंतर 50 रुपयांमध्ये चष्मा सुध्दा दिला जातो. अशा प्रकारचे छोटे छोटे कार्यक्रम आपण सर्वजण आपापल्या पध्दतीने करीत असतो.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये ज्येष्ठांना मोफत सेवा असा विषय आहे. शासनाच्या दवाखान्यात सर्वांवर मोफत इलाज होत असतो व मुंबईमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये सर्वांवर मोफत उपचार होत असतात. या दवाखान्यात गेलेल्या माणसाला सर्व प्रकारची सेवा मोफत उपलब्ध झाली पाहिजे अशा प्रकारचे व्यवस्थापन खऱ्या अर्थाने झाले पाहिजे. मोठया रुग्णालयात जाऊन मी ऑपरेशन करेन आणि शासनाने त्याचा सर्व भार उचलावा असे म्हटले तर ते कोणत्याही सरकारला शक्य नाही. त्यामुळे दवाखान्याच्या सेवा चांगल्या कशा होतील हा विषय येथे मांडला गेला पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी निवृत्ती वेतनाचा विषय प्रस्तावामध्ये उपस्थित केलेला आहे. हा विषय सरकारच्या धोरणाचा विषय आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

पूर्वी माणसांची वयोमर्यादा 60 होती परंतु आता चांगली औषधे उपलब्ध होत असल्यामुळे आता वयोमर्यादा 75 वर्षे झालेली आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या माध्यमातून मी एक विषय उपस्थित करणार आहे. आज मी जेथे उभा आहे त्या जागेवर अगोदर माननीय आमदार श्री. प्रमोद नवलकर बसत असत. माननीय प्रमोद नवलकरांनी नाना-नानी पार्कचा विषय या महाराष्ट्रात निर्माण केलेला आहे. गिरगाव चौपाटीची पूर्ण स्वच्छता माननीय प्रमोद नवलकर साहेबांनी केली होती, त्या ठिकाणी त्यांनी फक्त ज्येष्ठांसाठी नाना-नानी पार्कचा कन्सेप्ट निर्माण केला. नाना-नानी पार्कमध्ये ज्येष्ठ येतात, बसतात, गप्पा होतात, मैत्री होते यामध्ये त्यांचे दोन तीन तास निघून जातात. आता नाना-नानी कन्सेप्ट संपूर्ण महाराष्ट्रात रुजला आहे. एखाद्या संकल्पनेतून एखादी गोष्ट निर्माण झाली तर ती कशी रुजते त्याचा महाराष्ट्राने अनुभव घेतलेला आहे.

सभापती महोदय, मी अजून एक संवेदनशील विषय येथे मांडणार आहे. माननीय शिवसेना प्रमुखांनी शिवसेनेच्या वतीने पहिला वृध्दाश्रम खोपोली येथे सुरु केला आणि तो आजही सक्षमपणे सुरु आहे.

यानंतर श्री. भारवि....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, हा कन्सेप्ट कुठून निर्माण झाला ? आमच्या माँ साहेब दुपारच्या वेळी ओळखीच्या लोकांकडे जायच्या. त्यांना आलेला अनुभव मी आपणास अधिकृतरित्या सांगत आहे. त्या एका ओळखीच्या व्यक्तींकडे गेल्या होत्या. त्यावेळी त्या घरातून दुपारच्या वेळी एका खोलीमध्ये जेवणाचे ताट सरकवले गेले. त्यावेळी त्यांनी सहजपणे विचारले की, हे काय आहे ? त्यांनी सांगितले की, आमचे अण्णा त्या खोलीमध्ये असतात, त्यांना आम्ही जेवणाचे ताट देतो. त्यांचे वय झ ाल्यामुळे आम्ही त्यांना तेथेच ठेवले आहे असे त्यांनी सांगितले. हा त्यांचा घरगुती विषय असल्यामुळे माँ साहेब काहीच बोलल्या नाहीत. पण त्या घरी आल्यानंतर त्यांना संवेदना एवढी बोचली की, त्यांनी ही व्यथा आदरणीय शिवसेनाप्रमुखांकडे मांडली. त्यांनी एकच विचारले की, आपण महाराष्ट्राचे सर्व काही पाहता पण अशा वृद्धांचे काय ? या संवेदनेतूनच खोपोलीचा वृद्धाश्रम निर्माण झाला.

या वृद्धाश्रमामध्ये माननीय शिवसेनाप्रमुखांची आणखी एक संवेदना मी अनुभवली आहे. आम्ही तेथे जात होतो. आदरणीय शिवसेनाप्रमुख त्या वृद्धाश्रमामध्ये जाऊन महिन्यातील किमान दोन दिवस घालवत होते. ते वृद्धाश्रमातील लोकांशी गप्पा मारायचे. त्यामुळे आम्हाला देखील त्यांच्या भेटीची संधी मिळायची. ही 1991 सालातील गोष्ट आहे. त्यावेळी मी मुंबई महानगरपालिकेचा सदस्य होतो. खोपोलीच्या वृद्धाश्रमा समोर एक डोंगर आहे. मी आणि आदरणीय शिवसेनाप्रमुख वृद्धाश्रमामध्ये फिरत असताना एका कोपऱ्यात माननीय शिवसेनाप्रमुख उभे राहिलेत. ते मला म्हणाले, दिवाकर हा डोंगर पाहिलास काय ? मी म्हटले होय. असा डोंगर आपल्याला मिळायला पाहिजे. मला असे वाटते की, जी बेवारस मुले आहेत, ज्यांना नाव नाही, गाव नाही, अशांकरिता एक वेगळा आश्रम या डोंगरामध्ये निर्माण करायचा आणि त्या सर्व मुलांना शिकवून असे तयार करायचे की, ते सैन्यातच गेले पाहिजेत. इतर कुठेही जाता कामा नयेत. त्यांना आगापीछा नसल्यामुळे ते समर्पित भावनेने लढतील. कारण त्यांच्या मागे कोणीही नसतील. अशी त्यांची संकल्पना होती. दुर्दैवाने आम्ही पण ते करू शकलो नाही. या भटक्या मुलांना कुठे तरी एकत्र आणावे आणि त्यांना कुठे तरी एक शेड असावी असा त्यांचा उद्देश होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

हा अत्यंत खेदजनक आणि उद्वेगजनक प्रश्न आहे. शिवशाही आल्यानंतर माँ साहेबांनी, साहेबांकडे एकच गोष्ट मागितली की, सगळ्या जिल्ह्यात वृद्धाश्रम निर्माण करावेत. त्यानुसार शिवशाही सरकारीने सर्व जिल्ह्यात वृद्धाश्रम निर्माण केले. पाच एकर जमीन आणि बांधायचा खर्च शिवशाहीने दिला. ही वृद्धांप्रती आमच्या माँ साहेब आणि माननीय शिवसेनाप्रमुख यांना संवेदना होती, जाण होती, जाणीव होती. आपल्या सरकारने हे वृद्धाश्रम रद्द का केले ? हा निर्णय का रद्द करण्यात आला ? केवळ शिवशाहीने निर्माण केले म्हणून ? झुणका भाकर केंद्र योजना देखील आपण रद्द केली. होय.... तरूणांना वाव मिळावा म्हणून आणि या देशाची सेवा करावी म्हणून ही योजना आणली होती. माननीय शिवसेनाप्रमुखांच्या संकल्पनेमध्ये नेहमीच देश असायचा. तरूणांनी सैन्यात जावे म्हणून प्रत्येक जिल्ह्यात सैनिक शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्याही शाळा आपण रद्द केल्या. समाजाला उन्नती देणारे, समाजात सामर्थ्य निर्माण करणारे जे जे निर्णय होते ते आपल्या सरकारने रद्द केले. ते का रद्द केले हे कळले नाही. केवळ शिवशाहीचे निर्णय होते म्हणून रद्द केले काय ?

मी अभिमानाने सांगतो की, संभाजीनगर येथील श्री.सापळे यांचा वृद्धाश्रम अत्यंत उत्तम परिस्थितीमध्ये सुरू आहे. खोपोलीचा वृद्धाश्रम हा शिवसेना ट्रस्टच्या माध्यमातूनच चालविला जातो. त्याचा काही प्रश्नच नाही.

या चर्चेमध्ये आपण सहभागी होत असताना तळमळ मांडत असताना आपल्या आयुष्यातील एक क्षण वृद्धांच्या सेवेकरिता कधी घालविला आहे काय याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. समाजाला हातभार लावण्याचे सामर्थ्य प्रत्येक राजकीय पक्षाने प्रत्येक कार्यकर्त्याला दिले आहे. त्यामुळे आपल्या आयुष्यातील एक क्षण वृद्धांच्या सेवेकरिता घालविला तर फार बरे होईल. मला फक्त एकच सुचवावेसे वाटते. मला फार मोठे काही बोलावे असे वाटत नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, अमेरिकेमध्ये वृध्दांना खास सवलत दिली जाते. त्या संदर्भात मी माहिती घेतली तेव्हा मला असे समजले की, त्या ठिकाणी तरुणपणी काम करीत असताना त्यांच्या पगारातील एक ठराविक रक्कम कापण्यात येते आणि ती रक्कम नंतर त्यांच्यावर खर्च केली जाते. अमेरिकेमध्ये वृध्दांना प्रवासामध्ये पूर्ण सवलत दिली जाते म्हणून तेथील वृध्द आपणास इतके-तिकडे फिरताना दिसतात. तरुणपणी नोकरी करताना पगारातील एक ठराविक रक्कम कापून घेत असल्यामुळे सर्व वृध्दांना जगण्याचे सामर्थ्य मिळालेले आहे. अमेरिकेप्रमाणे आपल्या येथे कर लावा असे मी म्हणत नाही. कर लावा असे आपणास म्हणता येत नाही. कारण आपल्याकडे गंभीर परिस्थिती आहे. आपल्याकडे रुपयाच्या अवमूल्यनातून महागाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. तेव्हा ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात कोणते धोरण आखायचे हा प्रश्न आहे. धोरण आखल्यानंतर त्याची अंमलबजावणी कशी करायची हा देखील प्रश्न निर्माण होतो. आपण प्रत्येक वृध्दांना संरक्षण देऊ शकत नाही. घरातील सर्व मंडळी फिरायला जातात तेव्हा ते वृध्द घरात एकटे असतात. अशा छोट्या छोट्या गोष्टी सरकार पाहू शकत नाही. तेव्हा सर्वसामान्यांना उपयोगी येतील, त्यांना आधार मिळेल अशाप्रकारचे धोरण निर्माण करता येईल काय हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे वृध्दांच्या समवेत काही तास घालविता येतील असे नाना-नानी पार्क सारखे प्रकल्प उभे करता आले तर पहावे. आमदार निधीतून मोठ्या शहरांमध्ये आणि जिल्हा-तालुका पातळीवर असे प्रकल्प उभे करण्यास मंजुरी दिली तर चांगले प्रकल्प उभे राहू शकतील. आमदार निधी आणि शासकीय अनुदान दिले म्हणजे् जर आमदार निधीतून दहा लाख रुपये दिले तर त्यामध्ये आणखी दहा लाख डी.पी.डी.सी.तून अनुदान रुपाने दिल्यास या रकमेतून चांगले नाना-नानी पार्क सारखे प्रकल्प उभे राहतील. नाना-नानी सारखे पार्क उभे केल्यास वृध्दांना त्यांच्या जीवनातील दोन-तीन तास एकत्र घालविता येतील. मी नगरसेवक असताना माझ्या भागात अशीच दीनदयाळ उद्यान निर्माण केलेले आहे. ज्या ठिकाणी दारुच्या भट्टया लागत होत्या ठिकाणी बाग निर्माण केली आहे. आज त्या ठिकाणी अनेक वृध्द एकत्र येतात. गप्पा मारतात. तेथे छोट्या मुलांना खेळण्यासाठी देखील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

व्यवस्था केलेली आहे. आपण आपल्या आमदारफंडातून अशाप्रकारच्या सोयी निर्माण केल्या तर या ठरावाच्या निमित्ताने आपण वृध्दांप्रती काहीतरी योगदान दिले असे वाटेल. अन्यथा पांडित्य दाखविण्याकरिता चर्चा केली. भावना प्रकट केल्या आणि बाकी सर्व कोरे असे होता कामा नये. या सदनातील सर्व आमदारांनी आपल्या मतदार संघात वृध्दांसाठी यातील एक जरी प्रक्रिया निर्माण केली तर हा प्रस्ताव सार्थकी लागला असे वाटेल.

या प्रस्तावाच्या निमित्ताने मला माँ साहेबांच्या आणि आदरणीय शिवसेनाप्रमुख यांना वृध्दांप्रती असलेल्या संवेदना मांडण्याची संधी मिळाली त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना मी मनापासून धन्यवाद देतो. शिवसेना पक्ष हा माणसाच्या सर्व अंगाचा आपल्या पध्दतीने विचार करुन त्या त्या पातळीवर काम करीत असतो हे मी येथे आवर्जून सांगतो. या चांगल्या प्रस्तावाला मी मनापासून समर्थन देतो, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांबाबत प्रस्ताव मांडला असून त्यावर हे सभागृह अतिशय गंभीरपणे, सहृदयतेने आणि संवेदनशीलतेने चर्चा करीत आहे. या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करीत असताना मी सांगू इच्छितो की, राज्य संस्थेने समाजातील अतिशय महत्त्वपूर्ण असलेल्या ज्येष्ठांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले पाहिजे. त्यांचे जे प्रश्न आहेत त्याकडे राज्य सरकारने सहृदयतेने पाहून त्या अनुषंगाने निश्चितपणे उपाययोजना केली पाहिजे, या उद्देशानेच हा प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे.

महोदय, प्रत्येकाच्या आयुष्यात ज्येष्ठ होण्याची वेळ येत असते. माणसाचे वय जसजसे वाढते तसतसा तो ज्येष्ठ होतो. सर्वच ज्येष्ठांची दयनीय अवस्था असते असे नाही. अनेक ज्येष्ठ नागरिक विचाराने समृध्द असतात, जगण्याच्या सर्व सुविधा त्यांना मिळत असतात. अनेक ज्येष्ठ नागरिक राजकारणात काम करीत असतात. देशाचे माननीय पंतप्रधान यांचे वय सुध्दा 80 वर्षांपेक्षा जास्त असेल. ज्येष्ठ नागरिक इतरांच्या मदतीवरच जगतात असे नाही.

महोदय, समाजातील काही ज्येष्ठ असे असतात की ते काही काळाने परावलंबी होतात. ते आर्थिकदृष्ट्या, शारीरिकदृष्ट्या परावलंबी होतात. त्यामुळे त्यांना मदतीचा आधार लागतो. अशा ज्येष्ठांच्या बाबतीत आपण या ठिकाणी चर्चा करीत आहोत. माझे अवलोकन आहे की, आपली कुटुंब संस्था ही नात्याने घट्ट असलेली माणसांची वीण असते. एकत्र कुटुंब पध्दतीत जीवन जगणारी माणसे चांगल्या पध्दतीने जीवन जगत असतात. मी झोपडपट्टयांमध्ये फिरताना मला चांगली कुटुंबे किंवा कुटुंब संस्था बघावयास मिळतात. वयाच्या 70 व्या, 80 व्या वर्षी घरातील वृध्द व्यक्ती मृत पावली तर, ती सोडून गेल्याने अतिशय आक्रोश करुन रडणारी माणसे दिसतात. मुळात माणूस भावनेने गुंतलेला असला तरी एकमेकांच्या आधाराने आणि प्रेम व मायेवर तो जगत असतो. अशा कुटुंबातील वृध्द माणसांचे फारसे प्रश्न नसतात. समाजातील अशा वृध्द लोकांना आधार मिळाला तर त्यांचे जीवन अधिक सुखकर होईल या दृष्टिकोनातूनच आपण विचार करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड....

महोदय, वृध्द व्यक्ती परावलंबी झाली तरी ती लाचाराने जगण्याची धडपड करते. अशा वेळी राज्य संस्थेने त्यांच्याकडे सहृदयतेने पाहिले पाहिजे. त्या नजरेने त्यांच्याकडे पाहिले नाही तर आपण पुरोगामी राज्य संस्था म्हणून म्हणवून घेऊ शकणार नाही. एखाद्या कुटुबांतील व्यक्तीने वृध्द व्यक्तीला घरातून काढून दिले असेल आणि तिने भीक मागण्यास सुरुवात केली तर त्या कुटुंबाला नाव ठेवणारे लोक समाजामध्ये असतात. समाजाची एक प्रकारची नीतिमत्ता असते. असे असले तरी काळानुरुप समाजामध्ये बदल होत आहे. माणसे एकमेकांपासून तुटत आहेत. ऋणानुबंध फरक पडत चालला आहे. माझा स्वत:चा अनुभव आहे की, सधन कुटुंबामध्ये सुध्दा वयोवृध्दांचे प्रश्न पहावयास मिळतात.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड .....

आर्थिकदृष्ट्या अतिशय चांगले कुटुंब असताना देखील म्हातारी माणसे मात्र वणवण फिरताना दिसतात किंवा त्यांची अतिशय परवड झालेली बघावयास मिळते. अशा परिस्थितीमध्ये राज्यसंस्था पुढे आली आणि तिने विचार केला तर निश्चितपणे ज्या व्यक्ती वयाने अशा ज्येष्ठ होत जातात त्या व्यक्ती लाचार होणार नाहीत. त्यांनी लाचार होता कामा नये. जर कुटुंब संस्था त्या व्यक्तीला आधार देत नसेल, समाज आधार देत नसेल, तिला मानसन्मानाने आधार मिळत नसेल तर राज्यसंस्थेने पुढे आले पाहिजे, असे मला वाटते. राज्यसंस्थेवर त्यांचा हक्क आहे. कारण तो ज्या मातीमध्ये जन्मला आणि वाढत पुढे गेला, त्याने जे योगदान दिले असेल किंवा त्याने जे कष्ट केले असतील, त्यादृष्टीने याचा विचार केला पाहिजे.

पुण्यातील आमचे ज्येष्ठ मित्र श्री. बाबा आढाव यांची सातत्याने एक मागणी असते की, आपण ज्येष्ठांना पेन्शन द्यावी. खरे म्हणजे सरकारने ही मागणी का होते या दृष्टीने विचार केला पाहिजे. असे जे ज्येष्ठ आहेत त्यांना राज्यसंस्थेने आधार देण्याची गरज आहे. कारण ते लाचार होता कामा नये. ते रस्त्यावर येता कामा नये. खरे तर आपल्या रस्त्यावर भिकारी दिसता कामा नये अशी आपली अपेक्षा असली पाहिजे. लोक नेहमी सांगतात की, परदेशामध्ये आम्हाला एकही भिकारी पहावयास मिळाला नाही. आपण परदेशातील लोकांचे कौतुक करीत असतो. परदेशामध्ये प्रचंड स्वच्छता असते. त्याचेही आपण कौतुक करीत असतो. मग आपल्या देशामध्ये सुध्दा भिकारी दिसता कामा नये याचा जर आपण विचार करणार असू तर मला असे वाटते की, या विषयावर शासनाने अतिशय गंभीरपणे आणि जबाबदारीने निर्णय करण्याची भूमिका घेतली पाहिजे.

मी जेव्हा या संदर्भात माहिती घेतली तेव्हा मला असे कळले की, राजस्थान सरकारने अगदी अलीकडच्या काळामध्ये 1 एप्रिलपासून ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन योजना सुरु केली आहे. त्यामध्ये कमीतकमी 500 रुपये आणि 550 रुपये दिले जातात. जे वृध्द 75 वर्षाचे आहेत त्यांना कमीतकमी 500 रुपये आणि 75 वर्षाच्या वरील वृध्दांना कमीतकमी 550 रुपये देण्याची योजना त्यांची आहे. केंद्र सरकारकडे देखील ही मागणी आहे आणि केंद्र सरकार त्याबाबत विचार करीत आहे. मला असे वाटते की, या बाबतीत आपल्या महाराष्ट्राने आता आघाडी घेतली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड .....

राजस्थान सरकारपेक्षाही अतिशय भव्यदिव्य किंवा चांगली योजना केली पाहिजे. केवळ लाचार म्हणून काही तरी टाकावयाचे तसे टाकू नका. याबाबत आपण निकष ठरवा. ज्या कुटुंबाची किंवा ज्या वृध्द नागरिकाची आर्थिक परिस्थिती चांगली आहे त्यांनी काही मागू नये परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती वाईट आहे त्यांना मात्र मिळाले पाहिजे. त्यांना त्यांच्या गरजेप्रमाणे द्यावे. मी असे म्हणेन की, या ज्येष्ठ नागरिकांना कमीतकमी दोन हजार रुपये द्यावेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी जी आकडेवारी सांगितली त्याच्याशी मी सहमत आहे. समाजातील जवळजवळ 10 टक्के ज्येष्ठ नागरिक आहेत. आपल्या महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या 10 टक्के प्रमाणे हिशेब केला तर फार मोठा बोजा आहे असे मला वाटत नाही. जर आपण पुरोगामी असू तर आम्ही या ज्येष्ठांना देखील अतिशय मानसन्मानाने वागवितो असे चित्र आपण निर्माण केले पाहिजे.

एक गोष्ट मला अलीकडच्या काळामध्ये सातत्याने जाणवते. शासकीय नोकरीमध्ये काम करणारे जे अनेक कर्मचारी असतात त्यांना नोकरीमध्ये असताना सर्व वैद्यकीय सुविधा मिळत असतात पण सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना त्या सुविधा मिळत नाहीत. मी अलीकडच्या काळात असे पाहिले आहे की, आयुष्यभर काम करुन, नोकरी करुन किंवा कष्ट करुन जो माणूस थोडेफार पैसे जमा करतो त्याला कोठे तरी वयाच्या 60 व्या किंवा 65 व्या वर्षी हार्ट अटॅक येतो आणि पाहता पाहता त्याने जमविलेले सर्व पैसे एका अटॅकमध्ये निघून जातात आणि तो खऱ्या अर्थाने रस्त्यावर येतो. कारण त्याच्याकडे काहीच नसते.

सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तो आपली आयुष्यभराची कमाई घरामध्ये टाकतो, मुलाबाळांसाठी खर्च करतो आणि नात्यांचा काही प्रश्न निर्माण झाला, त्यांच्यामध्ये काही जिव्हाळा नसेल तर त्याची परिस्थिती अतिशय वाईट होते. असे जे लोक आयुष्यभर कष्ट करतात त्यांना आयुष्याच्या शेवटी मात्र एखादा अटॅक येतो आणि त्याचे सर्व पैसे त्यामध्ये जातात. या संदर्भात आपण विचार करणार आहोत की नाही ? माझी अशी ठोस मागणी आहे की, ज्येष्ठ नागरिकांच्या सर्व शस्त्रक्रिया, एक लाख रुपये किंवा दोन अडीच लाख रुपयांच्या वरच्या ज्या शस्त्रक्रिया आहेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड .....

त्याचा बोजा शासनाने उचलला पाहिजे. ते अशक्य आहे असे नाही. त्यांच्या शस्त्रक्रिया मोफत केल्या पाहिजेत. आपली जी रुग्णालये आहेत त्या ठिकाणी असे किती ज्येष्ठ नागरिक येतील ? अशा ज्येष्ठ नागरिकांच्या मोफत शस्त्रक्रिया झाल्या पाहिजेत. त्यांनी आयुष्यभर कष्ट करुन जी पुंजी जमविलेली आहे ती त्यामध्ये खर्च होता कामा नये. जे सेवानिवृत्त झालेले आहेत किंवा जे नोकरीत नसतील परंतु जे 60-65 वर्षाचे जेष्ठ नागरिक आहेत त्यांना ही सुविधा मिळाली पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड.....

म्हणून माझी ठोस मागणी आहे की, ज्येष्ठ नागरिकांना महिन्याला 2 हजार रुपये पेन्शन मिळाली पाहिजे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांच्या सर्व शस्त्रक्रिया व वैद्यकीय उपचार शासनाने मोफत केले पाहिजेत. काही ज्येष्ठ नागरिकांना घर नसते. अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी शासनाने वृध्दाश्रम काढले पाहिजेत. या तीन मागण्या करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांच्या संदर्भात नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, दिनांक 1 एप्रिल, 2011 रोजी म्हणजे बरोबर अडीच वर्षापूर्वी या सभागृहात ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांसंबंधी मी अशासकीय ठराव मांडला होता. अडीच वर्षापूर्वी झालेली भाषणे होती. त्यावेळी आणि आजही सामाजिक न्याय मंत्री माननीय श्री.शिवाजीराव मोघेच आहेत. त्यांनी त्या चर्चेला दिलेले उत्तरही माझ्याजवळ आहे. अडीच वर्षापूर्वी झालेल्या चर्चेनंतर शासन ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासंबंधी तसूभरही पुढे गेलेले नाही. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अतिशय भावस्पर्शी भाषण केले होते. आमच्या मागण्या आजही त्याच आहेत आणि उत्तरही तेच असेल असे मला वाटते. आज मंत्री महोदय वेगळा संकल्प मांडतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न तीन प्रमुख मुद्यांभोवती घोटाळत आहेत. सुरक्षितता, मानसिक अवस्था व त्यांना द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त सोयी सुविधा. हे तीन मुद्दे सोडून इतर कोणतेही विषय कोणीही मांडणार नाहीत. तरीही त्या मुद्यांना बळकटी येण्यासाठी प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या परीने या शब्दांमध्ये थोडाफार बदल केला पाहिजे असे मला वाटते. त्यावेळी मंत्री महोदयांनी अशी घोषणा केली होती की, त्या त्या भागातील पोलीस स्टेशन हे ज्येष्ठ नागरिकांची नोंद ठेवील. एखादा पोलीस अधिकारी त्या भागासाठी असाईन केलेला असेल. तो अधिकारी काही अडचण आहे का याची अधूनमधून जाऊन चौकशी करील. या विषयाचा खरोखरच आढावा घेण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भाग सोडून द्या, पण कोणत्याही शहरातील एखाद्या तरी पोलीस स्टेशनने ज्येष्ठ नागरिकांचे मस्टर तयार केल्याचे मंत्री महोदयांनी आम्हाला दाखवून द्यावे. ज्येष्ठ नागगिकांसंबंधी पोलीस स्टेशनमार्फत मॉनेटरिंग चालू आहे असे कुकृत्य करणाऱ्यांना वाटले पाहिजे. तरच त्यांच्यावर होणारे हल्ले, घरात एकटे पाहून चोरी करणे, या सर्व गोष्टी कमी होतील.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.चंद्रकांत पाटील.....

घरात एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा आम्ही कोल्हापूर शहरात सर्व्हे केल्यानंतर 2000 असे नागरिक आढळून आले आहेत. या 2000 घरांमध्ये शासनामार्फत सीसीटीव्ही लावता येईल. हे सीसीटीव्ही त्या भागातील पोलीस स्टेशनला कनेक्ट करावेत. जेणे करुन अशा नागरिकांचे मॉनेटरिंग करता येईल. कोल्हापूर शहरामध्ये 2000 घरात ज्येष्ठ नागरिक आहेत, प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत केवळ 300-400 ज्येष्ठ नागरिक येतील. दिवसभर त्या पोलीस स्टेशनने नागरिकांच्या घरामध्ये सीसीटीव्हीद्वारे सर्फिंग करुन अडचणींची माहिती घ्यावी. सुरक्षितेच्या दृष्टीने शासनाने काही ठोस करण्याची आवश्यकता आहे. मी सीसीटीव्हीच्या व्यवसायामध्ये असल्यामुळे 2000 सीसीटीव्ही बसविण्यासाठी 10 लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च येणार नाही. एक 3 ते 4 हजार रुपयांचा चांगला आयपी कॅमेरा लावून त्याचे सेंट्रली मॉनेटरिंग केले तर घरात एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची समस्या सुटू शकेल. याबाबत शासनाने काही तरी कृती करण्याची घोषणा केली पाहिजे.

ज्येष्ठ नागरिकांची वेगळी मानसिक अवस्था तयार झालेली असते. घरामध्ये त्यांच्याबरोबर कोणी बोलण्यासाठी नसते, त्यांची चौकशी करण्यासाठी घरात कोणी नसते.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

खूप काही गोष्टी आपल्या देशामध्ये सुरु झाल्या. त्या चांगल्या चालल्या आणि नंतर बंद पडल्या. एनएसएस ही चळवळ देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये खूप चांगली चालली. परंतु आता ही चळवळ शाळा महाविद्यालयातून संपत चालली आहे. या चळवळीमध्ये विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होत असत. आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर अशी शिबिरे मोठ्या उत्साहाने होत होती. आता ही चळवळ पूर्णपणे थंडावलेली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या चळवळीकडे आकृष्ट करुन त्यांनी दोन-चार कुटुंबामध्ये जाऊन वृद्धांना वर्तमानपत्रे वाचून दाखविणे, टी.व्ही.वरच्या बातम्या सांगणे, औषधे आणून देणे, कुठे जाण्यास मदत करणे अशी कामे करण्यास प्रवृत्त केले पाहिजे.

सभापती महोदय, आमच्या कोल्हापूरमध्ये स्नेहधाम नावाची संस्था आहे. या संस्थेचे 600 सदस्य आहेत. हे सदस्य वर्षातून सहा-सात वेळा वृद्धांसाठी निरनिराळे कार्यक्रम करतात. फोनवरुन किंवा ई-मेलने त्यांची विचारपूस करणे, त्यांना काही हवं-नको ते विचारणे अशी कामे संस्थेचे सदस्य करतात. एनएसएसच्या माध्यमातून एकटेपणा जाणवणा-या ज्येष्ठ नागरिकांसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून काही उपक्रम करवून घेतले पाहिजेत.

सभापती महोदय, ज्येष्ठांना द्यावयाच्या सोयीसुविधा विषयी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. त्यामध्ये वैद्यकीय सुविधेचा उल्लेख सर्व सन्माननीय सदस्यांनी केला. राजीव गांधी आरोग्य योजना शासनाने सुरु केलेली आहे. या योजनेमध्ये सर्व ज्येष्ठ नागरिकांचा समावेश केला पाहिजे. ज्याचे आर्थिक उत्पन्न चांगले असेल तो त्या योजनेचा लाभ घेणार नाही. शेवटी ज्येष्ठ नागरिकांना एक आत्मसन्मान असतो. त्यामुळे ते फुकट उपचार घेणार नाहीत. ज्या ज्या ज्येष्ठ नागरिकाला आरोग्य सुविधेची आवश्यकता असेल त्या प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला या राजीव गांधी आरोग्य योजनेमध्ये सुविधा मिळाली पाहिजे. 1 लाखा पर्यंत उत्पन्न असणा-या नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी शासनाने घेतलेली आहे. यामध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक आपोआप समाविष्ट होतील आणि उर्वरित ज्येष्ठ नागरिकांना राजीव गांधी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट केले तर त्यांच्या आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

सभापती महोदय, या ठिकाणी वृद्धाश्रमाचा देखील विषय मांडण्यात आला. या बाबतीत दोन-तीन प्रकारे विचार करण्याची आवश्यकता आहे. एक प्रकार असा आहे की, घरामध्ये सर्व

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील....

आहेत. ते वृद्धांची काळजी घेणार नाहीत असे म्हणत नाहीत, परंतु ज्येष्ठ नागरिकानांच ते ज्येष्ठ असल्यामुळे कुठे तरी बाहेर रहावेसे वाटते. अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी डे-केअर सेंटर निर्माण केले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नाना-नानी पार्कचा उल्लेख केला. एखादी अशी चांगली वास्तू उभी केली पाहिजे की, त्यामध्ये ज्येष्ठ नागरिक दिवसभर रमतील आणि संध्याकाळी ते आपल्या घरी जातील. काही ज्येष्ठ नागरिकांना कुटुंबाने बाहेर जाऊन रहा असे सांगितलेले नसते, परंतु घरामध्ये कंटाळा आला म्हणून त्याना चार-पाच दिवस बाहेर जाऊन राहावेसे वाटते अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी 50 ते 100 हॉटेल्स किंवा हॉस्टेल्स राज्यामध्ये निर्माण करण्याची आवश्यकता आहे. ही हॉटेल्स/हॉस्टेल्स खिशाला देखील परवडणारी असली पाहिजेत. आपण सर्व पक्षाचे सदस्य ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या मांडत आहोत. महाराष्ट्रामध्ये आता मोठया प्रमाणावर वृद्धाश्रमांची आवश्यकता निर्माण झालेली आहे. जे वृद्धाश्रम युतीच्या काळामध्ये सुरु झाले ते अजूनही आपल्या ताकदीवर सुरु आहेत. अशा वृद्धाश्रमांना आर्थिक मदत करण्याची आणि नवीन सुरु करण्याकरिता प्रस्ताव मागविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी एक वेगळा मुद्दा मांडतो. मी सांगितले की, डे-केअर सेंटरची आवश्यकता आहे, चार दिवस जाऊन राहण्यासाठी एखाद्या हॉटेल किंवा होस्टेलची आवश्यकता आहे, कायमस्वरुपी वृद्धाश्रमाची आवश्यकता आहे. त्याच बरोबर ज्यांची आर्थिक परिस्थिती बरी आहे, त्यांना अशा काही सुविधा नको परंतु ज्येष्ठ नागरिकांच्या सान्निध्यामध्ये रहायचे आहे अशांची एक कॉलनी म्हाडाच्या किंवा प्रायव्हेट बिल्डरच्या माध्यमातून डेव्हलप करण्याची आवश्यकता आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

श्री.चंद्रकांत पाटील....

त्यांना धरुन जाव्या लागणाऱ्या बार्स, व्यायामाचे साहित्य सर्व सारखे असते. त्या सगळयांचे किचन एक असते. त्यांची आर्थिक स्थिती चांगली असल्यामुळे प्रत्येकाचा स्वतंत्र फ्लॅट आहेत. परंतु त्यांना रोजचा स्वयंपाक करणे शक्य नसल्यामुळे ते कॉमन किचनमध्ये जेवण करतात. ज्येष्ठ नागरिकांसाठी त्या ठिकाणी 250 घरांची एक स्वतंत्र कॉलनी झालेली आहे. ज्येष्ठ नागरीक म्हाडाला पैसे देतील. म्हाडाने सर्व सुविधायुक्त सदनिका बांधून दिल्या पाहिजेत. देवळात जाण्यासाठी त्यांना कॉलनीची बस ठेवण्यात आलेली असते. त्यांना अधून-मधून मार्केटींग करण्याची इच्छा झाली तर मार्केटला जाण्यासाठी देखील बसची व्यवस्था केलेली असते. ज्येष्ठ नागरिकांसाठी महाराष्ट्रात 20 ते 25 कॉलनी विकसित केल्या गेल्या पाहिजेत.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी उपस्थित आहेत. ज्येष्ठ नागरिकांची वर्योमर्यादा 65 आहे ती 60 वर्षापर्यंत करावी. हा अतिशय साधा विषय आहे. ज्येष्ठ नागरीक कार्ड मिळते ते त्या शहरातील बसेससाठी उपलब्ध करुन द्यावे. कोल्हापूर शहरात बसेसने प्रवास केला तर त्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना वेगळे कार्ड काढावे लागते. या बाबतीत मागे मी सूचना केली होती. ज्येष्ठ नागरीक कार्ड महाराष्ट्रासाठी देतो, तेच कार्ड कोल्हापूर येथील सिटी बसेससाठी चालले पाहिजे. कोल्हापूर सिटी बसेसने प्रवास करण्यासाठी त्यांना 25 रुपयांचे वेगळे कार्ड काढावे लागते. अशा बारीक बारीक गोष्टीमध्ये सुध्दा अडीच अडीच वर्षे आपण एक पाऊलही पुढे जात नाही. ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत सरकारने ठोस घोषणा करावी अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : आदरणीय सभापती महोदय, महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरीक आणि या सभागृहाचे बुध्दीमान सदस्य माननीय श्री.हेमंत टकले यांनी अतिशय जिव्हाळयाचा आणि नाजूक विषय या सभागृहासमोर आणलेला आहे.

सभापती महोदय, साठीनंतर मनुष्य हा परिणतप्रज्ञ होतो असे भारतीय संस्कृती सांगते. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे अतिशय संवेदनशील आणि सौम्य प्रकृतीचे आहेत. ज्येष्ठांचा मांदियाळीमधील ते हसरे चांदणे आहे. ज्येष्ठांना आपला भूतकाळ नेहमी स्मरत असतो.

"तरुण आहे रात अजूनी, राजसा निजलास का रे
अजुनी न विझल्या गगनी तारकांच्या दीपमाला
कोजागिरीच्या त्या चांदण्याला मी काय सांगू"

याचे स्मरण सर्व ज्येष्ठांना आठवते. भूतकाळात रमायला ते सदैव तयार असतात आणि म्हणून पोर्णिमेच्या चंद्राप्रमाणे ज्येष्ठांचे जीवन शीतल करण्याच्या दृष्टीने समाजातल्या विविध धुरिणांनी प्रयत्न करावेत आणि शासनाची समर्थ साथ माननीय श्री.दर्डा साहेब त्याला असावी अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती अप्रस्तुत, अनाठायी ठरु नये. कारण सन्माननीय श्री. शिवाजीराव मोघे हे सुध्दा ज्येष्ठांच्या मांदियाळीतीलच आहेत. भारतीय संस्कृतीची एक परंपरा राहिलेली आहे आणि त्या संस्कृतीच्या त्या अजोड बंधनामध्ये संपूर्ण समाज काही काळ जीवन जगत राहिला. भारतीय संस्कृतीने आम्हाला ब्रम्हचर्यश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम त्या नंतर सन्यासाश्रम असे चार आश्रम दिले.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

हे चार आश्रम जोपर्यंत होते तोपर्यंत वृध्दाश्रमाची आवश्यकता भासत नव्हती. पण आता वृध्दाश्रम आवश्यक झाले आहेत. वृध्दाश्रमाचा इतिहास 20 व्या शतकामध्ये 1995 ला सुरु झाला. शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या राजवटीमध्ये महाराष्ट्रात प्रत्यक्षात वृध्दाश्रम निर्माण केले गेले. वृध्दाश्रम हे वृध्दांना आपल्या पितृछत्राप्रमाणे वाटले. तेथे वास्तव्य करणारे वृध्द अतिशय आनंदाने जीवन जगले. पण वृध्दाश्रमामध्ये पाठविण्याची मुलांची मानसिकता ही मुर्दाड मनाचे प्रतीक आहे. आईवडील ओझे वाटावेत, त्यासाठी त्यांना वृध्दाश्रमाच्या दिशेने एसटी बसमध्ये बसवून पाठवून द्यावे. देवकीचा पान्हा हा असा दुधाने जळावा हे दुर्दैव आहे. या दुर्दैवाच्या फेऱ्यातून समाजाला बाहेर काढायचे असेल तर त्या बालकांच्या मनावर सुसंस्कार घडविणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, वृध्द हे भावनाशील असतात. मुलांचा एक कटाक्ष आपल्यावर पडावा यासाठी ते आतूर झालेले असतात. नातवंडांच्या चेहरा पाहता यावा म्हणून प्रत्यक्ष आतूर मनाने आपल्या मुलांच्या निरोपाची वृध्दाश्रमातील वृध्द वाट पहात आहेत.

सभापती महोदय, एका वृध्दाश्रमातील वृध्दाने अतिशय कटू अनुभव सांगितला. आता नको हे जन्म मरण. स्वर्गाची वाट काही काळानंतर मला वहिवाटावी लागणार आहे. त्यापूर्वी नातवंडाच्या मुखाचे दर्शन झाले तर माझे जीवन सार्थकी लागू शकेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. सभापती महोदय, एका विशिष्ट वयोमानानंतर अंत:करणातून मनुष्य हळव्या, अतिशय संवेदनशील अशा भावनेतून वाटचाल करीत असतो. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, वृध्दांचा विचार करुन मूल्य शिक्षण मुलांच्या मनावर संस्कारित करण्याचा प्रयत्न करावा.

सभापती महोदय, पहिली ते चौथीपर्यंत आईवडिल हे माझे परम ऐश्वर्य आहे हा संस्कार मुलांच्या मनावर बिंबविला पाहिजे. शालेय शिक्षणातील पहिला धडा आईवडिलांचा असावा. हा संस्कार बालकांच्या मनावर बिंबविण्यात आपण यशस्वी ठरलो तर आईवडिलांना वृध्दाश्रमात पाठविण्याची आगळीवेगळी रीत भारतीय परंपरेत न बसणारी आहे ती बंद होईल. त्यामुळे भारतीय परंपरेला साजेसे काम शिक्षणमंत्र्यांच्या हातून घडेल अशी अपेक्षा आहे. घरामध्ये ऐश्वर्यवती आली की परम ऐश्वर्य बाहेर पडते.

नंतर 3एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

कारण दोघांना सुखाचा संसार करावयाचा असतो व त्यामध्ये त्यांना तिसरा नको असतो. ही जी मानसिकता आहे ती दुर्दैवी आहे. खरे म्हणजे ही सामाजिक शोकांतिका आहे. सामाजिक शोकांतिका दूर करावयाची असेल तर मला वाटते की, त्याला संस्काराशिवाय दुसरा पर्याय नाही. आज मनुष्याचे पाऊल चंद्रावर पडले आहे. मनुष्याचे पाऊल चंद्रावर पडल्यामुळे चंद्र पुनीत झाला. आम्ही मंगळावर यंत्र पाठवून तेथील खडकांचे आणि मातीचे नमुने आणलेले आहेत. परंतु आई वडिलांना घराच्या बाहेर काढणाऱ्या नमुन्यांचे काय ? त्यासाठी कोठली प्रयोगशाळा आहे ? या प्रयोग शाळेचे निष्कर्ष काय राहतील ? याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. मला असे वाटते की, त्यासाठी नक्की कायदे आहेत व या सभागृहात कायदे पंडित बसलेले आहेत. परंतु यासंदर्भात अजून कठोर कायदे करण्याची आवश्यकता आहे. आई वडिलांना न सांभाळणाऱ्या मुलावर कठोर कारवाई केली गेली तर कदाचित ही जी नवीन प्रथा निर्माण होते आहे त्याला नक्कीच आळा बसू शकेल असा आशावाद मी व्यक्त केला तर तो अप्रस्तुत ठरु नये.

आजी नावाची संस्था जोपर्यंत आहे तोपर्यंत कोणाच्या पंखाखाली लपावे या प्रश्नाचे उत्तर इतिहासाला सदोदित मिळत राहील. हा विचार महाराष्ट्रातील थोर विचारवंत, माझे गुरु प्राचार्य श्री. शिवाजीराव भोसले यांचे आहे. आता घरामध्ये आजीच नाही. काही वर्षानंतर मुलांना सांगावे लागेल की, "आजी असते, आजोबा असतात, त्यांच्या अंगाखांद्यावर खेळावे लागते". भारतीय संस्कृतीला आम्ही पोरके होत चाललो आहे. हे पोरकेपण विज्ञान नष्ट करु शकत नाही, तर हे पोरकेपण संस्कारच नष्ट करु शकेल.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाम:स्मरण आपण उठल्यानंतर करतो. छत्रपती शिवाजी महाराज आईच्या आज्ञेमध्ये शेवटपर्यंत राहिले होते. पहिले आद्य शंकराचार्य हे आईला आश्वासित करुन गेले, वचन देऊन गेले की, "आई शेवटच्या क्षणी, तुझ्या अंतक्षणी मी तुझ या बरोबर असेन". आईला दिलेले वचन त्यांनी पाळले. समर्थ रामदासांनी सन्यस्थ मार्ग चोखाळला, देवाच्या शोधासाठी ते बाहेर पडले. परंतु बाहेर पडत असतांना त्यांनी आईला वचन दिले की, "आई, मृत्यू समयी मी तुम्झ्या बरोबर असेन, शेवटचा काळ येईल तेव्हा मी तुझ्या बरोबर असेन". श्रावण बाळांने तर आई वडिलांना कावडीमध्ये घालून काशीच्या दिशेने प्रयाण केले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

भारतीय संस्कृतीमधील मोठ मोठी उदाहरणे आपल्या समोर आहेत. इतिहास जाज्वल्य करणारी उदाहरणे असली तरी आम्हाला आता वृध्दाश्रमाची आवश्यकता पडू लागली आहे. समाजाची ही अधोगती आहे की, प्रगती आहे याचे विश्लेषण समाज शास्त्रांनी निश्चितपणे केले पाहिजे. तर्काच्या आधारावर सर्व प्रश्नांची उत्तरे शोधता येऊ शकतील असे सांगणे कठीण आहे. परंतु ही जी मानसिकता आहे ती अतिशय दुर्दैवी आहे. त्यामुळे आम्ही भारतीय संस्कृतीचे म्हणजे "येथील पिंपळ पानावरती अवघे विश्व तरावे" असे जर आम्ही म्हणत असू तर जे थकलेले पिंपळ पान आहे, जे पिंपळ पान पिवळे पडले आहे त्याकडे दुर्लक्ष करण्याची जी प्रवृत्ती आहे ती नष्ट करण्याचा प्रयत्न निश्चितपणे आपण सर्वांनी मिळून केला पाहिजे अशी भावना या प्रस्तावाच्या संदर्भात व्यक्त करतो. आदरणीय श्री.हेमंत टकले यांनी अतिशय संवेदनशील,सौम्य प्रकृतीचे दर्शन या सभागृहाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राला घडवल्यामुळे आमच्या सारखे सदस्य नेहमी त्यांच्या ऋणात राहतील.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

कारण आम्ही अजून ज्येष्ठांच्या यादीत आलेलो नाही. सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते यांची ज्येष्ठांच्या मांदियाळीमध्ये वर्णी लागली आहे. आदरणीय सभापती महोदय, आपण देखील यात आहात.

उप सभापती : मी देखील आहे.

प्रा.सुरेश नवले : आपण ज्येष्ठांच्या मांदियाळीमध्ये असलात तरी आपले मन माझ्या पेक्षा अधिक तरूण आहे.

उप सभापती : मी बॉर्डरवर आहे.

प्रा.सुरेश नवले : त्यामुळे मी एकच मागणी करणार आहे की, महाराष्ट्रातील जो शेतमजूर, शेतकरी आहे, ज्याने 60 ओलांडली आहे तो अतिशय विपन्नावस्थेत जीवन जगत आहे, अतिशय विषण्ण अंत:करणाने जीवनाचा प्रवास करीत आहे. अशा सर्व शेतमजुरांना आणि माझ्या शेतकरी बांधवांना महाराष्ट्र शासनाने निवृत्ती वेतन द्यावे एवढा आग्रह करतो आणि या प्रस्तावावर बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी मनापासून आभार मानतो. धन्यवाद.

.....

===2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा उभारणे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या परवानगीने एक महत्त्वाचा विषय मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. आता जो विषय सदना पुढे सुरू आहे त्याला अनुसरूनच हा विषय आहे. आजच वर्तमानपत्रामध्ये मोठी बातमी आली आहे. ती स्वागतार्ह आहेच. ही बातमी विधान भवनातील पुतळ्या संबंधातील आहे. मी त्यावर टीकाटिपणी करण्यासाठी उभा नाही. परंतु, या माध्यमातून मी आपल्याला पत्र देणार आहे. श्री.विलासराव देशमुख, श्री.शंकरराव चव्हाण, श्री.मारोतराव कन्नमवार यांचा पुतळा विधान भवन परिसरामध्ये उभारण्या संबंधातील बातमी आहे. मी बऱ्याच दिवसा पासून आपल्याला पत्र लिहून ठेवले होते. पण काही कारणामुळे आपल्याला देण्याचे राहून गेले. ते पत्र मी आज आपल्याला अधिकृतपणे देऊ इच्छितो.

आज दिनांक 17 जुलै 2013 रोजी सामना सहीत अनेक वर्तमानपत्रातून विधान भवनातील मान्यवरांच्या पुतळ्या संबंधातील बातमी आली आहे. जुन्यांमध्ये फेरफार आणि नव्यांमध्ये माजी मुख्यमंत्री स्व.मारोतराव कन्नमवार, स्व.शंकरराव चव्हाण, स्व.सुधाकरराव नाईक, स्व.विलासराव देशमुख यांचे पुतळे उभारण्या संदर्भात बातमी आहे. उद्या दिनांक 18 जुलै 2013 रोजी या संदर्भात बैठक होणार आहे अशा प्रकारचा देखील त्यात उल्लेख आहे. या सोबत आपल्याला उद्देशून लिहिलेले पत्र जोडत असून माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा उभारण्या संदर्भातील हे पत्र आहे. मी ते आपल्याकडे सुपूर्द करीत आहे. या पत्राची योग्य ती दखल घेतली गेलीच पाहिजे अशा प्रकारची आग्रही भूमिका आपल्या पुढे मांडतो. धन्यवाद.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांसाठी ठोस कार्यक्रम आखणे

मु.शी : ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांसाठी ठोस कार्यक्रम आखणे या विषयावर सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. सुभाष चव्हाण, प्रकाश बिनसाळे, संजय दत्त, श्रीमती विद्या चव्हाण, निरंजन डावखरे, विक्रम काळे, अब्दुल्ला खान दूर्राणी, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, दीपकराव साळुंखे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री एम.एम.शेख, ॲड.जयदेवराव गायकवाड, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरू.....

श्री.मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, ज्येष्ठ सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. मी ज्येष्ठांना समर्पित करूनच माझे विचार मांडणार आहे. मी या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठीच उभा आहे.

आज मी चाळीस वर्षाचा असलो तरी हळूहळू आपल्या वया पर्यंत पोहोचणार आहे. मी जेव्हा आपल्या वया पर्यंत पोहचेन तेव्हा आपण सुपर ज्येष्ठ रहाल. आता मी आपले जे बहुमोल मार्गदर्शन ऐकले आहे ते त्या काळात राहणार नाही.

ज्येष्ठ नागरिक ही देशाची संपत्ती आहे. ते समाजाचे प्रतीक आहे. त्यांच्या अनुभवातून आपण अनेक गोष्टी शिकू शकतो. येथे शालेय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा उपस्थित आहेत. मी आपल्या मार्फत त्यांना सूचना करू इच्छितो की, जिल्हा परिषद, नगरपालिका व महाराष्ट्र शासन अनुदानिक शाळा आहेत त्यातील शिक्षकांना मान सन्मान देतो. या शिक्षकवर्गाला शिकविण्याची सवय असते. जे सेवानिवृत्त शिक्षक आहेत त्यांना आपण गावात किंवा शाळेत जाऊन शिकविण्याची संधी दिली तर ते मुलांना शिकवू शकतात. मुलांना ते घडवू शकतात. त्यांच्यासाठी काही तरी प्रयत्न करावेत.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन...

त्यांना पगाराची काही आवश्यकता नाही कारण त्यांना भरपूर पेन्शन मिळत आहे. तेव्हा शिक्षकांना अशा योजनेत सामावून घेतले पाहिजे. येथे शिक्षकांचे प्रतिनिधी आहेत ते यावर चांगले भाष्य करतील. मी सुरुवात करुन दिली आहे. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे मी कार्टर रोड येथे राहतो. मी सकाळी फिरण्यास जातो त्याठिकाणी ज्येष्ठ नागरिक देखील फिरण्यास येतात. ते ज्येष्ठ नागरिक झोपडपट्टीतील मुलांना इंग्रजी, मराठी,गणित, इत्यादी विषय शिकवतात. सार्वजनिक ठिकाणी बसून ते मुलांना शिकवतात ही निश्चित कौतुकास्पद बाब आहे. आपण "Each one, teach one" ही संकल्पना घेतली तर कोणीही निरक्षर राहणार नाही. महाराष्ट्र हे प्रगतशील राज्य आहे असे आपण म्हणतो. आपण ही योजना हाती घेतली तर त्यामध्ये आणखी भर पडेल.

सभापती महोदय, हेल्प-एज इंडिया ही 35 वर्षे जुनी एनजीओ आहे. या एनजोओकडे हेल्पलाईन आहे आणि ते वृध्दांना मदत करतात. ती संस्था वृध्दांसाठी झटत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याकडे ज्येष्ठ नागरिकांची संख्या 10 कोटी आहे आणि ते बरोबर आहे. सन 2050 मध्ये ही संख्या 35 कोटीमध्ये जाईल.

सभापती महोदय, आपण चीन देशाकडून एक गोष्ट शिकली पाहिजे. चीनमध्ये एक चांगली संस्कृती आहे. डाक्टर साहब आप यहां पर उपस्थित हैं और आपके पास आरोग्य विभाग है. मैं यहां पर बताना चाहूंगा कि चाईना में एक ही बच्चा पैदा करने की संस्कृति है. दो बच्चे नहीं, बल्कि एक ही बच्चा पैदा करने की संस्कृति वहां पर है, चाहे वह लड़का हो या लड़की. चीनमध्ये असा नियम केलेला आहे की, यदि आपका एक ही बच्चा है और यदि वह लड़की है और वह लड़की शादी करने के बाद ससुराल चली जाती है तो लड़की के मां-बाप के पास उनकी देखभाल के लिए कोई नहीं रह पाता है. इसलिए उन्होंने वहां पर ऐसा नियम किया है कि लड़का अपने मां-बाप की देखभाल करेगा और लड़की अपने मां-बाप की देखभाल करेगी. इस तरह का कानून वहां की चीन सरकार ने बनाया है. हम लोग यहां पर परदेश की बहुत सारी बातें करते हैं. मेरा कहना है कि यदि हम उन से कुछ सीखें तो हमारे देश का बहुत फायदा होगा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन...

सभापती महोदय, एक और छोटी सी बात मैं कहना चाहूंगा कि हम बच्चों को पैदा करते हैं, उन्हें संस्कार देते हैं. आपण मुलांचे संगोपन करतो. त्यांना शाळेत पाठवितो, कॉलेजमध्ये पाठवितो,त्यांचे लग्न करतो. त्यानंतर आपली संपत्ती सुध्दा त्यांच्या नावावर करतो.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेबांनी मुलींना मोफत शिक्षण देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. त्याच पध्दतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी Right to property as per will कायदा करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता आहे. आई-वडिलांच्या मृत्युनंतर त्यांच्या संपत्तीवर मुलांचा हक्क असतो हे आपणा सर्वांना माहीत आहे. परंतु संपत्तीचे हस्तांतरण करण्यासाठी "विल"चा वापर केला पाहिजे. त्यासाठी "विल"संबंधी समाजामध्ये जनजागृती केली पाहिजे. या कामासाठी शिक्षक किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून जनजागृती करता येईल. "विल" संबंधीची माहिती शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. जे लोक निरक्षर आहेत परंतु त्यांच्याकडे स्थावर मालमत्ता आहे परंतु त्यांना "विल" संबंधी माहिती नाही अशा लोकांना "विल"संबंधी माहिती करुन दिली पाहिजे.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांसाठी मनोरंजन असणे हा देखील महत्वाचा विषय आहे. त्यांना वाटते आपल्याशी कोणी बोलत नाही. "फादर्स डे" च्या निमित्ताने हेल्प-एज इंडिया या संस्थेने मराठी पत्रकार संघ येथे "फादर्स डे" साजरा केला. मी कामा निमित्त तेथे गेलो होतो.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन....

फुंडकर साहब जब मैं वहां पर गया और मैंने वहां पर जाकर देखा तो मैंने वहां पर लोगों से पूछा कि आपका क्या अनुभव है ? वहां पर कई लोगों ने मुझ से कहा कि जब तक हमारा बच्चा घर पर रहता है तब तक हमारी सून हमारी तरफ घ्यान देती है, ती आमच्याकडे लक्ष देते. परंतु ज्या वेळी आमचा मुलगा नोकरीसाठी बाहेर जातो त्यावेळी मात्र ती आमच्याकडे दुर्लक्ष करते, आम्हाला वाईट वागणूक देते. एका आजीबाईने सांगितले की, माझा मुलगा सुनेचा बैल झालेला आहे. अशी आजची स्थिती आहे.

महोदय, एक जुनी गोष्ट मी आपल्याला सांगतो. एका मुलाचे 82 वर्षाचे वडील होते. ते आपल्या तरुण मुलाला घेऊन एका बाकावर बसले होते. त्यांनी चार वेळा आपल्या मुलाला विचारले की, समोर काय आहे ? त्यावर मुलाने सांगितले की, ती 'चिड़ीया' आहे. नंतर त्या वयोवृध्द वडिलांनी दुसऱ्यांदा विचारले, तिसऱ्यांदा विचारले. मुलाने पुन्हा 'चिड़ीया' हेच उत्तर दिले. त्यानंतर चौथ्यांदा विचारले. पुन्हा मुलाने 'चिड़ीया' असेच उत्तर दिले. शेवटी तो तरुण मुलगा रागाने उठला आणि वडिलांना म्हणाला की, तुम्ही म्हातारे झाले आहात काय, तुम्हाला दिसत नाही काय ? मी तुम्हाला चार वेळा सांगितले की, ही 'चिड़ीया' आहे. तरी सुध्दा तुम्हाला समजत नाही का, तुम्हाला दिसत नाही काय ? त्यावर त्याचे वडील आत गेले आणि आतून पुस्तक आणले व म्हणाले की, तू ज्या वेळी 5 वर्षाचा होता त्या वेळी तू मला हीच गोष्ट 20 वेळा विचारली होती आणि मी 20 वेळा तुझ्या प्रश्नाला एकच उत्तर दिले होते. तू परत परत मला विचारत होता, मी परत परत ही 'चिड़ीया' आहे हेच सांगत होतो आणि प्रत्येक वेळी मी तुला मिठी मारत होतो, जादूची झप्पी देत होतो. आपण वयोवृध्द व्यक्तींना प्रेम लावले, जिव्हाळा लावला ते आपल्या कामात पडतात, एवढेच या निमित्ताने सांगतो व येथेच थांबतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भातील प्रस्ताव मांडलेला आहे. त्यांनी मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, आज एकत्र कुटुब पध्दती मोडीत निघाली असून नवीन कुटुंब व्यवस्था निर्माण होत आहे. माणसाच्या जीवनातील दैनंदिन कामाची जी गती आहे त्यामुळे पूर्वीची एकत्र कुटुंब पध्दती आज जवळजवळ शहरांमध्ये संपुष्टात आली आहे. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांच्या बाबतीत विचार करण्याची वेळ तुम्हा-आम्हा सर्वांवर आली आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

महोदय, आपण दररोज वर्तमानपत्र उघडले तर त्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांवर हल्ले झाल्याची, खून झाल्याची छोटीशी बातमी कोठेना कोठे वाचावयास मिळते. अनेकदा तरुण मुलाने किंवा सुनेने ज्येष्ठ व्यक्तीला घरातून बाहेर काढल्याच्या बातम्या वाचावयास मिळतात. आपल्या देशाला एकत्र कुटुंबात राहण्याची परंपरा लाभलेली होती. वयोवृध्दांना देवासमान माणसाची परंपरा लाभलेल्या या देशामध्ये नवीन कुटुंब पध्दतीमुळे निरनिराळ्या घटना घडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार समोर येऊ लागला आहे. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांच्या मनामध्ये पोलीस आपले सहकारी आहेत अशी भावना निर्माण केली पाहिजे. पोलिसांनी ज्येष्ठ नागरिकांची विचारपूस केली पाहिजे. आपल्या भागात किती ज्येष्ठ नागरिक आहेत, ते कोणासोबत राहतात, त्यातील किती एकटे राहतात, त्यांच्या घरात कोण नोकर-चाकर आहेत, इत्यादी बाबतची माहिती पोलिसांनी जमा करणे आवश्यक आहे. 8 दिवसांतून त्यांच्या घरी जाऊन विचारपूस करुन प्रेमाने त्यांच्यासोबत बोलणे या गोष्टी ठीक आहे. परंतु ज्यावेळी ज्येष्ठ नागरिकांवर चोरीच्या किंवा अन्य उद्देशाने हल्ला करण्याची वेळ येते त्या वेळी ज्येष्ठ नागरिक पोलीस स्टेशनशी कसा संपर्क करु शकतील या बाबत कोठे तरी विचार करण्याची वेळ आली आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .....

आज टेक्नॉलाज्री मोठ्या प्रमाणावर पुढे गेलेली आहे. 15-20 दिवसांपूर्वी मी गावदेवी पोलीस स्टेशनचे सिनिअर इन्स्पेक्टर श्री. प्रदीप लोणंदकर यांच्याशी चर्चा करीत होतो. त्यांना मी विचारले की, तुम्ही या भागातील ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात कशा पध्दतीची योजना आखत आहात ? त्यांनी एक चांगली योजना केलेली आहे. काही एनजीओ आहेत, ज्यांच्याकडे पैसे आहेत, जे या कामासाठी पैसे खर्च करु इच्छितात त्यांच्याशी चर्चा करुन त्यांनी एक योजना केलेली आहे. 10-20 हजार रुपयांचे घड्याळाच्या पध्दतीचे एक इन्स्ट्रूमेंट आहे. त्या माणसाने डिस्ट्रेसच्या वेळेला त्या इन्स्ट्रुमेंटवरील बटन दाबले की वायरलेस टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून त्याची रींग सेंट्रल मॉनिटरवर येते आणि कोणत्या ज्येष्ठ नागरिकाने ते बटन दाबलेले आहे हे ताबडतोब कळेल.

त्यांनी दुसरी एक योजना आणलेली आहे. त्यांनी काही लोकांना विनंती केली की, तुम्ही आम्हाला एक ॲम्ब्युलन्स द्या. पोलीस ती ॲम्ब्युलन्स घेऊन तातडीने त्या जागी जाऊ शकतील. ती योजना अजून मूर्त स्वरुपात आलेली नाही पण ती अत्यंत चांगली योजना आहे. अशा ज्या काही चांगल्या योजना आहेत त्याचा आपण विचार केला पाहिजे. आपण संपर्क साधून त्यांना एक विश्वास दिला पण गरजेच्या वेळी तातडीने उपलब्ध होईल असा पध्दतीचा विश्वास जर त्यांना आपण या माध्यमातून दिला तर त्यांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल की, जर आपल्यावर कटू प्रसंग आला तर आपल्यासाठी पोलीस खाते किंवा समाज उभा राहू शकेल. अशा स्वरुपाच्या काही ठोस योजना आखणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी आरोग्याच्या दृष्टीने जास्त उल्लेख करणार नाही. कारण त्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. काही विशिष्ट पध्दतीचे जे रोग आहेत विशेषत: कॅटरॅक्ट, संधीवात, ब्लड प्रेशर, डायबिटीस हे कॉमन विकार आहेत. यासाठी जर त्यांना जेनेरिक औषधे उपलब्ध करुन दिली तर त्याचा त्यांना उपयोग होईल. जेनेरिक औषधे फार महाग आहेत असे मला वाटत नाही.

अनेक हॉस्पिटलमध्ये आपण पाहतो की, त्या ठिकाणी रॅम्प नसतात. काही ज्येष्ठ नागरिक व्हील चेअरवर येतात. त्यांना जिन्यावर चढण्यासाठी त्रास होत असतो. आपण चर्चगेट भागात फिरलात तर त्या ठिकाणी फूटपाथवर ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प केलेले आहेत जेणेकरुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .....

त्यांची व्हील चेअर फूटपाथवर चढू शकेल किंवा त्यांना फूटपाथवर चढावयाचे असेल तर कोणाच्याही आधाराशिवाय त्यांना चढता येईल. त्यांना तुमचा आधार नको आहे. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे जेणेकरुन ते आपले जीवन चांगल्या पध्दतीने जगू शकतील.

अनेक ज्येष्ठ नागरिक आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत. या ठिकाणी असा उल्लेख झाला की, आई-वडील जरा म्हातारे झाले की जिवंतपणी आपल्या मुलाला, सुनेला आपले सगळे देऊ असे म्हणतात. या संदर्भात कोठे तरी कायदा करण्याची गरज आहे. तुम्ही निश्चितपणे मुलांना द्या. ते दिले पाहिजे. त्यांच्या हयातीमध्ये ते मुलांना घर घेऊन देतात, त्यांना वाढवतात, त्यांचे पालनपोषण करतात, सर्वकाही करतात. परंतु जर आपली सर्व संपत्ती आपल्या हयातीमध्ये आपल्या मुलाबाळांना दिली तर जी सून घरात येईल ती कशा पध्दतीची असेल याचा कोणालाही भरवसा नाही. अनेक वेळा आपण पाहतो की, सुनेचे सासू-सासऱ्यांशी पटत नाही. त्यातून अनेक गोष्टी निर्माण होत असतात. ज्याप्रमाणे आदिवासींची जमीन इतर कोणाला विकत घेता येत नाही त्या पध्दतीने जो ज्येष्ठ नागरिक असेल त्याच्या हयातीमध्ये त्याची प्रॉपर्टी त्याच्या मुलाच्याही नावावर ट्रान्सफर होणार नाही अशा स्वरुपाचा कायदा करणे गरजेचे आहे. वडील वारले तर त्याच्या आईच्या नावावर ती प्रॉपर्टी झाली पाहिजे. आई वारल्यानंतर प्रॉपटी मुलांच्या नावावर गेली तर सर्व देऊन बसल्यानंतर त्यांना जे दिवस पहावे लागतात, त्यांना घराबाहेर काढले जाते, खूप दु:ख झेलावे लागते, अत्यंत दारिद्र्याचे जीवन जगावे लागते, या बाबतीत कोठे तरी पायबंद बसू शकेल.

समाजाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या नागरिकांसाठी आपण जे कायदे केलेले आहेत त्या कायद्यांची अत्यंत सक्षमपणे अंमलबजावणी करणे, ते कायदे आणखी कडक करणे जेणेकरुन या ज्येष्ठ नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होईल हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे. या ठिकाणी पेन्शन देण्याच्या संदर्भात उल्लेख झाला. माझ्याकडे काही आकडेवारी आहे. महाराष्ट्रामध्ये 1 कोटीच्या आसपास ज्येष्ठ नागरिक आहेत. ते सर्व आपल्याकडे पेन्शन मागावयास येतील असे मला वाटत नाही. आपण जर एक साधा फॉर्म तयार केला की, माझी मुले मला पाहात नाहीत. माझी मुले माझा सांभाळ करीत नाहीत

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

त्यामुळे माझी परिस्थिती कठीण आहे म्हणून मी पेन्शनची मागणी करीत आहे. तर जी मुले आपल्या आई-वडिलांना सांभाळत नाहीत त्यांना असे वाटेल की, आपण आई-वडिलांचा सांभाळ करीत नाही म्हणून त्यांनी पेन्शनची मागणी केली आहे. अशी मुले कमीत कमी लज्जे खातर तरी आपल्या आई-वडिलांचा सांभाळ करतील. ग्रामीण भागातील 30-35 टक्के ज्येष्ठ नागरिक यासाठी पुढे येतील. शहरी भागातील झोपडपट्टीतील, गरीब वस्तीतील, मध्यमवर्गीय कुटुंबातील पुढे येतील. त्या माध्यमातून त्यांना काही आधार देऊ शकलो तर त्यांना समाधान मिळेल.

ज्येष्ठ नागरिकांनी हा देश घडविला आहे. अनेकांनी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले आहे. हा देश उभा राहण्यासाठी अनेकांनी काम केलेले आहे. ज्यांचा उल्लेख सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड व प्रा.सुरेश नवले यांनी केला आहे. या देशाचे पंतप्रधान हे 80 वर्षांचे आहेत, या देशाचे राष्ट्रपती ज्येष्ठ नागरिक आहेत. आजही ते आपल्या बुध्दीमत्तेच्या आधारावर देशाला पुढे घेऊन जाण्याचे काम करीत आहेत. अशा या समाजव्यवस्थेमध्ये या वर्गासाठी काही तरी केले नाही तर एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून किंवा एक लोकप्रतिनिधी म्हणून आपण आपल्या कर्तव्यात कोठे तरी कमी पडलो आहेत अशी भावना मनात निश्चितपणे येते.

सभापती महोदय, शाळेमध्ये सामाजिक शास्त्र हा विषय शिकविला जातो. लहान मुलाच्या मनावर बिंबविलेल्या संस्काराच्या आधारावर त्या मुलाचे संपूर्ण जीवन उभे राहते. आपण अनेकवेळा असे म्हणतो की, या मुलाला घरात चांगले संस्कार मिळाले आहेत. शाळेतून मुलांना शिक्षणच नाही तर संस्कार देत असतो. शिक्षक मुलांना समाजामध्ये जगण्याची, समाजात उभे राहण्याची, समाजात वावरण्याची पध्दत शिकवित असतात. हे संस्कार शिकविण्याचा विषय सुरु केला तर या समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी, ज्येष्ठ नागरिकांच्या यातना कमी करण्यासाठी उपयोग होइल.

आज नाना-नानी पार्कची गरज नाही. नाना-नानी पार्कबरोबर या ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र असले पाहिजे. ज्यामध्ये त्यांच्यासाठी ग्रंथालय असेल, टी.व्ही.असेल, एक आठवड्यात विविध करमणुकीचे कार्यक्रम करता येतील. अनेक सामाजिक संस्था यासाठी काम

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

करण्यास तयार आहेत. परंतु सरकारने या कामी पुढाकार घेऊन चालना देण्याची गरज आहे. एक चांगला सेल निर्माण केला पाहिजे, जेणे करुन या योजनांची अंमलबजावणी योग्य रितीने होत आहे की नाही पाहण्यासाठी त्याचे मॉनेटरिंग केले पाहिजे. एखाद्याला कायदेशीर सल्ल्याची मदत पाहिजे असेल तर ती त्याला मिळते की नाही या सर्व गोष्टी केल्या तर या ज्येष्ठ नागरिकांसाठी काही तरी केल्याचे समाधान मिळेल. मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

3.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नियम 260 चा प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या सनदेचे वितरण केलेले आहे. त्यामध्ये एकूण 31 कलमे आहेत. त्या सर्व कलमांना माझा पाठिंबा आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे सत्ताधारी पक्षातील सदस्य आहेत. ही सर्व कलमे शासनाने अंमलात आणली तर खरोखरच ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण होईल असे मला वाटते.

या सदनाचे तत्कालीन सदस्य स्व.प्रमोद नवलकर यांनी नाना-नानी उद्यानाची कल्पना मांडली होती. त्यावेळी मी या सदनाचा सदस्य होतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर...

ते माझे आवडते आमदार होते. नाना-नानी पार्कच्या धर्तीवर मी कांदिवलीला प्रयोग केलेले आहेत. नाना-नानी पार्क प्रमाणे त्या ठिकाणी पंचशील उद्यान आहे. आमचे एक हजार सभासद आहेत. या एक हजार वरिष्ठ नागरिकांसाठी दुपारचा वेळ सोडून रोज सकाळी साडेपाच वाजल्यापासून रात्री नऊ वाजेपर्यंत उपक्रम चालतात. त्या ठिकाणी लाफ्टर क्लब आहेत, योगा क्लब आहे, सत्संग आहे, जॉगिंक पार्क आहे, असे अनेक उपक्रम तेथे चालतात. मालड पासून बोरीवलीपर्यन्त जेवढी गार्डन्स आहेत त्या गार्डन्समध्ये येणा-या ज्येष्ठ नागरिकांसाठी आम्ही हेल्थ सर्व्हिस ऑर्गनायझेशन केलेले आहे. यासंदर्भात मला काही सूचना करावयाच्या आहेत.

सभापती महोदय, युती शासनाच्या काळात माझ्याकडे समाजकल्याण विभागाचे मंत्रीपद होते. त्यावेळी मातोश्री ही वृद्धाश्रम योजना युती शासनाने प्रत्येक जिल्ह्यासाठी राबविली. मी जेव्हा अमरावतीच्या दौ-यावर गेलो होतो त्यावेळी तेथील एका वृद्धाश्रमाला भेट दिली होती. त्या वृद्धाश्रमामध्ये ज्यांची दोन्ही मुले डॉक्टर झालेली आहेत असे एम.डी. डॉक्टर तेथे जीवन कंठीत होते. ही प्रथा उच्चभ्रू समाजामध्ये जास्त आहे आणि अन्य समाजामध्ये कमी आहे असे पूर्वी समजले जात होते. प्रा. प्रवीण दवणे यांनी एका कथेमध्ये सांगितलेले आहे की, आपली जी भारतीय परंपरा आहे त्यामध्ये माणसाचे जगण्याचे वय 120 आहे. 60 वर्षे हा मधला पडाव आहे. म्हणून 60 वर्षानंतर साठी साजरी केली जाते आणि पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या जातात. माझ्या पंचशिल गार्डनचे संचलन करणारा बहादूरसिंग ठाकूर हा 90 वर्षाचा आहे. त्याला आम्ही 90 वर्षाचा तरुण असे म्हणतो. आपल्या संस्कृतीने एकत्र कुटुंब पध्दत देखील सांगितलेली आहे.

सभापती महोदय, आता अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, आई-वडील कामावर जाताना आपल्या मुलाला बेबी-सिटरमध्ये ठेवून जातात. श्री. दवणे असे म्हणतात, आई-वडील दोघेही नोकरी करणारे असतात, ते कामावर जातात, आपल्या मुलाला बेबी-सिटरमध्ये टाकतात आणि नंतर तो मुलगा जेव्हा मोठा होतो त्यावेळी तो आपल्या आईवडिलांना वृद्धाश्रमामध्ये टाकतो. आपली जी एकत्र कुटुंब पध्दती होती ती नष्ट होत चालल्यामुळे आता ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. आईवडिलांचे प्रेम मुलाला मिळत नाही आणि नंतर मुलाचे प्रेम आईवडिलांना मिळत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर....

सभापती महोदय, अलीकडे असे होत आहे की, मुलगा शिकला की त्याला अमेरिकेला पाठविले जाते. कर्ज काढून आईवडिल आपल्या मुलाला येथे शिकवतात, डॉक्टर, इंजिनिअर करतात आणि हीच मुले मग अमेरिकेमध्ये जाऊन अमेरिकेचे नागरिक बनतात. ही मुले आईवडिलांना पहात नाहीत. एक कामत नावाचे गृहस्थ होते. त्यांनी आपल्या मुलाला अमेरिकेला पाठविले होते. ते एकदा उपचारासाठी रिक्षातून डॉक्टरकडे जात होते. सोबत त्यांची पत्नी होती. रिक्षातून जाताना त्यांना मध्येच हृदय विकाराचा झटका आला आणि त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पत्नीने त्यांचे शव हॉस्पिटलमध्ये आणले आणि त्यांचा मुलगा अमेरिकेहून येईपर्यंत ते शव तीन दिवस शवागारात ठेवण्यात आले. तो मुलगा आल्यानंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मुलगा असतानाही वडिलांना मृत्यूनंतर तीन दिवस शवागारात ठेवण्याची वेळ आली. असे देखील काही प्रसंग असतात की, माता-पित्यांचे अंत्यसंकार देखील इतरांनाच करावे लागतात. मुले अंत्यसंकाराच्या वेळी पोहोचत नाहीत, अशी सर्व परिस्थिती अलीकडच्या काळामध्ये निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, आमच्या क्लबमध्ये जेवढे वृद्ध येतात त्या सर्वांचा आम्ही वाढदिवस साजरा करतो. तो वाढदिवस साजरा करताना त्यांना खूप आनंद होतो. परवा 15 तारखेला आपण देखील माझा वाढदिवस साजरा केलात. गेली 10 वर्षे आम्ही वाढदिवस साजरा करण्याचा कार्यक्रम करीत आहोत. वाढदिवस साजरा करताना ते सांगतात की, आमच्या मुलाला देखील आमची जन्मतारीख माहीत नसते. सांगायचे तात्पर्य हे आहे की, ज्येष्ठ नागरिकांना अशा छोट्या छोट्या कार्यक्रमातूनही खूप आनंद मिळतो. आम्ही दरवर्षी "एक शाम वरिष्ठों के नाम" असा कार्यक्रम करीत असतो. या वर्षी केलेल्या कार्यक्रमामध्ये 43 लोकांनी भाग घेतला होता. त्यातील 23 लोकांची आम्ही निवड केली. मुकेश, महम्मद रफी यांच्या आवाजातील गाणी ते म्हणतात, डान्स देखील करतात. आमच्या क्लब मधील 75 वर्षाचे एक जोडपे सोनी टीव्हीवर कार्यक्रम करण्यासाठी गेले होते.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.विजय गिरकर...

मी यासाठी उल्लेख केला की, साठीनंतर बुध्दी नाठी होत नाही. सत्ताधारी तसेच विरोधी पक्षातील वरिष्ठ नेते हे जवळ जवळ 80 वर्षापेक्षा जास्त वयाचे आहेत. त्यांची बुध्दिमत्ता अजूनही शाबूत आहे. ते वरिष्ठ नेते आज देश चालवित आहेत. एक-दोन सूचना करुन मी माझे विचार संपविणार आहे. मातोश्री सारखे राज्यात इतर योग्य वृध्दाश्रम आहेत, त्यांना शासनाने अनुदान दिले पाहिजे. राज्य शासनाने योग्य वृध्दाश्रमांना अनुदान उपलब्ध करुन दिले तर ज्येष्ठ नागरिकांची सेवा त्या संस्था चांगल्या प्रकारे करु शकतील.

सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगण्यास आनंद होतो आहे की, मुंबई महानगरपालिकेने धोरण केले आहे की, वरिष्ठ नागरिकांसाठी प्रत्येक रुग्णालयात एक वेगळा वॉर्ड निर्माण केला आहे. त्या वॉर्डात त्यांना सर्व सुविधा दिल्या जात आहेत. शासनाचे देखील प्रत्येक जिल्हयात रुग्णालये आहेत, त्या रुग्णालयांमध्ये वरिष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र वॉर्ड निर्माण करुन त्यांना सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. शासनाने आपल्या प्रत्येक रुग्णालयात अशा प्रकारचे वॉर्ड निर्माण केले तर वरिष्ठ नागरिकांना रांग लावण्याची गरज भासणार नाही. या गोष्टीकडे शासनाने गांभीर्याने बघितले पाहिजे.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा सेंटर्स निर्माण केले पाहिजे अशा प्रकारची सूचना काही सदस्यांनी केली. शहरामध्ये मोठ मोठे गार्डन्स आहेत, मोकळे मैदाने आहेत, त्या ठिकाणी विरंगुळा सेंटर्स निर्माण केले तर ज्येष्ठ नागरिकांना ते अतिशय सोयीचे होईल.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देतो तसे आरोग्य कार्ड देखील दिले गेले पाहिजे. ते कार्ड त्यांनी रुग्णालयात दाखविले तर डॉक्टरांना त्यांच्या व्याधीची लागलीच माहिती होऊ शकते. म्हणून ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य कार्ड दिले पाहिजेत.

सभापती महोदय, मध्यप्रदेश सरकार वैष्णवदेवी, तिरुपती-बालाजी, शिर्डी अशा श्रध्दास्थानी ज्येष्ठ नागरिकांची सहल काढते. त्या सहलींचा संपूर्ण खर्च सरकार करीत असते. त्या सहलीमुळे ज्येष्ठ नागरिकांना जीवनात वेगळा आनंद मिळतो. ही योजना मध्यप्रदेश सरकारने सुरु केलेली आहे. ही योजना नेमकी काय आहे या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी माहिती समजून घ्यावी आणि त्या धर्तीवर आपल्या राज्यात अशा प्रकारची योजना सुरु करावी.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय गिरकर...

सभापती महोदय,छत्तीसगड राज्यात ज्येष्ठ नागरिकांना 5 रुपयात जेवण दिले जाते. त्यांना कार्ड उपलब्ध करुन दिलेले आहे. ज्येष्ठ नागरिकांना जेवण देण्यासाठी सेंटर्स उभारली गेली आहेत. त्यांना सरकारच्या माध्यमातून 5 रुपयात जेवण उपलब्ध करुन दिले जात आहे. तशी योजना राज्य शासनाने या राज्यात राबवावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. ही योजना या राज्यात सुरु केली तर परावलंबी झालेले ज्येष्ठ नागरिकांना खूपच मदत होईल.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांसाठी राज्य शासनाने तातडीने धोरण जाहीर करावे आणि ज्येष्ठ नागरिकांची जी पुंजी आपल्याकडे उपलब्ध आहे, ती जोपासण्या कामी प्रयत्न करावेत अशा प्रकारची विनंती करतो आणि या प्रस्तावाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी माझे विचार अतिशय थोडक्यात मांडणार आहे. ज्येष्ठ नागरिक दिन आला की आपण या विषयावर चर्चा करतो, परिसंवाद घडवितो, अनेक गोष्टी करतो. परंतु ज्येष्ठ नागरिक दिन संपला की, सगळयांना त्या दिवसाचा विसर पडतो. आपण त्या परिसंवादात काय बोललो होतो, काय विचार मांडले होते याचा कोणीही विचार करीत नाही.

सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी अतिशय संवेदनशील विषय सभागृहासमोर आणला त्याबद्दल मी सर्व प्रथम त्यांचे अभिनंदन करतो. मी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना सांगू इच्छितो की, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, या विषयाचा प्रस्ताव अडीच वर्षापूर्वी सभागृहात चर्चेला आला होता. त्यावेळी खूप चर्चा झाली, परंतु त्यावेळी ज्या सूचना मांडल्या गेल्या त्या सूचनांची शासनाकडून दखल घेतली गेलेली नाही. सन्माननीय मंत्री महोदयांनी त्यावेळी उत्तर देतांना काही योजनांची अंमलबजावणी करण्याबाबतच्या घोषणा केल्या होत्या, त्या घोषणांची देखील अंमलबजावणी राज्य शासनाकडून झालेली नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, मघाशी या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य कार्ड देण्यासंबंधीचा विषय मांडला गेला. ज्येष्ठ नागरिकांचा संपूर्ण पत्ता, त्याच्या ओळखपत्राची माहिती, आतापर्यंत झालेल्या आजाराची व घेतलेले उपचार याची माहितीची नोंद असलेले इलेक्ट्रॉनिक आरोग्य कार्ड त्यांना देण्यात आले पाहिजे. ज्येष्ठ नागरीक असलेला एखादा पेशंट सरकारी रुग्णालयात गेला, त्या ठिकाणी त्याचे कार्ड इनसर्ट केले तर संगणकाच्या स्क्रीनवर त्या पेशंटची सर्व माहिती आली पाहिजे.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

डॉ.दीपक सावंत.....

आता आतापर्यंत कोणती ट्रिटमेंट दिली गेली आहे, कोणत्या ड्रग्जची ॲलर्जी आहे, मेंदू विकार झाला होता की नाही, अपघात झाला आणि ओळख पटविण्याकरिता माहिती हवी असेल तर या कार्डाचा उपयोग होऊ शकतो. या कार्डाची किंमत 500 रुपयांपेक्षा अधिक नाही. मध्यंतरी क्लाऊड या संस्थेने अशा प्रकारचे कार्ड तयार केले होते. राज्य शासनाला अशा प्रकारे प्रि-ट्रिटमेंटसाठी ज्येष्ठ नागरिकांना कार्ड पुरविणे कठीण नाही. कार्डावर नमूद केलेली औषधे कंपन्यांना सांगून कमी किंमतीमध्ये देण्याच्या सूचना करता येतील. डायबेटीक, रक्त पातळ होण्यासाठी, व्हिटॅमिन आदी औषधांची मुख्यत: गरज भासते. अशा प्रकारच्या मोजक्या औषधांची यादी करुन द्यावी आणि ती औषध कंपन्यांना सांगून प्रॉडक्शन कॉस्टमध्ये दिली गेली तर राज्य शासनाला भ्रष्टाचार न होता या गोष्टी करणे शक्य होईल.

सभापती महोदय, उत्तराखंड येथील नैसर्गिक आपत्तीच्या घटनेमध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक डायबेटीक औषधे वेळेवर न मिळाल्यामुळे दगावले आहेत. इन्शूलिन मिळणे महत्वाचे असते. ही औषधे उपलब्ध करुन देणे आवश्यक असते.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितले की, नागपूर येथे गॅदरिंग आयोजित केले गेले होते. मी असे सूचवू इच्छितो की, कम्पेनियनशीप डेव्हलप करावी आणि त्याला कायद्याने मंजुरी द्यावी. एकटेपणाचे आयुष्य अनेक आजारांना निमंत्रण ठरते. म्हणून कम्पेनियनशीप कायद्याने मंजूर करावी. लिव्ह इन रिलेशनशीपबद्दल मी म्हणत नाही. तो विषय वेगळा आहे. ज्यांनी इच्छा व्यक्त केली त्यांना कायद्याने कम्पेनियनशीपबद्दल मान्यता द्यावी.

ज्येष्ठ नागरिकांच्या संपत्तीचा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. आईवडिलांचा सांभाळ करीत नसतील किंवा आर्थिक मदत करीत नसतील, जीवन हलाखीचे केले जात असेल तर मुलांच्या विरोधात न्याय मागण्याकरिता फास्ट ट्रॅक कोर्टात जाण्याची मुभा असावी आणि शिक्षणासाठी केलेल्या खर्चाची व्याजासह वसुली करण्याची कायद्यात तरतूद करण्यात यावी. नवीन पिढीला हीच शिक्षा असली पाहिजे. नवीन पिढी बेछूटपणे वागत चालली आहे. संस्कार लोप पावत आहेत. आयसीएसई, सीबीएसई शिक्षणामुळे संस्कार पुसले जात आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून संस्कार घडविणे कितपत उचित आहे याची मला माहिती नाही. संस्काराची संकल्पना वेगळी आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नागपूर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दाट वस्ती क्षेत्रात वाणिज्य वापर व औद्योगिक वापर याबाबतची तरतूद समाविष्ट करणे

मु.शी.: नागपूर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दाट वस्ती क्षेत्रात वाणिज्य वापर व औद्योगिक वापर याबाबतची तरतूद समाविष्ट करण्यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

नंतर 3ओ.1...

अप्रमाणित प्रत / अप्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नागपूर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील शहरातील एकूण 24 रस्ते "नो शॉपिंग फ्रंटेज स्ट्रीट" मधून वगळण्याबाबतच्या फेरबदलाच्या प्रस्तावाबाबत

मु.शी.: नागपूर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील शहरातील एकूण 24 रस्ते "नो शॉपिंग फ्रंटेज स्ट्रीट" मधून वगळण्याबाबतच्या फेरबदलाच्या प्रस्तावाबाबत माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांसाठी ठोस कार्यक्रम आखणे

मु.शी : ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांसाठी ठोस कार्यक्रम आखणे या विषयावर सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. सुभाष चव्हाण, प्रकाश बिनसाळे, संजय दत्त, श्रीमती विद्या चव्हाण, निरंजन डावखरे, विक्रम काळे, अब्दुल्ला खान दूर्राणी, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप,दीपकराव साळुंखे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री एम.एम.शेख, ॲड.जयदेवराव गायकवाड, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु.....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांवर होणारे हल्ले हा एक चिंतेचा विषय आहे. आपल्याकडे होमगार्डची भरती कमी प्रमाणात होते. वृध्दांच्या रक्षणासाठी होमगार्डला विशेष ट्रेनिंग देऊन त्यांची भरती केली तर वृध्दांच्या संरक्षणासंदर्भात आपल्याला होमगार्डचा चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकतो. पोलीस स्टेशनवर अगोदरच खूप मोठा ताण असल्यामुळे त्यांना वृध्दांकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही ही वस्तुस्थिती. त्यामुळे वृध्दांचे रक्षण करण्यासाठी होमगार्डचे एक विशेष युनीट स्थापन केले तर प्रत्येक शहरातील वृध्दांचे रक्षण करणे, त्यांना धीर देणे सहज शक्य होईल.

सभापती महोदय, ज्येष्ठांबाबतीतील राज्याचे धोरण कित्येक वर्षापासून लांबले गेले आहे. माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय मंत्री महोदय श्री. मोघे साहेब येथे उपस्थित आहे त्यामुळे त्यांनी ज्येष्ठांच्या संदर्भातील राज्याचे नेमके धोरण काय राहणार आहे, हे येणाऱ्या अधिवेशनापर्यंत तयार करुन ज्येष्ठांना दिलासा द्यावा व ज्येष्ठांचे जीवन सुसह्य करावे व निदान ते ज्या घरात राहतील त्या घरात ते सुरक्षित रहावेत एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय,ज्येष्ठांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी तसेच त्यावर माझें विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आमचे वरिष्ठ मित्र सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी ज्येष्ठांच्या सनदीलाही समर्थन दिलेले आहे त्यामुळे या विषयाच्या संदर्भात मी रिपीटेशन करणार नाही.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात मी काही सूचना करुन थांबणार आहे. ज्येष्ठ नागरिक हा या देशातील एक चिंतेचाच विषय बनत चालला आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : सभागृहाच्या अनुमतीने सभागृहाची वेळ या प्रस्तावा वरील चर्चा पूर्ण होई पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे. अजूनही दोन-तीन सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलावयाचे आहे. त्यामुळे आज आपण फक्त चर्चा करू या आणि उद्या सकाळी माननीय मंत्र्यांचे चर्चेवरील उत्तर ठेवले तर ते जास्त सोयीचे होईल.

तालिका सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर आपण माननीय मंत्र्यांचे उत्तर घ्यायचे किंवा नाही हे ठरवू या. आता सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी त्यांचे भाषण पुढे सुरू करावे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, आपण सन 2001 चा सेन्सस बघितला तर ज्येष्ठ पुरूष नागरिकांचे 7.1 टक्के, तर ज्येष्ठ महिला नागरिकांचे 7.8 टक्के प्रमाण होते. लेटेस्ट सर्व्हे असे सांगतो की, सन 2050 पर्यंत देशातील 20 टक्के नागरिक ज्येष्ठ असतील. एवढ्या मोठ्या प्रमाणावर ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढणार आहे. त्यामुळे 20 टक्के मतदार हे ज्येष्ठ नागरिक असतील. त्यांच्यासाठी राज्याने विचार केला नाही तर कुठलीच पॉलिसी सर्वंकष होणार नाही अशा पद्धतीची स्थिती आहे.

सभापती महोदय, एक सर्व्हे असा सांगतो की, जवळ जवळ 40 टक्के ज्येष्ठ नागरिक छळवणूकी संबंधातील तक्रार करतात. 6 तक्रारीं पैकी 1 तक्रार एक्सपोझ होते अशा प्रकारची स्थिती आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद 41 राज्य सरकारला असे करण्यासाठी बाध्य करते. अगदी स्पेसिफिकली सांगावयाचे झाले तर अनुच्छेद 41 मध्ये असे नमूद केले आहे की, "The State shall within the limits of it's economic capacity and development make effective provisions of securing a Right to Work, Right to Educate, Right to Public Assistance to old age people." भारतीय संविधान राज्यांकडून आपल्या इकॉनॉमी लिमिटमध्ये ज्येष्ठ नागरिकांना जगण्याचा, त्यांना काम करण्याचा, शिक्षणाचा, अधिकार दिला पाहिजे असे अपेक्षित धरते. संविधान केवळ एवढ्यावरच थांबत नाही तर त्यांच्या विकासा बरोबर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

परिणामकारक तरतुदी केल्या पाहिजेत असे देखील सांगते. तेव्हा यासंबंधी माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे साहेबांनी उत्तर द्यावे की, आपल्या सरकारने इकॉनॉमी लिमिट काय ठरविले आहे. आपण अनुच्छेद 41 अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांचा अपेक्षित विकास आणि सेवा कशी काय करू शकतो हे देखील सांगितले पाहिजे. यासाठी राज्य सरकारने आपले इकॉनॉमी लिमिट काय ठरविले आहे हे सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, "Old Age Social Security" ही केंद्र शासनाची योजना आहे. माझी सरकारकडे मागणी आहे की, "Old Age Social and Physical Security" अशी योजना आणावी. बॉडीली इंज्युरी ही सोशल सिक्युरिटी असा ओल्ड एज सिक्युरिटीचा ऑडिट रिपोर्ट सरकार देणार काय ? किंबहुना तो महिन्या भरामध्ये द्यावा अशी मी मागणी करतो. हा ऑडिट रिपोर्ट येणे एवढयासाठी आवश्यक आहे की, आपण कुठलेही धोरण जेव्हा सादर करतो त्यावेळी महाराष्ट्रातील जनतेला कळले पाहिजे की, आजच्या ऑडिट प्रमाणे ओल्ड एजेड लोकांची, सिनिअर सिटीझन्सची सोशल सिक्युरिटी काय आहे, त्यांची फिझीकल सिक्युरिटी काय आहे. त्यामुळे श्वेतपत्रिका आणि धोरण यांची तुलना करण्यासाठी ऑडिट रिपोर्ट द्यावा अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आपण पेन्शन संबंधी चर्चा केली. क्रीमिनल प्रोसिजर कोडच्या कलम 125 अनुसार आजही ज्येष्ठ नागरिकाला कोर्टात अर्ज करता येतो. एखाद्या ज्येष्ठ नागरिकाला मुले आहेत व त्याची देखभाल त्याच्या मुलाने करावी असे त्याला वाटते. परंतु, त्याची देखभाल नीट होत नसेल तर सीआरपीसीच्या कलम 125 अनुसार आणि "Hindu Adoption and Maintenance Act" च्या कलम 20 अनुसार आजही ज्येष्ठ नागरिकांना न्यायालयात अर्ज करता येतो. त्यामुळे माझी सरकारला विनंती आहे की, सीआरपीसीच्या कलम 125 आणि "Hindu Adoption and Maintenance Act" च्या कलम 20 अंतर्गत ज्या सुविधा कोर्टातून मिळावयास पाहिजे त्यासाठी अर्ज करण्याची जी कार्यपद्धती आहे ती सिनिअर सिटीझन्स फ्रेंडली करावी. आजही कुठल्याही कोर्टात गेल्यानंतर कोर्ट फी भरण्यासाठी ज्या प्रकारच्या रांगा असतात त्या सिनिअर सिटीझन्स फ्रेंडली नाहीत.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

यानंतर श्री.अजित...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

त्यामुळे सीआरपीसी 125 आणि हिंदू ॲडॉप्शन ॲक्ट खालील प्रोसिजर सिनिअर फ्रेन्डली केल्या पाहिजेत.

सभापती महोदय, केंद्र सरकारची National Council For Older Person (NCOP) कौन्सिल आहे. त्या धर्तीवर राज्य सरकार State Council For Older Person अशी कौन्सिल करणार आहे काय, असल्यास ती किती दिवसांत करणार याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात द्यावे.

सभापती महोदय, ग्रामपंचायतीला पाच ते तीस लाख रुपयांपर्यंत सबसिडाईज पध्दतीने किंवा इंटरेस्ट फ्री पैसे उपलब्ध करुन दिल्यास ग्रामपंचायत स्तरावर देखील वृध्दाश्रम बांधण्यात येतील. या संदर्भात सरकारचे नेमके काय धोरण आहे हे समजले पाहिजे. या संदर्भातील निर्णय ग्रामविकास, आदिवासी विकास विभाग घेणार आहे की माननीय मुख्यमंत्री महोदय घेणार आहेत याचे देखील माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण द्यावे.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांना प्रवासामध्ये पूर्णपणे सवलत दिली पाहिजे. चंदीगड राज्याने ज्येष्ठ नागरिकांना प्रवासामध्ये पन्नास टक्के सवलत दिलेली आहे. पंजाब आणि केरळ राज्यांने ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सवलत दिलेली आहे. आपल्या राज्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी एस.टी.प्रवासात काही सवलत दिलेली आहे. केंद्र सरकारने रेल्वे प्रवासामध्ये सवलत दिलेली आहे. पंजाब आणि केरळ सारखी छोटी राज्ये ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा देऊ शकते तर आपल्या राज्याने सुध्दा तशी सुविधा दिली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी त्यांच्या भाषणात "विल"संबंधी अतिशय महत्वाचा मुद्दा मांडला. एकदा विल केल्यानंतर पुढे काय असा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा To make the Will and to change the Will या संदर्भात राज्यभर कॅम्पस घेतले पाहिजेत. विल कधीही चेंज करता येऊ शकते याचा व्यापक प्रमाणात प्रचार झाला तर त्याचे प्रोटेक्शन खूप मोठ्या प्रमाणात राहील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये सन 2007 च्या प्रपोज कायद्याचा उल्लेख आहे. त्या कायद्यान्वये कोणत्याही व्यक्तीला निर्वाह भत्ता मागण्याचा अधिकार मिळणार आहे. त्यासाठी त्यांनी अर्ज करावा लागेल. त्यांनतर एक्सपार्टी ऑर्डर केव्हा होईल, वॉरन्ट केव्हा काढला जाईल या सर्व गोष्टी त्या कायद्यामध्ये आहेत. एखाद्याने आपल्या पाल्याच्या विरोधात निर्वाहभत्त्याची रक्कम मागितली आणि पाल्याने ती वेळेत दिली नाही किंबहुना पाहिजे तेवढी रक्कम दिली नाही तर पाल्याच्या विरोधात अपील करण्याचा अधिकार आहे. पण 2007 च्या प्रपोज कायद्यामध्ये अपील करताना मूळ रक्कम जमा केल्यावरच अपील करता येईल असे म्हटलेले नाही. तेव्हा कोणत्याही निर्वाहभत्त्याचे अपील मूळ रक्कम जमा केल्यावरच विचारात घेतले जाईल असा बदल करावा अशी सूचना करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यां संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी सांगितल्याप्रमाणे जुन्या काळात एक संस्काराची दिशा होती आणि त्याचे मूळ कारण चाळ संस्कृती होती. चाळ संस्कृतीमध्ये संस्कारांची चाल होती, माणुसकीची चाळ होती. नंतर ब्लॉक पध्दती आल्यामुळे संबंध ब्लॉक झाले, नातीगोती ब्लॉक झाली. त्यानंतर फ्लॅट पध्दती आली आणि त्या पध्दतीमध्ये पूर्ण माणुसकी फ्लॅट झाली. ही माणुसकी फ्लॅट झाल्यामुळे वृध्दाश्रमांची गरज पडू लागली.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन सांगितले की, ज्येष्ठ नागरिक ही देशाची संपत्ती आहे. त्यांचा अनुभव येणाऱ्या पिढीला मार्गदर्शक ठरु शकतो. एक मार्गदर्शक म्हणून त्यांच्या अनुभवाचा आपल्याला फायदा करुन घेता येईल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे....

महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री या ठिक्राणी उपस्थित नाहीत. त्यांच्या विभागाशी संबंधित एक सूचना मला करावयाची आहे. प्री-स्कूल किंवा डे-केअरमध्ये वरिष्ठ नागरिकांना संधी दिली तर ते मुलांची चांगल्या पध्दतीने काळजी घेऊ शकतील. तसेच त्यांच्या माध्यमातून मुलांना चांगले शिक्षण आणि संस्कार मिळू शकेल. आपणा सर्वांना माहीत आहे की, मुंबई शहरात सकाळी 9 ते रात्री 9 वाजेपर्यंत पालक काम करतात. सध्या विभक्त कुटुंब झाल्यामुळे घरातील आई-वडील दोघेही सकाळी 9 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत ड्युटीवर असतात. त्यांना घरी येईपर्यंत 9 वाजतात. धावपळीच्या आणि दगदगीच्या जीवनामध्ये सिंगल फॅमिलीच्या ठिक्राणी मुलांना चांगले संस्कार देण्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा उपयोग होऊ शकतो.

महोदय, बोर्डाच्या परीक्षांमध्ये कॉपीचे प्रकार होत असल्याचे आपण ऐकतो. त्यामुळे या परीक्षांच्या वेळी ज्येष्ठ नागरिकांना थर्ड अंपायर म्हणून संधी दिली पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांना अशा प्रकारची संधी दिली तर समाजाला चांगली दिशा देण्यासाठी आणि भावी पिढीचे पुढील शिक्षण चांगले होण्यासाठी तसेच कॉपीला आळा बसण्यासाठी ते चांगले काम करु शकतील.

महोदय, या ठिकाणी फ्री मेडीकल एक्स्पेन्सेसच्या विषयी चर्चा झाल्यामुळे मी त्यावर बोलत नाही. संजय गांधी निराधार योजनेचा स्कोप वाढविला तर त्यातून निश्चितपणे ज्येष्ठ नागरिकांना रोजगाराचे माध्यम उपलब्ध करुन देता येईल.

कम्पॅनियनशीप आणि फास्ट ट्रॅक कोर्टचा विषय सुध्दा महत्त्वाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी विलचा विषय मांडला आहे. तशाच प्रकारे वारसा हक्काने नोकरीवर लागलेल्या मुलांचा विषय सुध्दा महत्त्वाचा आहे. पालकांनी निवृत्ती स्वीकारल्यानंतर वारसा हक्काने त्यांचे अपत्य सेवेत लागतात. परंतु नोकरी मिळाल्यानंतर ते आई-वडिलांना विचारत नाही. त्यांचे आपल्या आई-वडिलांप्रती केवळ नोकरी मिळविण्यापुरते प्रेम असते. अशा प्रकारे वारसा हक्काने नोकरी मिळविलेले अपत्य आपल्या आई-वडिलांकडे दुर्लक्ष करीत असतील तर त्यांच्या संदर्भात सुध्दा योग्य ती कार्यवाही केली पाहिजे. जेणेकरुन वारसा हक्काने सेवेत लागलेल्या मुलांवर एकप्रकारे वचक राहील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे....

महोदय, माझ्या भाषणाचा समारोप मी कवितेच्या माध्यमातून करतो. एका मुलाने आपल्या वडिलांना वृध्दाश्रमात दाखल केल्यानंतर त्या वडिलांची भावना मी कविता रुपाने मांडतो. वृध्द वडील आपल्या मुलाला उद्देशून म्हणतात की,

जातोस जा माझ्या जीवा रे,
जाशील तिथे सुखी रहा रे,
येईल जेव्हा माझी आठवण,
एक हाक दे माझ्या मुला रे
मज लक्ष तुझ्यावर नेहमी,
मज जीव तुझ्यावर नेहमी,
विसरशील तू दिवस ते जुने,
पण ते दिवसच संपत्ती माझी,
संसार कर तू सुखाचा,
त्या संसारात स्थान न मजला,
प्रार्थना ही करतो देवा चरणी,
स्मरणात तरी तुझ्या स्थान राहील मजला.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले व अन्य सदस्यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नावर प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, समाजामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांवर सातत्याने चर्चा होत असते. समाजातील विविध घटकांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न काही प्रमाणात वेगवेगळे आहेत. त्यापैकी एक म्हणजे समाजामध्ये सर्वसाधारण वातावरण असते की, लवकर निवृत्ती घ्यावी. परंतु ज्यांना लवकर निवृत्ती घ्यावी लागली त्यांचा सर्व्हे करुन त्यांचे आयुष्य खरोखरच सुखी झाले काय हे पाहीले पाहिजे. ज्यांना मुदतीपूर्वी निवृत्ती घ्यावी लागली किंवा अन्य कारणांमुळे ज्यांना नोकरी सोडावी लागली त्यांचे आयुर्मान कमी झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. म्हणून मुदतीपूर्वीची निवृत्ती नागरिकांसाठी खूप मोठा मानसिक धक्का ठरतो. किंबहुना ते आजारपणाचे कारण ठरु शकते. स्ट्रेस फ्री आयुष्य जगत असताना असे आढळून येईल की, लवकर निवृत्ती स्वीकारल्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक निरनिराळ्या आजारांचे बळी ठरलेले आहेत.

महोदय, ज्येष्ठ नागरिकांची आकडेवारी पाहिली तर त्यामध्ये महिलांची संख्या जास्त आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांमध्ये त्यांना निश्चितपणे कौटुंबिक झालर आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

माझ्या अगोदर सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडत असताना एका गोष्टीचा उल्लेख केलेला आहे पण त्यांची पुनरुक्ती टाळून मला असे सांगावेसे वाटते की, विहार स्वातंत्र्य, माणसाला दळणवळण करणे, प्रवास करणे यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सहजसोपी तंत्रज्ञानाची साधने, विशेषत: फोन, संगणक, आयपॅड, लिफ्टस, जिने, रेल्वे प्लॅटफॉर्म, मोटारी, व्हील चेअर्स, स्वयंपाक घरे, अशा प्रवास सुविधा तयार करणे ही सरकारची जबाबदारी आहे. परदेशामध्ये असे चित्र दिसते की, आपण सहजगत्या व्हील चेअर्स प्लॅटफॉर्मवर नेऊ शकतो. पण आज कोठलेही रेल्वेचे प्लॅटफॉर्म पाहिले तर त्यामध्ये व्हीलचेअर घेऊन माणसाला प्रवास करणे जवळजवळ अशक्य आहे, ही आज वस्तुस्थिती आहे. म्हणून त्याची काटेकोर अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग इत्यादी संबंधित विभागांनी करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा कौटुंबिक छळाबद्दलचा आहे. 44 टक्के ज्येष्ठांकडे दुर्लक्ष होते. 56 टक्के मुलांकडून त्यांना त्रास सहन करावा लागतो. सुनांकडूनही त्रास सहन करावा लागतो. 75 टक्के ज्येष्ठ नागरिकांना अपमानाचे जिणे सहन करावे लागते. मला असे वाटते की, आपण कधीही मानसिकतेवर फार बोलत नाही. परंतु आयुष्याची सर्व पुंजी मुलांवर एकाग्रतेने खर्च करीत असताना बऱ्याच वेळेला मुलांशिवाय जीवनच नाही अशी हजारो दाम्पत्ये आपल्याला आसपास दिसतात. जेव्हा तो मनुष्य वृध्द होतो आणि मुलांना नकोसा होतो तेव्हा आपण मुलांना नकोसे झालो आहोत या कल्पनेमुळेच तो मोडकळीस येतो. मी असे म्हणेन की अतिवृध्द होण्याच्या अगोदर जे 55, 60, 65 वर्षे वयाचे नववृध्द आहेत त्यांनी पहिल्यांदा स्वत:ची मानसिकता बदलली पाहिजे. आजच्या तरुण पिढीच्या लोकांनी आम्ही मुलांवरच मानसिकदृष्टया अवलंबून राहणार ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे. कारण मानसिकदृष्टया कोलमडलेला माणूस कितीही सुख आले तरी 24 तास सातत्याने मुलांचा विचार करीत असतो आणि म्हणून तो स्वत: स्वतंत्रपणे विचार करु शकत नाही. जोपर्यंत गरज आहे तोपर्यंत मुलांना जरुर मदत करावी, त्यांच्या बरोबरचे सहजीवन असावे परंतु त्यांना कोठे तरी आपली लुडबूड वाटत असेल किंवा कोठे तरी आपले जीवन आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

त्यांच्या जीवनाची शैली यामध्ये विसंवाद होत असतील तर आपणच स्वत:ला बदलून घेणे गरजेचे आहे याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, आपण वृध्दाश्रमांची खूप चर्चा करतो. शासनाने मातोश्री वृध्दाश्रम योजनेचे पुनरुज्जीवन करावे. त्या योजनेचे पुनरुज्जीवन का करीत नाही याची कारणे आम्हाला कळली पाहिजेत. ज्यांनी चांगल्या हेतूने वृध्दाश्रम सुरु केले त्या अनेक वृध्दाश्रमांचे इन्फ्रास्ट्रक्चर त्यांच्याकडे आहे. त्यांच्याकडे स्टाफ आहे. काही लोक अनुदान नसतानाही वृध्दाश्रम चालवित आहेत. परंतु ज्यांनी वृध्दाश्रमासाठी ठिकठिकाणी इमारती बांधल्या त्या इमारती आणि तेथील सर्व पायाभूत सुविधा याचा उपयोग जर त्या भागातील लोकांना होत नसेल तर एक चांगली योजना आपण बंद केल्यामुळे लोकांना आपण लाभापासून वंचित ठेवत आहोत. म्हणून ही मातोश्री वृध्दाश्रम योजना शासनाने सुरु करावी अशी मी आग्रहाने मागणी करते.

सभापती महोदय, आणखी एका मुद्याकडे मी लक्ष वेधू इच्छिते. परांजपे बिल्डर्स यांनी पुण्यामध्ये, ठाण्यामध्ये अथश्री नावाची संकुले उभारलेली आहेत. त्या संकुलातील संकल्पना आपल्यापैकी काही लोकांनी पाहिली असेल. आमच्या परिचयातील काही लोक त्या ठिकाणी राहिले आहेत. त्या ठिकाणी अतिशय चांगली संकल्पना आहे. वृध्द लोकांना स्वतंत्रपणे जीवन जगावयाचे असेल तर त्यांच्यासाठी औषधोपचार, त्यांच्या बरोबरीचे मित्र-मैत्रिणी, नातेवाईक यांच्यासह किंवा म्हटले तर स्वतंत्र, म्हटले तर एकत्र राहता येईल. त्या ठिकाणी कम्युनिटी किचन असेल पण त्याच वेळेला त्यांना जर स्वतंत्रपणे जेवण बनवावयाचे असले तरी सुध्दा त्यांना ते बनविता येईल. रोज संध्याकाळी एक बस तेथील वृध्दांना बाजारापर्यंत घेऊन जाईल आणि संध्याकाळी परत त्यांना घरापर्यंत आणून सोडेल. त्या वृध्दाचे निधन झाल्यावर तो फ्लॅट त्यांच्या वारसांना विकता येणार नाही. त्यांनी 30-35 वर्षाचे जे पैसे भरलेले आहेत ते पैसे त्यांनी अशा पध्दतीने कॅलक्युलेट केले आहेत की, तो फ्लॅट ते तशाच वृध्द नागरिकाला ट्रान्सफर करु शकतात. त्या संकुलामध्ये वृध्दांना आवडेल असे संपूर्ण वातावरण तयार केलेले असते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

माझी माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे साहेबांना खास विनंती आहे की, त्यांनी पुण्यातील अथश्री संकुलाला जरुर भेट द्यावी. त्या ठिकाणी गेले नसतील तर त्यांनी ते समजून घ्यावे. ते आदर्श आहे असे मी म्हणणार नाही. या ठिकाणी अमुक एका बिल्डरच्या बाजूने बोलण्याचा तर प्रश्नच उद्‌भवत नाही. पण ही संकल्पना चांगली आहे. प्रत्येकाला जर वृध्दाश्रमात जाणे शक्य नसेल तर ग्रामीण भागामध्ये सुध्दा लोकांना अशा प्रकारे एकमेकांच्या आसपास राहणे लोकांना आवडू शकते, ते सुरक्षित वाटू शकते. प्रत्येकाला स्वत:च्या घरात जरी चांगले वाटले तरी काही वेळेला प्रत्येकाला स्वत:चे घर मेन्टेन करता येईल असे नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

इलेक्ट्रिशियन किंवा प्लंबरला बोलविल्यानंतर माझ्यावर हल्ला होईल अशी भीती बाळगण्यापेक्षा अशा प्रकारची सहनिवास किंवा संकुले ही मोठ्या शहरांमध्ये उपयुक्त आहेत असे या सर्व निरीक्षणानंतर माझे मत झालेले आहे. एकाकी राहणाऱ्या वृध्दांसाठी पोलिसांनी हेल्प लाईन्स सुरु केल्या आहेत असे वारंवार सांगितले जाते. या हेल्प लाईनवरुन वृध्दांनी पोलीस स्टेशनमध्ये फोन केला तर त्यांना समोरच्या व्यक्तीचे ऐकूही येत नसते. अशा वेळी कानाला मशीन लावून तो माणूस काय बोलत आहे हे ऐकण्याची किती लोकांमध्ये सहनशक्ती असते याबद्दल मला शंका वाटते. आपल्या जवळची माणसे वृध्द होतात. त्यांना कमी ऐकू येत असते. तेव्हा आपल्याला हळूहळू त्याची जाणीव होऊ लागते की, त्या माणसाची आपल्याकडून काय अपेक्षा असेल ?

आज योगायोगाने 17 तारीख आहे. स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे निधन याच तारखेला झाले होते. 22 तारखेला गुरुपौर्णिमा आहे. मोठे साहेब ज्येष्ठ नागरिक होते तरी सुध्दा त्यांचा दरारा, त्यांची स्मरणशक्ती यातून असे जाणवत असे की, आपल्या अनुभवाचा फायदा सर्वांना दिला पाहिजे अशीच भूमिका वृध्दांची असते. त्यावेळी ते वृध्द हे केवळ वृध्द नसतात तर फार मोठ्या अनुभवाचा, ज्ञानाचा साठा त्यांच्याकडे असतो. ज्येष्ठ नागरिकांकडे करुणेच्या व दयेच्या भूमिकेतून बघू नका. ज्येष्ठ नागरिकांचे ज्ञान व विचार हे समाजाच्या उपयोगासाठी कसे वापरात आणावयाचे, त्यांना गुरुस्थानी बघून काम कसे करावयाचे ही भूमिका महत्वाची आहे. त्यादृष्टीकोनातून त्यांचा आत्मसन्मान फार महत्वाचा आहे.

आमचे स्नेही एक वकील आहेत, त्यांना आमच्या शिबिराला बोलविल्यानंतर वृध्दांनी स्वत:ची संपत्ती, घरे पूर्णपणे मुलांच्या नावावर करु नयेत असा नेहमी सल्ला देत असतात. आई-वडिलांची मालमत्ता स्वत:च्या नावावर करुन घेतल्यानंतर किंवा विकल्यानंतर त्यांची परिस्थिती आश्रितासारखी झालेली असते. ही दुर्दैवाने वास्तविकता आहे. विशेषत: दुर्दैवाने आज समाजामध्ये व्यक्ती केंद्रीतता वाढत आहे. यामध्ये ठिकठिकाणी ज्येष्ठ नागरिक संघ तयार झालेले आहेत. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर अशा अनेक शहरांमध्ये हजारो संघ तयार झालेले आहेत. त्यांना शासनाने मान्यता देऊन विरंगुळा केंद्रासाठी किंवा विविध उपाययोजनांसाठी निधी लागतो. महानगरपालिका किंवा जिल्हा परिषदांची बजेटस् तयार होत असतात त्या बजेटमधून त्यांच्या काय अपेक्षा आहेत आणि त्यांची प्रतिपूर्ती करणे बंधनकारक केले पाहिजे. या विषयाकडे मला लक्ष वेधावेसे वाटते.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

आमच्याकडे कौटुंबीक हिंसेच्या काही केसेस येत असतात. त्यामध्ये सासू-सासऱ्याचे आम्हाला अनेकदा भेटण्यासाठी फोन येत असतात. सुनांकडून होणाऱ्या मारहाणीचे प्रकार गेल्या काही दिवसांपासून वाढत आहेत. हा प्रकार अतिशय खेदजनक आहे. ज्येष्ठ नागरिकांना मारहाण केली जाते त्यावेळी आम्ही मुलामुलींना बोलवून सांगत असतो की, तुमच्याबद्दल आमच्याकडे तक्रार आलेली आहे. त्यावेळी चार लोक आम्हाला बोलतील या भीतीने त्यांची भूमिका बदललेली असते. या वयामध्ये मारहाणीची भीती वाटते त्यावेळी कायद्याचा बडगाही वापरणे गरजेचे असते. गरीब, अति गरीब, श्रीमंत, मध्यम श्रीमंत, अपंग आणि विशेष गरज असणारे वृध्द आहेत त्यांच्यासाठी रुग्णसेविका किंवा रुग्णसेवकांची सेवा उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्यांनाही रोजगाराची गरज असते.

महिला आर्थिक विकास महामंडळाचे काम करीत असताना रुग्णसेवकांसाठी आम्ही छोटा अभ्यासक्रम सुरु केला होता. ज्यामध्ये सर्वांना नर्सेस ठेवता येणार नाही किंवा नर्स ठेवता येणार नाही पण ज्यांना 3 महिने, 6 महिने प्रथमोपचार, काळजी घेणे, वृध्दांशी गप्पा मारणे याचे प्रशिक्षण दिलेले असते. अनेकदा फिजिओथेरिपिस्ट आल्यानंतर त्यांच्याशी बोलल्यानंतर त्या रुग्णाला बरे वाटत असते. यामधून त्यांच्या गरजा तयार होत असल्याचे आपल्या लक्षात येते. संवेदनशीलतेचे प्रशिक्षण दिले नाही तर एखाद्या वेळेला रुग्णाला पुन्हा पुन्हा बाथरुमला होत असेल तर तो सेवक डोळे वटारुन सांगतो की, मी सारखे तुम्हाला पॅन देणार नाही. वृध्दाश्रमामध्ये मारहाण करणे किंवा त्यांना जेवण न देणे किंवा एवढेच जेवले पाहिजे अशा घटना दिसतात. हा वैयक्तिक प्रश्न नसून केवळ धोरणाच्या अंमलबजावणीपुरता न राहता त्याच्या यासाठी कृती कार्यक्रम आखला पाहिजे असे मला वाटते. सत्ताधारी पक्षाचे सदस्य एखादी सनद जाहीर करतात त्यावेळी सत्तेत राहून त्या सनदेची वचनपूर्ती काय केली आहे ते समजणे अनाकलनीय आहे. आपणच आपली सनद जाहीर करत असतो तेव्हा त्याची वचनपूर्ती जाहीर केली पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

आपण नेहमी म्हणतो की, लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा. बालपण हे नेहमी हवेहवेसे वाटणारे असते. एखादे गोंडस बाळ कुणालाही आकर्षिक करते. पिल्लू, मग ते घोड्याचे असो अथवा गाढवाचे असो, मांजरीचे असो किंवा कुत्र्याचे असो, सगळयांना हवेहवेसे वाटणारे, गोंडस गोजिरवाणे बालपण असते. पण त्या उलट म्हातारपण असते. म्हातारपण म्हणजे तिरस्कार. ज्या वयात ख-या आधाराची गरज असते, ज्या वयामध्ये प्रेमाचा हात हवा असतो, एक प्रेमाचा शब्द ऐकायला कान आसुसलेले असतात, कदाचित तो कानावर पडत नाही म्हणूनच इतर नकोसे वाटणारे शब्द ऐकूच येत नाहीत. म्हणूनच वय झाले की ऐकू येत नसावे असे वाटते. एकदा प्रेमाने हाक मारुन बघा. त्याच कानांना सहज ऐकू येईल ती प्रेमाची हाक. जी बालपणी सहज सारखी सारखी कानावर पडते ती पुढे ऐकूच येईनाशी होते. आपले वजन प्रथम पोटात वाढवून पुढे कडेवर कौतुकाने धेऊन फिरणारे आई-बाबा म्हातारपणी ओझे वाटायला लागतात. इतकी का तरुण पिढी निष्काळजी झालेली आहे ? वेळच नाही. प्रेमाने आई-बाबा म्हणून हाक मारण्यासाठी, प्रेम व्यक्त करण्यासाठी कितीसा वेळ लागतो. बायकोच्या प्रेमापुढे आईविषयीचे प्रेम इतके फिके होऊन जाते का ? नको, तुमच्या जीवनामध्ये लुडबुड नको म्हणून दखल घेणारे आई-बाबा इतके बेदखल होऊन जातात का ? आपणच त्यांचा आधार आहोत, त्यांच्या म्हातारपणाची काठी आहोत. आपण का त्यांचा आधार होऊ शकत नाही हा विचार करण्याची वेळ तरुणाईने आणलेली आहे आणि ही आपली जबाबदारी आहे हेही तरुण पिढीने लक्षात घेतले पाहिजे. जन्म आणि मृत्यू आपल्या हातामध्ये नसतात. मरणाची वाट पहात बसायचे, नाही. अपेक्षा नसेल, कर्तव्याची पूर्तता होत नसेल तर शासनाने सक्ती करण्याची खरंच गरज आहे.

सभापती महोदय, ज्येष्ठांमध्ये देखील तीन भाग पडतात. एक म्हणजे ग्रामीण भागात राहाणारे वृद्ध. त्यांची तर फार दयनीय अवस्था असते. चाळीशी नंतर त्यांना साधा चष्माही मिळत नाही. फार वाईट वाटते. काही भागामध्ये आईला किंवा आजीला म्हातारी म्हणण्याची पध्दत आहे. ही पध्दत अंगवळणी पडते. हे म्हातारपण स्वीकारायला किती अवघड असते. पण स्वीकारावे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

लागते. हसत खेळत स्वीकारले तर त्रास होत नाही. ग्रामीण भागात असो किंवा शहरी भागात असो. वृद्धावस्था फार दयनीय असते. विशेषत: गरिबीमध्ये तर ही अवस्था फार कठीण होऊन जाते.

सभापती महोदय, माझ्या आईला फिझिओथेरपिची ट्रीटमेण्ट करण्यासाठी मी तिला जे.जे. हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले होते. त्या ठिकाणी मी हृदय पिळवटून टाकणारे दृश्य पाहिले. एक वृद्ध महिला जिला फ्रॅक्चर झाले होते, जी रक्तबंबाळ झाली होती तिला स्ट्रेचरवर ठेवलेले होते आणि ती वृद्ध महिला रडत होती. त्या वृद्ध महिलेच्या सोबत तिची मुलगी होती की सून होती हे समजत नव्हते. पण तिच्या सोबत असणारी ती बाई लहान मुलाला जसे मारतात त्याप्रमाणे त्या वृद्ध महिलेला मारत होती आणि रडू नको असे सांगत होती.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

असे हृदय पिळवंटून टाकणारे प्रसंग आपल्याला कधी कधी पहावयास मिळतात. असे प्रसंग पाहिल्या नंतर मनाला खूप वेदना होतात. आर्थिक परिस्थितीमुळे वयोवृदांना जगणे कठीण झालेले आहे, अशा वृध्दांना खरोखरच आधार देण्याची गरज आहे.

महोदय, वयोवृध्दांसाठी शासनाने अनेक योजना राबविलेल्या आहेत. संजय गांधी निराधार योजनेचा आढावा घेतला गेला पाहिजे. या योजनेचा लाभ किती निराधारांना होतो आहे याची मला माहिती नाही. परंतु अनेक शासकीय योजना फक्त कागदोपत्री आहेत. मी सांगू इच्छिते की, गरीब, कनिष्ठ, मध्यम वर्गाला या योजनेला लाभ मिळाला पाहिजे. या योजने अंतर्गत 600 रुपये देण्यात येतात. हे 600 रुपये कोणाला पुरतात ? 600 रुपये औषधास देखील पुरत नाहीत. आज महागाई खूप झाली आहे. दैनंदिन खर्च वाढला आहे. या योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्यात यावी.

सभापती महोदय, मला असे वाटते की, ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन फेस्को नावाची संघटना निर्माण केलेली आहे. त्या संस्थेने वृध्दांचे अनेक प्रश्न ऐरणीवर आणलेले आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, सनद जाहीर केली. मला सांगण्यास आनंद वाटतो की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने अशा प्रकारची सनद जाहीर करुन डॉ.दिलीप भोळे यांची नियुक्ती केलेली आहे. डॉ.दिलीप भोळे हे या बाबतीत चांगल्या प्रकारचे काम करीत आहेत. शासनाकडून ज्येष्ठ नागरिकांना आयकरात सवलत दिली जाते, बसमध्ये आरक्षण दिले जाते. त्यांना मोफत औषधोपचार करण्यात येतो, अशा वेगवेगळया योजना शासनाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविण्यात येत आहेत. स्वत:च्या मुलांनी आई-वडीलांना सांभाळले नाही अशी अनेक प्रकरणे कोर्टात आहेत. यात समाधानाची एकच गोष्ट आहे की, अशा केसेस चालविण्यासाठी शासनाकडून वकील दिला जातो आहे. अशी प्रकरणे 90 दिवसात निकाली काढावीत म्हणून सांगितले जाते. तरुणपणी कोर्टात केसेस दाखल केलेल्या असतात, त्या केसेसचे निकाल वयोवृध्द होईपर्यंत मिळत नाहीत. या बाबतीत 90 दिवसांची मर्यादा घालून दिलेली आहे, ती खूप महत्वाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

सभापती महोदय, मी जो दुसरा मुद्दा उपस्थित करीत आहे त्यांचा कृपया कोणी गैरसमज करुन घेऊ नये. शासनाने इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती योजना, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, संजय गांधी निराधार योजना सुरु केलेल्या आहेत. ज्यांच्या नावाने योजना सुरु केलेल्या आहेत त्यांचा आदर राखून मला या ठिकाणी एक सूचना करावयाची आहे की, देशामध्ये आणि राज्यामध्ये अगदी मदर तेरेसा पासून ते पु.ल.देशपांडे यांनी अनेक मदत आणि कार्ये केलेली आहेत. त्या मदतीचा आणि कार्याचा कोठेही त्यांनी उल्लेख केलेला नाही. प्रत्येक राज्यात चांगल्या प्रकारचे समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींच्या नावाने अशा प्रकारच्या योजना सुरु कराव्यात. कारण सध्या ज्यांच्या नावाने योजनांचा लाभ दिला जातो. ती योजना नेमकी कोणती आहे यासंबंधी लाभार्थ्यांमध्ये मोठे कनफ्यूजन निर्माण होत असते. मी जी सूचना केलेली आहे, त्यावर शासनाने विचार करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपविते.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने अतिशय महत्वाचा, जिव्हाळयाचा विषय सभागृहात चर्चेसाठी आला आहे. मला खात्री आहे की, या विषयावर चर्चा झाल्यानंतर सन्माननीय मंत्री महोदय अपेक्षित असे उत्तर देतील.

सभापती महोदय, आपल्या राज्यात 1 कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या ज्येष्ठ नागरिकांची आहे. जवळ जवळ 10 टक्के असणारा हा वर्ग आहे. हलाखीचे जीवन नशिबी आलेला किंवा आणलेला असा हा वर्ग आहे. जवळ जवळ 20 टक्के हत्त्या ज्येष्ठ नागरिक आणि वृध्दांच्या होतात ही आकडेवारी तुमच्या आणि माझ्या समोर आलेली आहे. मी या प्रस्तावाच्या निमित्ताने फक्त सूचना करणार आहे. ज्येष्ठ नागरिकांना आयुष्यामध्ये अपमान, मारहाण, मानहानीकारक बोलणे, आर्थिक पिळवणूक, संवादाची कमतरता, त्यांच्याकडे होत असलेले दुर्लक्ष, समोरच्यांकडून प्रतिसाद न मिळणे अशा प्रकारच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार मांडलेले आहेत. मी फक्त सूचना करण्यापूर्वी एक छोटीशी कविता वाचून दाखवितो.

"आईने बनविले, बाबांनी घडविले
आईने शब्दाची ओळख करुन दिली,
बाबांनी शब्दांचा अर्थ समजावून दिला
आईने विचार दिले, बाबांनी स्वातंत्र्य दिले
आईने लढण्यासाठी शक्ती दिली
बाबांनी जिंकण्यासाठी नीती दिली
म्हणून तर माझी आज जगाला ओळख झाली."

अशा प्रकारे प्रत्येक व्यक्तीचे अस्तित्व हे त्यांच्या आई-वडीलांच्या माध्यमातून घडते. त्याच आई वडिलांचे, आजी-आजोबांचे योग्य प्रकारे पालन पोषण करुन त्यांना मान-सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी त्यांना आधार द्यावयास पाहिजे. असा आदर्श प्रत्येकाने आपापल्या जीवनात वागणुकीच्या माध्यमातून निर्माण केला पाहिजे.

यानंतर श्री.भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये नमूद केल्याप्रमाणे वृध्दापकाळात दरमहा 2000 रुपयांचे अर्थसहाय्य देण्याबाबत मी सूचित करतो. महानगरपालिकांच्या क्षेत्रात शहरामध्ये मोठमोठी उद्याने आहेत. त्या ठिकाणी 1 टक्का अधिक एफएसआय मिळतो. त्या एफएसआयचा वापर करुन विरंगुळा केंद्र निर्माण करण्यात आली तर ज्येष्ठ नागरिकांना बसण्याकरिता हक्काचे साधन निर्माण होईल.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांना सवलती मिळण्यासाठी 65 वर्षाची अट निश्चित केली आहे. ही अट शिथिल करुन 60 वर्षे करावी अशी मी शासनाला विनंती करतो. जेणेकरुन वृध्दापकाळात गेलेल्या नागरिकांना त्याचा फायदा मिळेल. राज्य शासनाने आपले धोरण जाहीर केलेले नाही. केंद्राच्या धोरणाची वाट पाहिली जात आहे. केंद्राच्या धोरणाची वाट न पाहता राज्याने ज्येष्ठ नागरिकांबाबतचे आपले धोरण जाहीर करावे अशी सूचना करतो.

सभापती महोदय, सुरक्षिततेच्या बाबतीत आदरणीय गृहमंत्र्यांनी पोलीस विभागाला सूचना दिलेल्या आहेत. आठवड्यातून काही दिवस पोलीस ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जातात, चौकशी करतात. मोठया प्रमाणात याचा ज्येष्ठ नागरिकांना आधार मिळतो. गृहनिर्माण संस्था, चाळी या ठिकाणी मोहल्ला कमिट्या, शांतता कमिट्या नेमलेल्या आहेत. त्यांच्यावर सुध्दा याची जबाबदारी सोपविली पाहिजे. ज्या सोसायट्यांमध्ये ज्येष्ठ नागरिक एकटे रहात आहेत त्यांच्या बाबतीत सोसायटीच्या कार्यालयात बेलची व्यवस्था केली आणि आवश्यकता भासल्यास घरातून बेलचे बटण दाबल्यास कॉरिडॉरमध्ये बेल वाजली तर कोणीही मदतीसाठी जाऊ शकतो.

सभापती महोदय, टाऊन प्लॅनिंगच्या नियमामध्ये बदल केला तर जे विकासक नवीन योजना आणतील, प्रकल्प आणतील त्यांना विरंगुळा केंद्र बांधण्याची सक्ती करण्यात यावी, त्याकरिता 4000 ते 5000 चौ.फूट जागा लागणार असेल तर तेवढा एफएसआय वाढवून देण्यात यावा. ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्र निर्माण झाले तर त्यांना हक्काची जागा उपलब्ध होईल.

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत कुटुंबातील 5 सदस्यांना परवानगी दिली जाते. त्याऐवजी सहा सदस्यांना सहभागी करुन घेण्यात यावे अशी माझी सूचना आहे. या योजनेमध्ये पती, पत्नी आणि त्यांची दोन मुले व पाचवा सदस्य म्हणून आई किंवा वडील यांचा समावेश केला जातो. आई किंवा वडील यापैकी एक सदस्य या योजनेपासून वंचित राहतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये कुटुंबातील 5 ऐवजी 6 सदस्यांना परवानगी देण्यात यावी.

सभापती महोदय, जनेरिक औषधे ज्येष्ठ नागरिकांना सहज उपलब्ध झाली पाहिजेत. ही औषधे कमी किंमतीमध्ये देता आली तर त्याचाही विचार करण्यात यावा. त्यासाठी वेगळी औषधे देता आली किंवा बंधन घातले तर त्याचाही ज्येष्ठांना फायदा होईल. वृध्दाश्रमात ज्येष्ठांची सोय होत असली तरी त्या ठिकाणी वारंवार परीक्षण होणे आवश्यक आहे. आज राज्यात अनेक वृध्दाश्रम आहेत त्या ठिकाणी निरीक्षक परीक्षण करण्यास जातील त्यावेळी त्यांनी वृध्दांबरोबर संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तर त्या संदर्भात उपाययोजना करता येईल.

सभापती महोदय, राज्यामध्ये अल्पसंख्याक आयोग, महिला आयोग नेमण्यात आला आहे. ज्येष्ठांसाठी सुध्दा आयोगाची स्थापना करण्यात यावी. मंत्री महोदय त्या आयोगाचे पदसिध्द अध्यक्ष असतील. निवृत्त आयएएस किंवा आयपीएस अधिकाऱ्यांची सदस्य म्हणून त्या आयोगावर नियुक्ती करण्यात यावी. सभापती महोदय, राज्यात माता-पिता, ज्येष्ठ नागरिक पालन पोषण कायदा अस्तित्वात आहे. या कायद्याबाबत जनजागृती झालेली दिसून येत नाही. या कायद्यांतर्गत वारसांकडून पोटगी मिळण्यासाठी फक्त 24 तक्रारी दाखल केल्या गेल्या आहेत. त्या तक्रारीबाबत प्रक्रिया सुरु आहे. या कायद्याची अधिक सक्षमपणे जनजागृती केली गेली तर खूप उपयोग होऊ शकतो आणि आई वडिलांकडे दुर्लक्ष करणाऱ्या वारसांवर वचक निर्माण होऊ शकतो एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलताना माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वपूर्ण आणि मौलिक सूचना केलेल्या आहेत, मी त्या सूचनांची पुनरावृत्ती न करता कमीत कमी शब्दात बोलणार आहे. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या व्यथा आणि कथा आपल्याला माहिती आहेत. त्यामध्ये एक सारभूत मुद्दा आहे तो म्हणजे त्यांचे हक्क, त्यांचे संरक्षण आणि त्यांचा सन्मान सुरक्षित ठेवण्यासाठी वैधानिक तरतूद करावी लागेल. या संदर्भात मसुदा तयार केला आहे. याप्रस्तावाच्या निमित्ताने मी एवढीच अपेक्षा व्यक्त करतो की,

नंतर 3एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे ...

ज्येष्ठांच्या संदर्भातील धोरण आणि त्यासंदर्भातील कृती आराखडा नवीन विधान सभा अस्तित्वात येण्यापूर्वी जाहीर केला जाईल अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. ज्येष्ठांचे धोरण जाहीर झाले तर महाराष्ट्रातील ज्येष्ठांमध्ये चांगल्या प्रकारचा संदेश जाईल असे मला वाटते.

सभापती महोदय, दोन्ही सदनातील ज्या सदस्यांना या विषयाच्या संदर्भात अभिरुची आहे त्या सर्वांची एक समिती गठीत करण्यात यावी व या समितीच्या माध्यमातून तसेच समाजातून ज्येष्ठांच्या संदर्भातील सूचना मागवून ज्येष्ठांसाठी एक चांगले धोरण तयार करावे अशी विनंती मी या निमित्ताने शासनाला करतो.

सभापती महोदय, आरोग्याच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे आता आर्युमान वाढलेले आहे. आपल्या सर्वांचा अनुभव आहे की, काही क्षेत्रात लोक 58 वर्षानंतर, 60 वर्षानंतर तर काही ठिकाणी 65 वर्षानंतर निवृत्त होत असतात. निवृत्तीनंतर शरीराने, मनाने व बुध्दीने सक्षम असलेले काही काही लोक सेवानिृत्त झाल्यानंतर 10/15 वर्षही काम करीत असतात. या मंडळीच्या क्षमतेचा उपयोग आपल्याला देशाच्या बांधणीमध्ये, राज्याच्या उभारणीमध्ये चांगल्या पध्दतीने करता येऊ शकतो. ज्यांच्याकडे जी क्षमता आहे त्यानुसार त्यांच्याकडून काम करुन घेतले पाहिजे. उदाहरणार्थ निवृत्त झालेले आयएएस, आयपीएस, माध्यमिक शिक्षक, प्राध्यापक, तलाठी किंवा ग्रामसेवक असतील ते निवृत्त झाल्यानंतर आपण त्यांना निवृत्ती वेतन देत असतो. परंतु त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही त्यांच्या अनुभवाचा उपयोग करुन घेण्याबाबत आपल्या विद्यमान यंत्रणेत तशा प्रकारची सोय नसल्यामुळे त्यांना काम करण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे निवृत्त झालेल्यांची इच्छा असेल, क्षमता असेल तर त्यांचा उपयोग आपल्याला करुन घेता आला पाहिजे व यांसदर्भातील उल्लेख ज्येष्ठांच्या धोरणामध्ये असला पाहिजे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, ज्येष्ठांच्या संदर्भात आपल्याला चार भाग करता येऊ शकतील. 1) शारीरिक क्षमतेच्या अनुषंगाने काम करणे 2) त्यांच्या अनुभवाचा फायदा करुन घेणे 3) त्या त्या क्षेत्रातील निवृत्तांकडून नियोजन करुन त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करुन घेणे. 4) अनुभव संपन्न व्यक्तिमत्वाचा आपल्याला निरनिराळया संशोधनामध्ये उपयोग करुन घेता येईल. परंतु संशोधन म्हटले की, आपला दृष्टिकोन वेगळा होतो. परंतु तो दृष्टिकोन बदलून ही मंडळी संशोधनामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे ...

मोलाची भर घालू शकते. एका अर्थाने त्यांचे शिक्षण कमी असेल परंतु अनुभवाने आलेल्या त्यांच्या ज्ञानाचा आपल्या संशोधनामध्ये उपयोग करुन घेता येईल. सेवानिवृत्त मंडळींच्या संदर्भात आपल्याला आचारसंहिता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. मी पाहिले आहे की, संचालक पदावरुन निवृत्त झालेली मंडळी, मोठमोठया पदावरुन निवृत्त झालेल्या मंडळींचा उपयोग छोटया संस्थामध्ये करुन घेतला जातो. त्यांचे शासनामध्ये असलेले संबंध व त्यांच्याकडे असलेला अनुभवाचा उपयोग स्वत:च्या संस्थेसाठी करुन घेतला जातो. एका अर्थाने त्यांचा काही वेळा गैरवापरही केला जातो. त्यामुळे सेवानिवृत्तांसाठी एक चांगली आचारसंहिता असण्याची गरज आहे व ती कशी करता येईल याचा विचार व्हावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, जी सेवा निवृत्त मंडळी आहे त्यांना आपण सेवानिवृत्तीचे वेतन देतो, महागाई भत्ताही देतो. आता वैद्यकीय परिपूर्तीची योजना आली आहे ती किंवा वैद्यकीय भत्ता देऊन संरक्षण देण्याची गरज आहे. ज्यावेळेस वैद्यकीय सेवेची आवश्यकता असते तेव्हा ती त्यांना मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, 80 च्या पुढे वय गेल्यानंतर ती मंडळी कोणत्याही आर्थिक स्थरातील असो त्यांच्या आरोग्याची जबाबदारी शासनाने उचलली तर एका अर्थाने आपण योग्य पध्दतीने सन्मान केला असे होईल.

आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी): या प्रस्तावावरील माननीय मंत्री महोदयांचे उत्तर उद्या होईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 18 जुलै, 2013 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 44 मिनिटांनी, गुरुवार दिनांक 18 जुलै, 2013 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही